म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चरित्र

संग्रहालय क्रमांक
१०६

५५

लेखक विनायक कोंडदेव ओक

पुस्तकाचें नांव अब्राहम लिंकन

५५ नं. 2

सन

१८६ -

चरित्र



एब्राहाम लिंकन.

# A SHORT LIFE OF ABRAHAM LINCOLN

BY

VINAYAK KONDEVA OKE.

Lives of great men all remind us
We can make our lives sublime,
And, departing, leave behind us
Foot-prints on the sands of time.

*Longfellow.*

Second Edition.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGAR" PRESS.

Bombay:

1900.

*Price 8 Annas.*

*(Registered under Act XXV of 1867.)*

[ All rights reserved by the Publisher. ]

५ ११८

# एब्राहाम लिंकन

ह्याचें

## संक्षिप्त चरित्र.

उत्तम गुणीं शृंगारिला ज्ञानवैराग्यें शोभला
तोचि एक जाणावा भला भूमंडळीं.

रामदास.


विनायक कोंडदेव ओक,

ह्यांनीं केलें.



आवृत्ति दुसरी.

मुंबईंत,

जावजी दादाजी ह्यांच्या

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केली.

सन १९०० इ.

किंमत ८ आणे.

# प्रस्तावना.

स्वराष्ट्रहित साधावें कसें, हें ज्या चरित्रांवरून उत्तम प्रकारें कळेल, अशा चरित्रांची आवश्यकता, सगळ्या लोकांत तर आहेच आहे, पण त्यांत आमच्या राष्ट्रांतल्या लोकांत अतिशयित आहे; कां कीं, आमचें राष्ट्र सांप्रत काळीं, सर्व प्रकारीं पतित झालें आहे. ह्मणून, तशा प्रकारचें हें एक संक्षिप्त चरित्र येथें सादर केलें आहे. हें आमच्या देशबांधवांनीं वाचावें, आणि सज्जन व्हावें कसें हें ह्यावरून शिकावें, एवढीच प्रार्थना आहे.

आतां, अशा प्रकारच्या चरित्रांवर एक मोठी शंका अशी काढितात कीं, हा अमेरिकेंतला कित्ता आह्मांला कशाला पाहिजे, आमच्या देशांतले कित्ते आह्मांस उपयोगीं पडण्यासारखे नाहींत काय? ह्यावर, मोठें धैर्य करून, आणि जें काय कोणी ह्मणतील तें सोसण्याचा निश्चय करून आह्मी ह्मणतों कीं, नाहीं; निदान अर्वाचीन इतिहासांत तर, इतका चांगला कित्ता आमच्या हिंदुस्थानाच्या इतिहासांत आह्मांला कोठें आढळला नाहीं. आपणांपाशीं नाहीं, आणि आपणांस गरज तर आहे, अशी वस्तु दुसऱ्या जवळची मागून घेणें, हा व्यवहार कांहीं वाईट नाहीं; चांगला आहे. शिवाय ह्या प्रकारच्या ज्या पुरुषांचीं नांवें आपल्या इतिहासांत आढळतात, त्यांच्या चरित्रांविषयीं इत्थंभूत माहिती उपलब्ध नाहीं हें बहुतेकांस ठाऊक आहेच. ह्यास्तव, "उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्" असें ह्मणून, हें चरित्र आह्मीं आपल्या देशबांधवांस अर्पण केलें आहे. ह्याचा त्यांनीं कृपा करून स्वीकार करावा.

एवढी प्रस्तावना पुरे झाली. परंतु ह्या पुस्तकाच्या संबंधानें एक विशेष गोष्ट आह्मांला येथें कळविली पाहिजे. ती ही कीं, चरित्र लिहिण्याविषयीं आह्मांला प्रथमतः आन. जस्तिस काशीनाथ त्रिंबक तेलंग ह्यांनीं सुचविलें, त्यास आधारभूत ह्मणून एक फार उत्तम इंग्लिश पुस्तक पाठवून दिलें, आणि आमच्या विनंतीस मान देऊन, त्यांस इतर मोठमोठीं कामें अनेक होतीं तरी, आमच्या पुस्तकाचा हस्तलेख वाचून पाहिला, आणि छापी कच्चे खरडे तपासून, त्यांत जागोजाग पुष्कळ चांगली भर घातली. ती इतकी कीं, ह्या पुस्तकामध्यें रसिकांस मान्य, विद्वानांस प्रिय, सामान्यांस बोधपर आणि मर्मज्ञांस मनोरंजक असें जर कोठें कांहीं असलें, तर तें सगळें ह्या सत्पुरुषांच्या हस्तस्पर्शाचें फल आहे. ह्मणून त्याबद्दलचें सगळें यश त्यांचें आहे; त्यांत आमचें कांहीं नाहीं. ह्या पूज्य गृहस्थांनीं कृपा करून आह्मांला जें हें उत्तम साह्य केलें, त्याबद्दल आह्मी त्यांचे फार फार उपकार मानितों.

ह्या अल्प प्रयत्नास परमेश्वराचा आशीर्वाद असो.

# अनुक्रमणिका.

## भाग पहिला.

### विषयमाहात्म्य.

सत्समागमाचें माहात्म्य. ... ... ... ... ... १–३

## भाग दुसरा.

### कालदेशवर्तमान.

अमेरिकेंतलीं संस्थानें—त्यांचें आणि इंग्लिश सरकारचें भांडण होण्यास कारणें—प्रजासत्ताक राज्यापासून लाभ ... ३–७

## भाग तिसरा.

### जन्म आणि लहानपण.

एब्राहाम लिंकनाचीं मातापितरें—त्याचें शिक्षण—संस्थानांतर गमन—त्याच्या आईचा मृत्यु—त्याचा वाचण्याचा हव्यास आणि त्याचीं आवडतीं पुस्तकें—त्याची साधुवृत्ति—त्याची सावत्र आई—त्याचा प्रामाणिकपणा—दयाळुत्व—त्याच्या मनांत उद्योगाविषयीं प्रेरणा होण्यासारखी एक घडलेली गोष्ट—त्याचें धारिष्ट आणि उद्योगीपणा— त्याची ग्रंथावलोकन करण्याची रीति—उनाड लोकांत वागत असतांही त्यांचे दुर्गुण त्यास न लागणें.... ... ... ... ७–२५

## भाग चवथा.

### स्वनिर्वाहाचा स्वतंत्र उद्योग.

टामस लिंकन सगळ्या कुटुंबासहवर्तमान इलिनाईस प्रांतांत जाऊन राहातो—तेथूनही निघून कोल्स प्रांतांत जाऊन राहातो—एब्राहाम लिंकनाच्या बाहुबळाचा त्याच्या व्यवसायांत उपयोग—त्यास न्यूसालेम येथें वखारीवरच्या गुमास्त्याचें काम मिळतें—त्याचा प्रामाणिकपणा—त्याच्या बाहुबलाचीं आणि आनंदवृत्तीचीं दोन उदाहरणें—तो इंग्लिश भाषेचें व्याकरण शिकतो—त्याची गुमास्तेगिरी जाऊन त्यास घरीं बसावें लागतें. ... ... ... ... २५–३६

---

## भाग पांचवा.

### अभ्युदय.

एब्राहाम लिंकन हा ब्ल्याक हॉक याजवर चालून जाणाऱ्या व्हालंटियरांच्या एका तुकडीचा कप्तान होतो—ती मोहीम संपल्यावर तो व्यापारांत शिरूं पाहातो—परंतु एक लुच्चा माणूस त्यास अजीबात फसवितो–कर्ज फेडण्याबद्दल त्याची आस्था—त्यास पोस्टमास्तराची जागा मिळते—नंतर जमीनमोजणीचें काम त्यास मिळतें. ... ... ... ३६–५०

---

## भाग सहावा.

### सार्वजनिक कामें करण्याची योग्यता.

एब्राहाम लिंकनाची साधुरीति–सानगामन प्रांताच्या वतीनें कायदेकौन्सिलांत एक सभासद होतो—कायद्याचा अभ्यास करून वकिलीच्या परीक्षेंत उतरतो–वकील होतो–त्याची भूतदया आणि मातृभक्ति.... ... ... ... ५१–६५

---

## भाग सातवा.

### राज्याधिकारसभाप्रवेश.

सानगामन प्रांतांत निवडलेल्या लोकांवरोवर एब्राहाम लिंकन हा हौस आफ् रिप्रिझेंटेटिव्हज्‌मध्यें सभासद होतो. कांग्रेसमधले दोन तट—गुलामगिरी नको ह्मणणाऱ्यांचा प्रमुख एब्राहाम लिंकन—विरुद्धपक्षाचा प्रमुख डगलस—१८६० ह्या वर्षी वहुमतानें एब्राहाम लिंकन हा स्वतंत्र संस्थानांचा प्रेसिडेंट होतो—१८६१ ह्या वर्षी दक्षिणेकडच्या कांहीं संस्थानें उत्तरेकडच्या संस्थानांपासून विभक्त होऊन त्यांजवरोवर युद्ध करूं लागतात. डगलस मतांतर झाल्यामुळें आपला पक्ष सोडून एब्राहाम लिंकनास येऊन मिळतो—युद्ध चालू होतें—बुलरन येथें उत्तरवाल्यांचा पराभव—अमेरिकेंतून गुलामगिरी समूळ नाहींशी करून टाकावयाची असा निर्धार एब्राहाम लिंकन करितो—१८६३ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस आजपासून सर्व गुलाम स्वतंत्र झाले आहेत असा जाहिरनामा लावितो—गेटिसवर्ग येथें वंडवाल्यांचा पराभव—शेवटीं उत्तरवाल्यांचा जय आणि एब्राहाम लिंकनानें प्रसिद्ध केलेला जाहिरनामा. ... ... ६५–८८

## भाग आठवा.

### दरबारचें काम आणि घरचें वर्तन.

उच्चपदप्राप्तीच्या योगानें एब्राहाम लिंकन मदांध झाला नाहीं—त्याच्या मनाचा मोकळेपणा—त्याची भूतदया. ... ८८–१०३

## भाग नववा.

### शेवटचीं कृत्यें आणि निजधामगमन.

लढाईचा शेवट—एब्राहाम लिंकन रिचमंड शहरास जातो—तेथल्या स्वतंत्र झालेल्या शिद्दी लोकांची व त्याची भेट—आपल्या आचरणानें वर्णभेद समूळ नाहींसा करितो—दक्षिणवाल्यांच्या एका मारेकऱ्याच्या हातून त्याचा मृत्यु— उपसंहार. ... ... ... ... ... १०३–११४

# एब्राहाम लिंकन ह्याचें चरित्र.

## भाग पहिला.

### विषयमाहात्म्य.

निरंतर सदाचरण करून जगाच्या कल्याणाकरितां जे पुरुष कायावाचामनेंकरून झटतात, ते सगळे साधु होत; मग तें कल्याण ऐहिक असो कीं पारलौकिक असो. अशा पुरुषांचा जो समागम तोच सत्समागम होय; त्यालाच सत्संगति ह्मणतात. तिचें माहात्म्य फार मोठें आहे. वामन पंडित ह्मणतातः—

श्लोक.

खरें वचन बोलवी जडपणास कीं घालवी
महोन्नतिस डोलवी दुरित मारुनी चालवी
मनीं सुख अमोल वी यश जगत्रयीं कालवी
अनेक गुण पालवी सुजनसंगती भूलवी. १.

त्याप्रमाणेंच मोरोपंतांनीं ह्मटलें आहेः—

आर्या.

सत्संगति करिताहे लीलालेशें करून जेंवि हित
न तसें माता जाणे संसारामाजि मात्र जें विहित. १.
सत्संगतिप्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले
सरले दोप सकल जन न तरावे जे कधींहि ते तरले. २.
जीं हरिहरप्रसादीं कल्याणें वसति साधुसंगीं तीं
अघ शमतें सुख गमतें मन रमतें जेंवि दिव्य संगीतीं. ३.

ह्यावरून, सत्संगाच्या योगानें मनुष्याचें कल्याण किती होतें,

ह्याची अल्प तरी कल्पना करितां येईल. आणखी, संतसंगामध्यें कांहीं अनुपम सुख असावें असें वाटतें. कां कीं, गर्भवासामध्यें प्राण्यास अनेक प्रकारचे दुःसह क्लेश भोगावे लागतात, ते ठाऊक असतांही तुकाराममहाराजांनीं ह्मटलें आहेः—

अभंग.

नलगे मुक्ती धन संपदा संतसंग दे गा सदा
तुका ह्मणे गर्भवासीं सुखें घालावें आह्मांसी.

ह्याहून अधिक सत्समागमाचें माहात्म्य तें किती वर्णावें? हा सत्समागम प्रत्यक्ष प्राप्त होणें हा लाभ तर अमोलिक आहे. तो ज्यांस होतो, ते खरोखर मोठे भाग्यवान् होत. परंतु, कालाच्या अथवा स्थलाच्या दूरत्वामुळें तो ज्यांस प्राप्त होण्यासारखा नसतो, त्यांस संतांच्या चरित्रांचें पठण आणि मनन हाच सत्समागम होय. प्रत्यक्ष समागमानें जसे सद्गुण लागतात, तसेच, थोरांच्या चरित्राच्या अवलोकनानें आणि त्याच्या मननानें, त्या थोरांच्या सद्गुणांचें अनुकरण करण्याची वृत्ति अंतःकरणांत उत्पन्न होते, आणि त्या वृत्तीस अनुसरून वागणें हेंच सत्समागमाचें फल होय. हें फल प्रत्येक विचारशील मनुष्यास प्राप्त होण्यासारखें आहे. ह्या फलाचा अल्पस्वल्प तरी लाभ आपल्या देशबांधवांस एका चरित्राच्या द्वारें करून द्यावा, असा हेतु मनांत धरून, अर्वाचीन काळीं होऊन गेलेल्या एका अत्यंत वंद्य पुरुषाची कथा लिहावयाचें आह्मीं योजिलें आहे. परंतु, तीस आरंभ करण्याच्या आधीं, तो पुरुष ज्या राष्ट्रांत होऊन गेला, त्या राष्ट्राचें कालदेशवर्तमान सांगणें आवश्यक वाटतें. ह्मणून अगोदर त्याचें कथन करूं.

---

# भाग दुसरा.

## कालदेशवर्तमान.

इ० स० १४९२ ह्या वर्षी कोलंबसानें अमेरिका शोधून काढिल्यानंतर, स्वदेशांतल्या भानगडींस कंटाळून, आणि द्रव्य-संपादनाची आशा धरून, युरोपांतले लोक त्यामध्यें जाऊन आपापल्या सवडीप्रमाणें वसाहाती करूं लागले. त्यांत प्रथमारंभीं स्पानिआर्ड लोकांनीं वसाहात केली; त्यांच्या मागून फ्रेंच लोकांनीं वसाहात केली; आणि मग इंग्लिश लोकांनीं केली. ह्या कामांत त्या लोकांस यांच्या मूळच्या देशच्या राजांचें साह्य होतें, आणि त्या सगळ्या वसाहाती त्या राजांच्या ताब्यांतल्या आहेत, असें मानीत असत. त्या वसाहाती बऱ्याच चांगल्या वाढल्या, आणि त्यांचा राज्यकारभार आणि व्यापार हे प्रगल्भ दशेस आले, तेव्हां त्यांस संस्थानें ह्मणूं लागले. त्या संस्थानांचें राज्य चालविण्यास मुख्य अमलदार त्यांच्या मूळ देशांतून राजांकडून येत असत. तरी, संस्थानांतले कारभार लोकांच्या अनुमतानें चालत असत. ह्या प्रकारचीं स्थापित झालेलीं इंग्लिशांचीं संस्थानें तेरा होतीं. तीं हीं:—व्हर्जीनिआ, मेरील्यांड, दोन क्यारोलिना, जार्जिआ, न्यूयार्क, न्यूजर्सी, पेनसिलव्हानिआ, डिलावेर, मासाचुसेटस, कानिक्टिकट, न्यूहांपशायर, आणि रोड बेट. ह्या संस्थानांचे राज्यकारभार चालविण्यास इंग्लंडाहून सुभेदार येत असत; आणि ते राज्यकारभार, इंग्लंडच्या पार्लमेंटानें केलेले कायदे व त्या संस्थानांतल्या लोकांच्या विचारानें ठरलेले नियम ह्यांच्या अनुरोधानें चालत असत.

हें गाडें कितीएक वर्षेंपर्यंत ठीक चाललें. परंतु, द्रव्यलोभ फार कठिण आहे. ह्या संस्थानांच्या राज्याधिकारापासून आणि व्यापारापासून इंग्लंडास पुष्कळ नफा होऊं लागला; तेवढ्यानें

तृप्त न होतां, इंग्लंडच्या दरबारास असें वाटूं लागलें कीं, अमेरिकेंतल्या संस्थानांतले लोक ह्मणजे इंग्लंडाचीं मुलें; त्यांनीं इंग्लंडचें ह्मणणें हूं चूं न करितां, निमूटपणें, शिरसामान्य केलें पाहिजे, आणि इंग्लंड मागेल तितका पैसा दिला पाहिजे. आणखी, इकडे, अमेरिकेंतल्या लोकांचें ह्मणणें असें पडूं लागलें कीं, आह्मी जरी इंग्लंडाचीं मुलें आहों, तरी, ह्या दूर देशांत येऊन राहिल्यानें आमचे हक्क इंग्लंडांतल्या लोकांपेक्षां कमी झाले आहेत असें नाहीं; आह्मी आणि ते सारखे आहोंत: ह्मणून, त्यांच्या वतीचे सभासद जसे पार्लमेंटांत बसतात, तसे आमच्या वतीचे सभासद पार्लमेंटांत घेतले पाहिजेत; आणि ते घेतले ह्मणजे मग मात्र आह्मी पार्लमेंटाचे कायदे शिरसावंद्य मानूं; आणि जोंपर्यंत आमच्या वतीचे सभासद पार्लमेंटांत नाहींत, तोंपर्यंत आह्मी इंग्लंडच्या सरकारचा कायदा मानणार नाहीं. ह्मणजे, राज्यकारभारांत आमचें अनुमत घेतल्यावांचून आह्मी राजाज्ञा मानणार नाहीं, हें त्यांच्या ह्मणण्याचें तात्पर्य होतें.

अशी तेढ येऊन कलह माजला. त्याचें साद्यंत वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. तरी, अमेरिकेंतल्या लोकांच्या ठायीं त्या वेळीं स्वतंत्र होण्याचा आवेश किती आला होता, ह्याचें स्थूलमान तरी लक्षांत येण्यास त्या संबंधाच्या एक दोन गोष्टी सांगतों. इ० स० १७६५ च्या मार्च महिन्यांत इंग्लंडांतल्या सरकारानें एक नवा कायदा केला. त्यांत असें ठरविलें कीं, अमेरिकेंतल्या संस्थानांतल्या लोकांनीं, इंग्लंडांतल्या लोकांप्रमाणें, आपल्या सगळ्या देवघेवांत आणि सरकारी कामांत छापी कागद घेतले पाहिजेत. हें वर्तमान ऐकल्याबरोबर त्या लोकांच्या पायांची आग मस्तकास गेली. त्यांनीं एकत्र होऊन मोठा दंगा केला. बास्टन, न्यूहांपशायर इत्यादि मोठ्या शहरांत, सरकारी छापी कागद विकणाऱ्या कामदारांस मारहाण केली; त्यांच्या कचेऱ्यांस

आग लावून त्या जमीनदोस्त केल्या; आणि लोकांस छापी कागद घेण्याविषयीं जे कोणी आग्रह करीत होते, त्यांस दे माय धरणी ठाय करून सोडिलें. तेव्हां अर्थातच तो कायदा निमूटपणें रद्द करणें इंग्लंडच्या सरकारास भाग पडलें.

त्यानंतर दुसरा दंगा चहावरून झाला. लोकांच्या तकरारीवरून इंग्लंडांतून येणाऱ्या इतर सगळ्या वस्तूंवरची जकात उठविली होती; परंतु, चहावरची जकात, इंग्लंडचा राजा तिसरा जार्ज, ह्याच्या आग्रहावरून तशीच कायम ठेविली होती. तो जकात बसविलेला चहा घ्यावयाचा नाहीं, असा दृढनिश्चय संस्थानच्या लोकांनीं केला; आणि तो त्यांस घ्यायास लावावयाचा, असा आग्रह इंग्लिश सरकारानें धरिला. उभयपक्षांची खूबच चुरस लागली. इ० स० १७७३ ह्या वर्षाच्या दिसेंबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस, त्या विषयाचा विचार करण्याकरितां, बास्टन शहरामध्यें, दाहा दाहा कोसांवरून मंडळी येऊन, सुमारें ७,००० लोकांची एक मोठी सभा भरली; आणि, ह्या कामांत सरकारचा आग्रह चालूं द्यावयाचा नाहीं, असा त्यांनीं ठराव केला. आणि वादाचें मूळच अजी नाहींसें करून टाकावें ह्मणून त्यांतले पन्नास लोक, अमेरिकेंतल्या मूळच्या राहाणाऱ्या रानटी लोकांचीं सोंगें घेऊन, रात्रीं गलबतांवर चढले, आणि त्यांनीं, त्यांवरच्या चहाच्या ३४२ पेट्या समुद्रांत टाकून दिल्या. असो.

अशा प्रकारें अमेरिकेंतल्या संस्थानांतले लोक आणि इंग्लिश सरकार ह्यांचें वैमनस्य अतिशयित वाढलें, आणि उभयपक्षांचीं सैन्यें सिद्ध होऊन जागोजाग लढाया होऊं लागल्या. त्या लढायांच्या वेळीं अमेरिकेंतल्या केवळ पुरुषांनींच नव्हे, तर बायकांनीं सुद्धां, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या स्थापनेकरितां जीं कृत्यें केलीं, तीं अत्यंत वर्णनीय आहेत. त्यांचें वर्णन वाचिलें ह्मणजे असें मनांत येतें कीं, राष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यास दृढ-

निश्चयासारखें उत्तम साधन दुसरें नाहीं. "निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ" ह्याची प्रत्यक्ष मूर्ति अंतःकरणांत उभी राहाते. असो. त्या लढायांमध्यें इंग्लिश सरकारचा पराभव झाला, आणि संस्थानांच्या लोकांचा जय झाला. संस्थानांच्या लोकांनीं इंग्लंडच्या राजाची आपणावरची सत्ता काढून झुगारून दिली, आणि आपण अगदीं स्वतंत्र, ह्मणजे कोणत्याही राजाची प्रजा नाहीं, असें प्रगट केलें. तें ह्मणणें आधीं इतर राष्ट्रांनीं कबूल केलें; आणि मग कांहीं वेळानें, इ० स० १७८२ ह्या वर्षी, इंग्लंडानेंही तें कबूल केलें. त्या वेळेपासून तेथें प्रजासत्ताक राज्य चाललें आहे. ह्मणजे तेथें राजा नाहीं; तर, सगळ्या संस्थानांचे लोक आपापल्या वतीचे मुखत्यार नेमून, कांहीं नियमित काळपर्यंत त्यांच्या हातून आपला राज्यकारभार चालवितात; आणि त्या सर्व लोकांवर एक मुख्य अधिकारी, बहुमतानें नेमितात. त्यास अध्यक्ष



जार्ज वाशिंग्टन.

ही संज्ञा आहे. त्याची मुदत पांच वर्षांची असते. ती सरल्यावर, बहुमतानें मान्य होईल त्याची नवी नेमणूक होते. अशा प्रकारेंकरून त्यांचें काम चांगलें सुरळीत चाललें आहे. अगदीं पहिला अध्यक्ष जार्ज वाशिंग्टन हा होता. आणि तो जसा, केवळ आपल्या आंगच्या गुणांनीं

तें पद पावला होता, तसे त्याच्या मागून झालेले अध्यक्षही केवळ स्वगुणांच्या बळानें त्या पदास पावत गेले. त्या सर्वांच्या चरित्रांमध्यें एक गोष्ट अगदीं स्पष्ट दिसते. ती ही कीं, मनुष्यास, त्याच्या आंगच्या सद्गुणांच्या योग्यतेप्रमाणें योग्य पद प्राप्त होण्यास सर्वोत्कृष्ट स्थल ह्मटलें ह्मणजे प्रजासत्ताक राज्य होय. ह्या संस्थानांतलें प्रजासत्ताक राज्य सध्या फार चांगल्या रीतीनें चाललें आहे. त्या सर्वांचें मिळून क्षेत्रफळ २९,७०,०१५ चौरस मैल आहे; लोकसंख्या ५,७०,००००० आहे; उत्पन्न ७२,६०,८१,०६२ रुपयांचें आहे; खर्च ५०,८५,८६,३५० रुपये आहे; आणि सैन्यांत शिपाई २५,००० आहेत, व त्यांवर अमलदार २१७७ आहेत. त्या संस्थानांचा मुख्य अधिकारी अध्यक्ष, त्याचा वर्षाचा पगार सगळा एक लाख रुपये आहे. ह्या संस्थानांचा सोळावा अध्यक्ष एब्राहाम लिंकन तो ह्या कथेचा नायक आहे. त्याचें चरित्र लिहिण्यास आतां आह्मी आरंभ करितों.

---

## भाग तिसरा.

## जन्म आणि लहानपण.

लोकव्यवहारामध्यें हा एक मोठा चमत्कार आहे कीं, ज्या गोष्टी वस्तुतः अगदीं साधारण असतात, त्या वस्तु, वर्णनीय गोष्टींच्या सान्निध्यानें किंवा संबंधानें वर्णनीय होतात. लांकडाच्या पादुका, त्यांत विशेष कांहीं नसतें; परंतु, त्या श्रीरामदासस्वामींच्या पायांस लागलेल्या असल्यामुळें वर्णनीय होतात. त्याप्रमाणेंच मनुष्याच्या जन्माचें आणि बालपणाचें आहे. ह्मणजे, जन्म आणि बालपण हीं सगळ्या मनुष्यांस असतात; त्यांत कांहीं विशेष नसतें; परंतु, ज्या माणसांच्या हातून वर्णनीय कृत्यें घडतात, त्या माणसांचें जन्म आणि बालपण हीं, सर्व जनांस,

अत्यंत महत्वाचीं वाटतात; आणि त्यांविषयीं मिळवेल तितकी माहिती मिळविण्याविषयीं लोक प्रयत्न करितात. परंतु, असुक मनुष्य पुढें मोठा होणार आहे, असें आधीं कोणास कळत नसल्यामुळें, कधीं कधीं, थोरांच्या जन्माची आणि लहानपणाची हकीकत, इतरांच्या हकीकतीप्रमाणें अगदींच दुर्मिळ होते. तीच अवस्था एब्राहाम लिंकन ह्याच्या जन्माची आणि बालपणाची झाली आहे. उत्तर अमेरिकेंतल्या संस्थानांमध्यें केंटके ह्मणून एक संस्थान आहे. तेथें टामस लिंकन ह्या नांवाचा कोणीएक गरीब मनुष्य राहात असे. त्याला तेवढी आपली स्वतःची सही मात्र करतां येत होती. बाकी तो अगदीं अक्षरशत्रु होता. तो मजुरीचें काम करून आपला चरितार्थ चालवीत असे. त्यांतच थोडासा पैसा शिलकेस टाकून त्यानें, इ० स० १८०६ ह्या वर्षीं एका स्त्रीशीं लग्न केलें. तिच्या पोटीं त्याला तीन मुलें झालीं. त्यांतलें दुसरें मूल एब्राहाम; हा इ० स० १८०९ च्या फेब्रुआरी महिन्याच्या बाराव्या तारखेस जन्मला.

टामस लिंकन आणि त्याची बायको हा जोडा फार उत्तम होता. तीं एकमेकांवर अतिशयित प्रीति करीत असत. त्यांचा संसार गरीबीचा होता. तरी त्यांतच तीं अशा कांहीं ऐक्यानें वागत कीं, त्यांचीं शरीरें मात्र भिन्न, पण मनें अगदीं एक, असें सर्वांस वाटे. तीं उभयतां मोठीं धार्मिक होतीं. तीं आपलीं सगळीं कामें ईश्वरास स्मरून करीत; आणि, त्यांचें फल चांगलें होणें किंवा वाईट होणें हें परमेश्वराधीन आहे असें समजून, निरंतर स्वस्थ राहात. तीं नेहमीं आनंदी असत. त्यांस दारिद्र्याचें फारसें कांहीं वाटत नसे. तीं असें समजत असत कीं, आपले ठायीं जर अधिक विद्या असती, तर आपणांस अधिक पैसा मिळाला असता. आणखी, इहलोकचें सुखदुःख जें

आहे, तें अल्पकालिक आहे, त्याजकडे लक्ष देण्यापेक्षां, परलोकच्या अक्षय्य सुखाच्या साधनाकडे विशेष लक्ष ठेवणें आणि त्याकरितां कायावाचामनेंकरून अहर्निश झटणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांच्या अंतःकरणांत अगदीं पूर्णपणें ठसलें होतें; त्यामुळें त्यांचें सगळें वागणें त्याप्रमाणें असे; आणि आपल्या मुलांच्याही अंतःकरणांत ती वृत्ति उत्तम प्रकारें स्थापित करण्याविषयीं तीं अहोरात्र झटत असत. त्या वेळीं पुस्तकें फारशीं नव्हतीं; तरी, मोठ्या प्रयत्नानें जीं थोडींशीं चांगलीं पुस्तकें त्यांनीं मिळविलीं होतीं, तीं, ती आई, नित्य नेमानें, मोठ्या आस्थेनें आपल्या मुलांस शिकवीत असे. त्या पुस्तकांत त्यांच्या धर्माचें पवित्रशास्त्र हें मुख्य होतें. त्या पुस्तकासारखें दुसरें पुस्तक जगांत मिळावयाचें नाहीं, आणि त्यांत सांगितल्याप्रमाणें जीं माणसें धर्माचरण करितील, त्यांस परलोकसुख प्राप्त होण्यास कधीं आडकाठी यावयाची नाहीं, असा पूर्ण विश्वास त्या मातापितरांच्या अंतःकरणांत भरला होता; आणि त्याचें उत्कृष्ट बीजारोपण त्यांनीं आपल्या आचरणाच्या कित्त्यानें आणि चित्तवेधक उपदेशानें आपल्या बालकांच्या अंतःकरणांत केलें होतें. तेव्हां तीं मुलें पुढें उत्तम धर्मशील निपजलीं, ह्यांत नवल तें कोणतें? शेतामध्यें गहूं पेरल्यावर त्यांत गव्हांचेंच पीक यावयाचें; भलतें यावयाचें नाहीं. येथें आमच्या देशबांधवांस एक सूचना करावयाची आहे. ती एवढीच कीं, मुलें धातूंच्या पातळ रसासारखीं आहेत, आणि तुह्मी सांचे किंवा ठसे आहांत; ह्मणून आपलीं मुलें ज्या प्रकारचीं माणसें व्हावीं अशी तुमची इच्छा असेल, त्या प्रकारचीं माणसें आधीं तुह्मी व्हा. ह्मणजे मग कोणत्याही गोष्टीची अडचण पडावयाची नाहीं.

एब्राहाम लिंकन लहान होता, तेव्हां केंटके प्रांतांत शाळा

मुळींच नव्हत्या ह्मटलें तरी चालेल. तरी लोकांचीं लहान मुलें एके ठिकाणीं जमवून, त्यांस लिहिणें वाचणें शिकविण्याचा उद्योग कांहीं लोक करीत असत. अशा लोकांपैकीं एब्राहामाचा अगदीं पहिला शिक्षक झराारा रेनी हा होता. त्याच्यामागून तो कालेब हाझेल ह्या शिक्षकाच्या शाळेंत जाऊं लागला. त्यानें त्याला वाचायाला शिकविलें. टामस लिंकन ह्यास विद्या नव्हती; तरी विद्येची किंमत त्याच्या लक्षांत येऊन चुकली होती. त्यामुळें तो आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाविषयीं फार जपत असे. मुलांचें पोट भरण्यास पुरेइतकें दूध आंगावर नसतें, अशा आया पुष्कळ असतात. तरी, त्या मुलांची पोटभर होते. कां कीं, त्या मुलांविषयीं त्या आयांस आस्था पुष्कळ असते, आणि त्यांचीं पोटभर करणें हें आपणांस अत्यंत अवश्यक आहे, हें त्यांस ठाऊक असतें. सारांश, स्तनांतल्या दुधापेक्षां अंतःकरणांतली आस्था मुलांस अधिक उपयोगीं पडते. तोच प्रकार विद्येविषयीं समजावा. असो.

टामस लिंकन ह्याचें केंटके प्रांतांत बरोबरसें चालेना. त्याच्या मनासारख्या गोष्टी तेथें त्यास करतां येईनात. ह्मणून त्यानें तो प्रांत सोडून दुसऱ्या प्रांतांत जाण्याचा निश्चय केला. आणि त्याप्रमाणें लागलाच एक ताफा बांधून, त्यावर आपलें सगळें सामानसुमान घालून, तो, आपल्या मुलांमाणसांसहवर्तमान, ओहायो नदींतून, ताफा हांकीत हांकीत, इंडियाना ह्या प्रांतांत येऊन पोंचला. ह्या जलपर्यटनांत, एके ठिकाणीं त्याचा ताफा कांहींसा बुडून किंवा पालथा होऊन त्यांचे वरेच हाल झाले. तरी, तीं सगळीं सुरक्षितपणें आपल्या नियमित मुक्कामास येऊन पोहोंचलीं, आणि घरदार करून राहिलीं. हें वर्तमान इ० स० १८१६ ह्या वर्षीं घडलें. ही हकीकत वाचली ह्मणजे, आपलेकडच्या

डोंवारी लोकांची आठवण होते. त्यांचें राहण्याचें कायमचें ठिकाण एक नसतें. ते नेहमीं पालांत राहतात. आणि मनास येतें तेव्हां मनास येतें त्या ठिकाणीं वसती करितात. पण, आमच्या डोंबाऱ्यांमध्यें आणि टामस लिंकनसारख्या तथल्या लोकांमध्यें एक मोठें अंतर दिसतें. तें हें कीं, आमच्या कडचे डोंबारी खरोखर अक्षरशत्रु असतात, आणि ते लोक चांगले सुशिक्षित असतात. ह्मणून, डोंबारी प्राचीन काळापासून जसे रानटी आणि दरिद्री आहेत तसे आहेत, त्यांच्या स्थितींत अंतर पडलें नाहीं. आणि ते इंग्लिश लोक, आपल्या विद्येच्या बळानें, उत्तम स्थिति पावले आहेत.

इंडियाना प्रांतांत ह्या कुटुंबानें जेथें ठाणें धरिलें होतें, तेथें भोंवतालीं अरण्य पुष्कळ होतें. आणि शिकारीस जागा फार चांगली होती. परंतु, एब्राहाम लिंकन ह्यास तो छंद नव्हता. तो अगदीं लहान असतां, एके वेळीं त्यानें घराच्या भिंतीच्या फटींतून रानवदकांचा एक थवा जवळच पाहिला, आणि, बापाची बंदूक जवळच होती ती घेऊन, ती त्यांजवर सोडून, त्यांतला एक पक्षी मारिला. तेवढ्यावरून त्याला शिकारीविषयीं हौस येऊन, नाद लागावा, पण तसें झालें नाहीं.

ह्या नवीन ठिकाणीं देखील त्या कुटुंबाचें चांगलेंसें चालेना. त्यांनीं तेथें एक लहानशी झोंपडी बांधिली होती. तींत तीं सगळीं निर्वाह करीत. तो फार अडचणीनें होत असे. तीं नवरावायको आणि मुलें, गवतावर कांहीं कापड आंथरून त्यावर निजत असत, आणि, वारातारा लागूं नये ह्मणून भोंवतीं कातड्यांचे किंवा जवळच्या फाटक्यातुटक्या चिरगुटांचे पडदे लावीत असत. खाण्यापिण्याची अवस्थाही तशीच होती. परंतु तें सगळें कुटुंब धार्मिक होतें; ह्मणजे, देव जें कांहीं करितो तें

चांगलें करितो, असा त्यांचा पूर्ण भरंवसा होता, आणि तो दयाळू आहे ह्मणून आपणांस केव्हां तरी चांगले दिवस दाखवील अशी त्यांस मोठी आशा होती, ह्मणून तीं, त्यावर सगळा भार घालून आपले दिवस शांतवृत्तीनें काढीत असत. सद्भक्तांची रीति अशीच असते.

इंडियाना प्रांतांत येऊन राहिल्यावर झोंपडें बांधणें आणि भोंवतालचें रान कापून टाकणें अशीं दोन कामें टामस लिंकन ह्यास करावीं लागलीं; आणि तेथें त्यास दुसऱ्या कोणाची मदत नसल्यामुळें, त्याला साह्य करण्याच्या कामीं त्याच्या बायकोसही पुष्कळ श्रम पडले. त्या संबंधाच्या हकीकतींत असें सांगितलें आहे कीं, ह्या वेळीं एब्राहाम जरी अगदीं अल्पवयस्क होता, तरी, त्याची एक आवडती फरशी होती, तिनें, तो, आपल्या आईबापांस पुष्कळ मदत करीत असे. आधींच तो लहान आणि त्या प्रमाणानें त्याची फरशी लहान, तेव्हां त्याच्या हातून काम फारच थोडें होत असलें पाहिजे, हें उघड आहे. परंतु, आपलें एवढेंसें लेंकरूं, हातांत फरशी घेऊन आपणांस साह्य करण्याकरितां झटून काम करीत आहे आणि त्यामुळें त्याच्या गालांचें कोंकंब होऊन, त्याच्या आंगांतून घामाच्या धारा चालल्या आहेत, असें पाहून या मातापितरांस अत्यंत समाधान वाटलें असेल, आणि उद्योग करायास विशेष उत्तेजन आलें असेल, हें खचीत आहे. "जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच" असें वामनपंडितांनीं ह्मटलें आहे. तें ह्या लहान मुलास किती चांगलें लागू पडतें तें पाहा.

अशा प्रकारें तें लहानसें, गरीब, आणि भक्तिमान् कुटुंब, संतोषवृत्तीनें कालक्रमणा करीत असतां, त्याजवर एक मोठा दुःखाचा प्रसंग गुदरला. तो हाच कीं, टामस लिंकन ह्याची बायको, ह्मणजे एब्राहाम लिंकन ह्याची आई, क्षयरोगाच्या

योगानें मरण पावली. तेव्हां एब्राहाम ह्यास पराकाष्ठेचें दुःख झालें. आतां आपणास जगांत कोणी नाहीं असें त्याला वाटलें. त्यांनीं तिला त्यांच्या घराजवळच झाडाखालीं पुरलें. तेथें तो मुलगा बसून, तासांचे तास रडत असे. ह्यांत कांहीं नवल नाहीं. मुलास आईवांचून दुसरें दैवत नाहीं. आणखी त्यांत एब्राहामासारखा अत्यंत सुशील मुलगा, आणि त्याच्या आईसारखी अत्यंत प्रीतिवंत आणि दयाळू आई; तेव्हां, तिच्या मरणानें, सगळें जग ओस पडल्यासारखें त्या मुलास वाटावें, हें अगदीं साहजिक आहे.

एब्राहामाची आई मरण पावली; परंतु, तिनें सदाचरणाचें आणि धर्मपरतेचें जें उत्तम बीज त्याच्या अंतःकरणांत पेरून ठेविलें होतें, तें तिळमात्र कमी झालें नाहीं; इतकेंच केवळ नव्हे, तर, तिच्या वागण्याचा कित्ता आपणापुढून गेला आहे, व तिच्या तोंडचा बोध आतां ऐकायास सांपडावयाचा नाहीं, असें मनांत आणून, तिनें शिकविलेल्या आणि सांगितलेल्या गोष्टी तो पहिल्याहीपेक्षां अधिक आस्थेनें, अधिक अगत्यानें आणि अधिक आवेशानें करूं लागला. ह्मणजे तिच्या मरणानें त्याची सदाचरणबुद्धि आणि धार्मिकता हे दोन गुण दिवसेंदिवस वाढूं लागले. साधारण प्रकार ह्मटला ह्मणजे कोणी सांगतेंशिकवितें नाहींसें झालें, ह्मणजे मुलें बिघडतात; परंतु एब्राहाम लिंकनाची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट झाली. तेव्हां तो मुलगा खरोखरच विलक्षण बुद्धीचा व सुस्वभावाचा होता, असें ह्मटलें पाहिजे. रूस देशाचा नामांकित राजा पीटर धि ग्रेट ह्याची गोष्ट तर अशी सांगतात कीं, त्यास बिघडविण्याचे कितीएक उपाय त्याच्या जवळच्या माणसांनीं केले असतांही, तो तितक्यांस पुरून उरला, आणि चांगला निपजला. असो.

एब्राहाम लिंकन हा लहानपणींच जबरदस्त वाचणारा झाला. हातीं पुस्तक आलें कीं तें सगळें वाचून टाकावयाचें, असा त्याचा परिपाठ असे. आणि तें वाचणें ह्मणजे उगाच सरासरी नव्हे, तर, त्यांतल्या विषयाचा चांगला विचार करावयाचा, आणि त्यांतली चांगली आणि आपणास करितां येण्यासारखी अशी जी गोष्ट वाटेल ती करण्याविषयीं निर्धार करावयाचा, असा त्याचा क्रम असे. आणि त्याप्रमाणें तो यथाशक्ति वागे. हें काम सोपें नाहीं. करावें काय आणि न करावें काय, हें समजतें अशीं माणसें जगांत पुष्कळ आहेत. परंतु त्याप्रमाणें वागणारीं माणसें कमी—फारच कमी—ह्मणजे लाखांत एकदोन निपजतात. तींच खरीं थोर माणसें होत. एब्राहाम लिंकन हा त्यांतला एक होता.

आतां, हा मुलगा इतका चांगला निपजण्यास त्यानें अशीं कोणतीं उत्तम पुस्तकें वाचिलीं होतीं असा प्रश्न वाचणाऱ्यांच्या मनांत सहज उत्पन्न होणार आहे. त्याचें उत्तर दिलें पाहिजे. एब्राहाम लिंकनापाशीं पुस्तकें फार थोडीं होतीं. पण तीं अगदीं निवडक होतीं. त्यांत बैबल ह्मणजे ख्रिस्ती धर्मशास्त्र हें पुस्तक त्यास अत्यंत प्रिय असे. त्याजवर त्याची निष्ठा अप्रतिम होती. त्या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें वागणें हेंच जन्माचें सार्थक्य, हेंच सगळें पुण्य आणि हेंच मोक्षपद असें त्यास वाटे. आणि ह्याप्रमाणें तो वागे. त्या धर्मशास्त्रांत काय सांगितलें आहे, हें येथें विस्तारेंकरून सांगण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं त्याचें भाषांतर मराठींत झालेलें आहे. त्या पुस्तकांत, इतर धर्मांच्या शास्त्रांप्रमाणें, उत्तम नीति सांगितली आहे.

त्याच्या खालोखाल त्याचें आवडतें पुस्तक "पिलग्रिम्स प्रोगेस" ह्मणजे "यात्रिकक्रमण" हें होतें. तें असेंच धर्मनीतिपर आहे. मनुष्य

ह्या ह्या जगांत यात्रेकरू आहे, असा विषय धरून त्याचें उत्तम विवेचन रूपकाच्या द्वारें ह्यांत केलें आहे. हें वाचिलें ह्मणजे विचारशील मनुष्याच्या अंतःकरणांत प्रकाश पडतो; आणि स्वकर्तव्याविषयीं त्याची मनोदेवता चांगली जागृत होते. ह्याही पुस्तकाचें भाषांतर मराठींत झालें आहे. तें वाचण्यासारखें आहे.

त्याप्रमाणेंच, जार्ज वाशिंग्टन ह्याचें चरित्र आणि बेंजामिन फ्रांकलिन ह्याचें चरित्र हीं पुस्तकें त्याचीं फार आवडतीं होतीं. हे दोघे पुरुष अत्यंत पवित्र आचरणाचे आणि स्वदेशहितास अगदीं वाहलेले असे होते, हें सर्वांस ठाऊक आहेच. ह्यांशिवाय त्याला इसापनीतिकथा प्रिय असत. ह्मणजे, एकंदरीनें, ज्या पुस्तकांमध्यें आत्म्याचें हित, बुद्धिकौशल्य, आणि स्वदेशहित ह्यांचें विवेचन असे, तीं पुस्तकें तो अहोरात्र वाची, आणि त्यांचें मनन करी. अशा प्रकारच्या पुस्तकांच्या पठणांत ज्याचें सगळें लहानपण गेलें होतें, तो पुरुष अत्यंत भक्तिमान् आणि अत्यंत स्वदेशहितकर्ता निपजावा, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असो.

एब्राहाम लिंकनाला जसा वाचण्याचा मोठा हव्यास होता, तसा त्याला लिहिण्याचाही मोठा नाद होता. ह्मणजे, आपल्या मनांत जे विचार येतात ते दुसऱ्यास स्पष्ट कळत अशा रीतीनें लिहितां येणें हें त्याला फार आवडत असे. तो त्याचा अभ्यास लोकांचीं पत्रें लिहून फार वाढला. त्याच्या गांवामध्यें बहुतेक अडाणी लोकांची वस्ती होती. आणि, एब्राहामास पत्रें लिहून देण्याची फार हौस आहे असें त्यांस समजलें होतें. त्यामुळें, ते सगळे लोक आपलीं पत्रें ह्याजकडून लिहून घेत. त्यांचें काम फुकट होई आणि ह्याचा अभ्यास वाढे. त्या पत्रांतले मतलब वेगळे वेगळे असल्यामुळें, आणि ते लोकांच्या समजुतीप्रमाणें ल्याहावे लागल्यामुळें, वाक्यार्थाच्या स्पष्टतेविषयीं त्याचा अगदीं

हातखंडा झाला. ह्मणजे, त्याचें लिहिणें असें असे कीं, तें वाचल्यावरोबर वाचणाराच्या मनांत, इष्ट अर्थ असे तेवढाच येई, कमजास्त येत नसे. हें सामर्थ्य लहान नव्हे. मनांतला आशय असावा एक, आणि हातानें लिहिलेल्या शब्दांपासून अर्थ निघावा भलताच असें कितीएक चांगल्या शिकलेल्या मनुष्यांचें होतें. किंवा, मनांतला अर्थ शब्दांत कसा दाखवावा, हेंच कितीएकांस सुचत नाहीं. ही अडचण एब्राहामास कधीं आली नाहीं.

हा लिहिण्यावाचण्याचा जो अभ्यास एब्राहाम लिंकनानें अगदीं लहानपणांत केला, तो, त्याच्या मोठेपणीं त्यास फार उपयोगीं पडला. ह्मणजे, त्या अभ्यासाचा जो परिणाम त्याच्या मनावर झाला होता, तो अगदीं त्याच्या अखेरीपर्यंत जशाचा तसा होता, असें वाटतें. त्यास अध्यक्षाच्या जागेवर नेमिल्यावर त्या अधिकाराचीं वस्त्रें घेण्यास जात असतां, न्यूजर्सी येथें त्यानें जें उत्कृष्ट भाषण केलें, त्यांत तो ह्मणाला, आपल्या ह्या देशाच्या स्वातंत्र्याच्या स्थापनेसाठीं पडलेलीं जीं मोठमोठीं रणें जार्ज वाशिंग्टन ह्याच्या चरित्रांत सुंदर रीतीनें वर्णिलीं आहेत, त्या सर्वांचें मला अद्याप चांगलें स्मरण आहे. आणि त्यांतही ट्रेंटन येथील युद्धाचें वर्णन माझ्या मनांत जितकें ठसलें आहे, तितकें दुसरें कोणतेंही ठसलें नाहीं. ह्यावरून, तो लहान असतांही, स्वदेशस्वातंत्र्यासारखा मोठा विषय त्याच्या अंतःकरणांत भरला होता, आणि त्याविषयीं तो फार विचार करीत होता, असें दिसतें. थोरांच्या लहानपणाच्या गोष्टी अशाच विलक्षण असतात.

तपशीलवार हकीकत कोठें लिहिलेली आढळत नाहीं, तरी जे लेख हातीं आले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, एब्रा

हाम लिंकन हा जसजसा वयानें वाढूं लागला, तसतसा तो, शरीरानें निरोगी, धिप्पाड आणि खासा पेलवान होऊन, अंतःकरणाचा अगदीं निर्मळ आणि परहित साधण्याविषयीं परम दक्ष असा झाला. तेव्हां, त्याच्या वयाच्या मुलांत त्यास सहजच श्रेष्ठत्व मिळालें, आणि इतर लोकांसही तो पराकाष्ठेचा आवडूं लागला. कां कीं, तो, कायावाचामनेंकरून, सर्वांच्या उपयोगीं पडण्यास नेहमीं अगदीं एका पायावर उभा असे. कधीं कोणाशीं भांडावयाचा नाहीं; कधीं आपली प्रौढी मिरवायाचा नाहीं; असत्याचरण कधीं करावयाचा नाहीं; आणि कोणी कांहींही काम सांगो, करावयास तयार, अशी त्याची साधुवृत्ति असल्यामुळें, तो त्या खेड्यांतल्या प्रत्येक मनुष्यास जसा काय आपला सखा भाऊ वाटूं लागला.

एब्राहाम लिंकनाची आई निवर्तल्याचें वर्तमान वर सांगितलेंच आहे. त्या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यावर टामस लिंकन ह्यानें दुसरी बायको केली. तीही स्वभावानें फार चांगली होती. ती ह्मटली ह्मणजे एब्राहामाची सावत्र आई. तरी, त्याची वागण्याची उत्तम रीति पाहून, ती त्याला जीव का प्राण करीत असे; आणि तोही तिच्या आज्ञेबाहेर कधीं एक पाऊल टाकीत नसे. सवतीसावत्रांचें कधीं जमावयाचें नाहीं, असा जो ग्रह कितीएकांच्या मनांत भरलेला आहे, त्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा. सुशील तो सुशील. त्याला तुह्मी कोठेंही ठेवा, तो कोणाच्या डोळ्यांत खुपावयाचा नाहीं. सर्वांस आवडावयाचा.

अगदीं लहानपणीं देखील एब्राहाम लिंकन हा विलक्षण प्रामाणिक मुलगा होता. त्याविषयीं एक गोष्ट सांगतात. ती अशी कीं, एके वेळीं, त्यानें आपला शिक्षक आंड्र्यू क्राफर्ड ह्या-

जपासून, वाचायाकरितां रमसेकृत वाशिंग्टनचरित्र मागून आणिलें. तें रात्रीं एका खिडकींत ठेविलें होतें; तें एकाएकीं एक पावसाची मोठी सर पडून, तिच्या पाण्यानें अगदीं भिजून खराब झालें. तें पाहून त्या मुलास फार वाईट वाटलें. तरी तो भ्याला नाहीं. तो, लागलेच तें पुस्तक घेऊन आंड्र्यू क्राफर्ड ह्याजकडे गेला, आणि झालेली सगळी हकीकत त्याला सांगून ह्मणाला कीं, "ह्या अपराधाबद्दल मला क्षमा करा, मी आपली नुकसानी भरून देण्यास तयार आहें; मजपाशीं पैसा नाहीं; ह्मणून आपण जर मजकडून कांहीं काम करवून घ्याल तर मजवर मोठे उपकार होतील." ती विनंती त्या गृहस्थानें मान्य केली. आणि, तें पुस्तक भरून देण्याच्या ऐवजीं एब्राहाम लिंकन ह्यानें आंड्र्यू क्राफर्ड ह्याजकडे तीन दिवस गवत कापण्याचें काम केलें. ही बाब फार थोडी होती. तरी कोणाच्याही ऋणांत न राहण्याविषयीं एब्राहाम लिंकन हा लहानपणापासून किती जपत होता, हें स्पष्ट दिसून येतें.

त्याप्रमाणेंच, ह्या वयांत तो दयाळू किती होता, ह्याविषयीं एक गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. कोणे एके वेळीं तो आपल्या कितीएक मित्रांसहवर्तमान, बाहेरून फिरून घराकडे येत होता. तेव्हां, तोंडांत लगाम आणि पाठीवर खोगीर असा एक घोडा, एकटाच इकडे तिकडे भटकतांना त्याच्या दृष्टीस पडला. तो कोणाचा होता, तो त्या मंडळीनें तेव्हांच ओळखिला; आणि त्यांस असें खचीत वाटलें कीं, त्याचा धनी, दारू पिऊन, बेसावध होऊन, तेथें जवळच कोठें तरी लोळत पडला असावा. त्याप्रमाणें, थोडासा शोध केल्यावर, खरोखरच तो मनुष्य, अगदीं मेल्यासारखा झालेला, त्यांस तेथें जवळच सांपडला. तेव्हां सगळ्या मंडळीचें ह्मणणें असें पडलें कीं

त्याला तसेंच तेथें राहूं देऊन आपण आपापल्या घरीं जावें. परंतु, एब्राहामास तें पसंत पडलें नाहीं. तो त्या मनुष्यास बसला करून, त्यास शुद्धीवर आणायाच्या उद्योगास लागला. तें पाहून त्याचे मित्र तेथून निघून आपापल्या घरीं गेले. इकडे एब्राहामानें, मोठ्या मेहनतीनें त्यास पाठीगळीस घेऊन जवळच्या घरीं नेलें; तेथें, त्यास थोडेंसें खाऊं पिऊं घातलें; रात्र भर त्याची शुश्रूषा ठेविली; आणि तो चांगला सावध झाल्यावर त्याला त्याच्या घरीं जाऊं दिलें. त्या खटपटीनें त्याला शीण तर आला नाहींच; परंतु, आपण एका मनुष्यास आज पुष्कळ साह्य केलें, किंबहुना त्याचा जीव वांचविला, असें त्याच्या मनांत येऊन त्याच्या मनाला मोठें समाधान वाटलें. तें समाधान, त्याला कोणीं लाख रुपये दिले असते तरी देखील झालें नसतें. "भूतांची दया हें भांडवल संतां, आपुल्या ममता नाहीं देहीं," असें जें तुकाराम महाराजांनीं ह्मटलें आहे, त्याचें हें एक उदाहरण आहे.

एब्राहाम लिंकन आतां सुमारें सतरा अठरा वर्षांचा झाला होता. तो जर अगदीं परक्या लोकांस इतकें साह्य करीत होता, तर, तो आपल्या घरांतल्या माणसांस फार साह्य करीत असला पाहिजे, हें उघड आहे. त्याच्या आईबापांस संसारकामांत त्याची मदत फार असे. त्यास त्यांनीं लहान मोठें कसेंही काम सांगितलें, तरी तें तो अगदीं मनापासून करीत असे. तें इतकें कीं त्या कामाकडे पुनः पाहावयास नको, असें त्या दोघांस वाटे. त्यांच्या शेतांत माल बराच उत्पन्न होत असे. तो विकायास परगांवीं नेण्यास, त्यानें आपल्या हातानें एक लहानशी होडी केली होती. तींत बसून, तो माल घेऊन जवळच्या बाजाराच्या गांवीं जाई, आणि मोठ्या कसोशीनें आपला माल

विकून सगळा पैसा आपल्या बापाजवळ आणून देई. शिवाय, ती होडी आगबोटीवर उतारू नेण्यास त्यास उपयोगीं पडत असे; आणि त्यावर त्याला कांहीं पैसे मिळत. त्या वेळची एक फार चमत्कारिक गोष्ट, त्यानें स्वतः अध्यक्षाचें काम हातीं घेतल्यावर, आपल्या चिटणिसास सांगितली. ती अशीः—"एके दिवशीं मी आपल्या होडींत नदीच्या कांठीं स्वस्थ बसलों असतां, एक आगबोट नदींत आली; आणि दोन गृहस्थ, थोडेंसें सामान बरोबर घेऊन, नदीच्या कांठीं येऊन मला ह्मणाले कीं, आह्मांस तूं त्या आगबोटीवर नेऊन पोंचविशील, तर आह्मी तुझी मजुरी तुला देऊं. तेव्हां मीं त्या दोघांस माझ्या होडींत घेऊन, त्यांच्या सामानासुद्धां, त्या आगबोटीवर नेऊन पोंचविलें. तेव्हां ते फार खूष झाले, आणि त्यांनीं मला दोन दोन रुपये दिले. ते हातांत पडले तेव्हां मला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें, आणि मोठा आनंद झाला. मीं आपल्या मनांत ह्मटलें, काय! मी असा गरीब मुलगा, आणि मला आज चार साहा घटकांत, चार रुपये मिळाले! दुनयेचा बाजार फार विचित्र आहे! त्या वेळापासून उद्योगाविषयीं मला मोठी उमेद आली, आणि मी मोठ्या हौसेनें आपलीं कामेंकाजें करूं लागलों. अहो चिटणीस, तुह्मांला ही गोष्ट अगदीं क्षुल्लक वाटेल कदाचित्; पण, हिच्या योगानें माझ्या अंतःकरणांत उद्योगाविषयीं जी प्रेरणा झाली, ती खरोखर अवर्णनीय होती बरें!" अशा गोष्टी इतर पुष्कळ मुलांस घडत असतात. परंतु ते एब्राहाम लिंकन नसतात; ह्मणजे, ते विचार करून उद्योगावर निष्ठा ठेवित नाहींत; ह्मणून त्यांपासून त्यांस लाभ होत नाहींत.

ह्या वेळेच्या सुमारास एब्राहाम लिंकनाचें ग्रंथावलोकन बरेंच वाढलें होतें; आणि विद्याचारसंपन्न राष्ट्रांतले लोक किती सु-

त्यांत राहातात, हें त्याच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. तरी, त्याला आपल्या स्थितीविषयीं कधीं वाईट वाटलें नाहीं. त्याला खायाला जाडेंभरडें अन्न, आंगाला धडधाकड वस्त्र, आणि रा-हायाला लहानशी झोंपडी, एवढींच कायतीं सुखसाधनें होतीं; आणखी, त्यास दररोज पुष्कळ वेळपर्यंत काम करावें लागत असे; तरी, तो नित्य आनंदांत असे. कां कीं परमेश्वरानें आपणास जी स्थिति दिली आहे तींत तृप्त असणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें त्यास वाटत असे; आणि

ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें
चित्तीं असों द्यावें समाधान

हेंच देवास आवडतें, अशी त्याची खातरी होती. आणखी, तो मोठा दृढनिश्चयी होता. संसारांत जरा कांहीं मनासारखें झालें नाहीं कीं लागलाच आंगाचा संताप होतो, अशा लोकांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा.

एब्राहाम एकुणीस वर्षांचा झाला, तेव्हां त्याच्या अंगीं कामकाज करण्याची शक्ति चांगली आली, आणि शिवाय तो चांगला सुदृढ व मोठा प्रामाणिक असल्यामुळें, आपल्या आई-बापांच्या आणि आसपासच्या लोकांच्या फार उपयोगीं पडूं लागला. तेथल्या सगळ्या लोकांस असें वाटे कीं, कोणतेंही एकादें काम एब्राहामानें हातीं घेतलें, ह्मणजे तें अगदीं यथा-स्थित व्हावयाचेंच. आणखी, त्याबद्दल त्यास जें कांहीं द्यावें त्यांत तो तृप्त असे, हें दुसरें. तेव्हां, लोक त्याला आपलीं कामें करावयास सांगत, आणि त्याचा सगळा वेळ उद्योगांत जाई ह्यांत कांहीं विशेष नाहीं. एके दिवशीं त्याच्या एका शेजाऱ्यानें त्याला असें सांगितलें कीं, आपल्या होडीवर माझें एवढें धान्य घे, बरोबर माझ्या मुलाला घे, आणि न्यूअर्लीनच्या ज-

वळच्या बाजारांत जाऊन, तेवढें धान्य विकून, त्याची किंमत घेऊन मुलासहवर्तमान परत ये. त्याप्रमाणें, तो सगळी तयारी करून निघाला, आणि त्या बाजाराच्या गांवाजवळ पोंचला. इतक्यांत रात्र पडली. ह्मणून, होडी किनाऱ्यावरच्या एका खुंटास दोरीनें अडकवून ठेवून, एब्राहाम आणि तो मुलगा, दिवसभर दमले होते, ते आपल्या होडीवर स्वस्थ निजले. त्यास कांहीं वेळ झाल्यावर, सात असामी इंडियन लोक चोरी करायास त्या होडीजवळ आले. त्यांची चाऊल कानीं पडतांच एब्राहाम जागा झाला, आणि, त्यानें "कोण आहे" असें मोठ्यानें विचारिलें. त्यास जबाब मिळाला नाहीं, ह्मणून त्यानें पुनः तसेंच विचारिलें. तरी जबाब आला नाहीं. तेव्हां, तो चटकन् उठून उभा राहिला, आणि, हातांत आपला लहान भाला घेऊन, जे दोन तीन इंडियन लोक होडीच्या अगदीं जवळ ठेपले होते, त्यांस त्यानें खूब हात दाखवून मागें हटविलें आणि त्यांचा व त्यांच्या सोबत्यांचा पाठलाग केला. त्या इंडियन लोकांस त्याच्या पुढें धांववेना. ते थकले, तेव्हां त्यांचा चांगला यथास्थित समाचार घेऊन एब्राहाम परत आपल्या होडींत येऊन बसला. ह्या स्वारीमध्यें त्या व्यापाऱ्याचा मुलगा देखील एब्राहामाबरोबर त्या इंडियन लोकांशीं बराच लढला. हे इंडियन लोक गुलाम होते; आणि एब्राहाम जर त्यांच्या तावडीस सांपडता, तर ते त्यास खचीत ठार मारते. परंतु, त्यानें तेव्हां बचावून, मोठ्या पदास चढून, त्या इंडियन लोकांस गुलामपणांतून मुक्त करावें, असा ईश्वरी संकेत होता. जे सात असामी ह्या प्रसंगीं त्यावर उठले होते, त्यांतल्याही कितीएकांची सुटका ह्याचे हातून झाली असेल; नाहीं असें ह्मणवत नाहीं. असो. एब्राहाम त्या मुलास घेऊन सुरक्षितपणें घरीं परत आला, आणि त्यानें पैसा अडका ज्याचा त्यास दिला.

ह्याप्रमाणें मजुरीचें काम करावें; जें कांहीं मिळेल तें बापाजवळ द्यावें; हातीं लागेल तें पुस्तक वाचून टाकावें; फावल्या वेळांत इतर विषयांचा अभ्यास करावा; त्यांत विशेष लक्ष अंकगणिताकडे द्यावें; शेतवाडीच्या कामांत बापास साह्य करावें; जो कोणी भेटेलसवरेल त्यापासून कांहीं तरी नवी माहिती मिळवावी; आपलें व्यवहारचातुर्य वाढेल, अशा प्रकारचे उद्योग करावे; आणि, पडवेल तितकें लोकांच्या उपयोगीं पडून, त्यांची प्रीति संपादावी; असा त्याचा क्रम चालला. आणखी त्यांत त्याची प्रकृति पहिल्यापासून चांगली सदृढ होती; त्यामुळें, त्याच्या ह्या नित्यक्रमांत कधीं खंड पडला नाहीं. तेणेंकरून तो लोकांस पराकाष्ठेचा आवडूं लागला. तो माणसाच्या कित्याप्रमाणें वागत नाहीं, तर देवाच्या कित्त्याप्रमाणें वागतो; त्याला दुसऱ्या माणसांनीं शाहाणें केलें नाहीं, तर तो केवळ आपल्या उद्योगानें शाहाणा झाला आहे; आणि त्याच्या ठायीं जे सद्गुण दिसतात, त्यांत खोटें किंवा तकलादी कांहीं नाहीं, तर जें आहे तें बावनकशी सोन्यासारखें शुद्ध खरें आहे; असें सर्व लोक ह्मणूं लागले. तें सगळें खरें होतें.

एब्राहामाला इंग्रजी भाषेचें व्याकरण येत नव्हतें; आणि परभाषेंतला एक शब्द देखील माहीत नव्हता; तरी, त्याच्या ग्रंथावलोकनाच्या हव्यासानें आणि चौकसपणानें त्याचें ज्ञान पुष्कळ वाढलें होतें. ह्यांतलें मुख्य बीज हें होतें कीं, जें थोडेंबहुत तो वाची, तें पूर्णपणें समजल्यावांचून पुढचें वाचायास लागत नसे. ह्मणजे, पुढें पाठ आणि मागें सपाट असा क्रम त्याचा नव्हता. तर, त्याचें ग्रंथावलोकन हें, अत्यंत कुशल राजा परदेश काबीज करतो, तसें होतें. ह्मणजे जें हातीं लागेल तें पुरतें आपलेंसें करावयाचें, आणि मग पुढें जावयाचें, असें

त्याचें होतें. आणि ज्ञानसंपादनाचें उत्तम साधन हेंच होय.

ह्या वयांत त्याच्यामध्यें एक गुण विशेष होता, तो त्यास फार हितकारक झाला. तो गुण हाच कीं, त्याला आपलें मन, अगदीं एकाग्रतेनें, ह्व्या त्या विषयाकडे लावितां येत होतें; मग तो विषय त्याला पूर्वीं माहीत झालेला असो अगर नसो. हा गुण खरोखर अमोलिक आहे. हा ज्यास साध्य होईल, त्यास कांहींच असाध्य रहावयाचें नाहीं. ज्यांस हा गुण साधतो, त्यांचें ह्मणणें नेहमीं असें असतें कीं, उद्योगांत आवडनिवड पाहावयाची नाहीं; तर, ज्या गोष्टी चांगल्या आणि आपणांस करितां येण्यासारख्या आहेत, त्या करण्याविषयीं आपल्या मनाचा दृढनिश्चय केला पाहिजे; ह्मणजे, कांहीं वेळानें, जें आवडत नसतें, तें आवडूं लागतें. हें खरें आहे.

दुसरा एक विशेष गुण एब्राहाम लिंकनाच्या ठायीं होता, तो ह्या वयांत चांगला स्पष्ट दिसून आला. तो गुण हाच कीं, व्यसनी लोकांच्या सहवासांत नेहमीं राहात असून, एकही व्यसन आपणास न लागूं देणें. हा गुण लहानसान नव्हे. फार मोठा आहे. मनुष्य चांगला किंवा वाईट निपजणें हें केवळ सहवासाचें फल आहे, असा जो एक सिद्धांत पुष्कळ लोकांच्या तोंडीं आहे, तो, केवळ साधारण प्रतीच्या माणसांस मात्र लागू आहे. एब्राहाम लिंकनासारखे जे महापुरुष पृथ्वीवर कधीं कधीं पैदा होतात, त्यांस लागू नाहीं असें ह्मणावें लागतें. ज्या मंडळामध्यें एब्राहामाचा सगळा वेळ कामकाज करण्याच्या संबंधानें जात असे, ते लोक, उडू, उधळे, दारूबाज, आणि सदाचरणाविषयीं काडीभरही परवा न करणारे असे होते. तरी त्यांचा एकही दुर्गुण एब्राहामास जडला नाहीं. ह्यालाच उपजत थोर ह्मणावें.

अत्यंत सत्यशील, अत्यंत परोपकारी, अत्यंत मनमिळाऊ, अत्यंत मेहनती, आणि चार मंडळींत बसला असतां नानाप्रकारच्या दृष्टांतपर गोष्टी सांगून मंडळीस अत्यंत रमविणारा, असा एब्राहाम लिंकन झाला; तेव्हां, तो त्या गांवच्या लोकांस अत्यंत प्रिय होऊन, त्यांच्यांत तो ह्मणेल ती पूर्वदिशा असें झालें, हें अगदीं साहजिक आहे. लोहचुंबकानें लोखंडास आपणाकडे ओढावें, ह्यांत नवल तें कोणतें!

ह्या सुमारास एब्राहाम लिंकन ह्याच्या वयास एकुणीस वीस वर्षें होऊन गेलीं; आणि तो, लवकरच आपला निर्वाह स्वतंत्रपणें करूं लागला. त्याविषयींची हकीकत पुढच्या भागांत सांगूं.

---

## भाग चवथा.

## स्वनिर्वाहाचा स्वतंत्र उद्योग.

समंजस मनुष्यें आपला भार सहसा कोणावर घालीत नसतात. आपलें ओझें होईल तितकें आपण उचलावें, अशी त्यांची इच्छा असते. आणि त्यांचे सगळे उद्योग त्या धोरणानें चालत असतात. एब्राहाम लिंकन हा मुलगा त्या प्रकारचा होता. तो अगदीं लहान होता, तेव्हांपासून आपल्या घरांतल्या कामकाजांत आपल्या आईबापांस साह्य करीत असे, आणि तो जसजसा वयानें मोठा होत चालला तसतसा तो त्याचा हव्यास पुष्कळ वाढला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. इंडियाना प्रांतांत येऊन राहिल्यावर टामस लिंकन ह्यानें एक लहानसें घर बांधिलें. त्या कामांत एब्राहाम ह्यानें पुष्कळच मदत केली. कां कीं, त्या वेळीं तो चांगला सशक्त झाला होता, आणि त्याला सुतारकाम बरेंच येऊं लागलें होतें. त्याप्रमाणेंच, शेतवाडीच्या कामांतही त्याची मदत फार असे.

ते बापलेंक तेथें इतकी मेहनत करून मोठ्या ठाकठिकी संसार चालवीत होते, तरी, त्यांच्या कुटुंबास चैन पडेना. मा णसें वारंवार आजारी पडत, आणि त्यांतलीं एकदोन मरण पा वलीं, त्यामुळें तर त्यांचें चित्त फारच उदास झालें. सगळ्यांच्य मनांत असें भरलें कीं, हा प्रांत सोडून देऊन दुसऱ्या प्रांतां जाऊन राहिल्यावांचून आपणांस बरें वाटावयाचें नाहीं. अश स्थिति प्राप्त झाली ह्मणजे, त्या जागेंतून आपण एकदां कध निघून जाऊं असें त्या माणसांस होतें; आणि तेथें राहणें हें एक दुखणें होतें. तसें ह्या कुटुंबास झालें. तेव्हां, इलिना इस प्रांतांत जाऊन राहण्याचा निश्चय टामस लिंकन ह्यां केला. आणखी त्याच प्रांतीं जाण्यास विशेष इच्छा होण्या कारण असें झालें होतें कीं, त्या प्रांतांतून फिरून त्याचा कोण एक आप्त आला होता, त्यानें त्यास असें सांगितलें होतें कीं त्या प्रांताचें हवापाणी उत्तम असून लोकांस उद्योग पुष्क मिळतो, आणि संसारास सर्व सोई चांगल्या आहेत.

त्याप्रमाणें टामस लिंकन हा, आपल्या सगळ्या कुटुंबा सहवर्तमान, इलिनाइस प्रांतांत जाण्यास निघाला. तेव्ह नद्या भरून चालल्या होत्या, आणि रस्ते वाईट झाले होते त्यामुळें त्या प्रवासांत सर्व माणसांचे अतिशयित हाल झाले त्यांनीं आपलें सगळें सामान गाड्यांत घालून चालविलें होते आणि त्यांतली एक गाडी हांकण्याचें काम एब्राहाम लिंक ह्यानें पतकरिलें होतें. तीं सगळीं माणसें जेमतेम करून, मोठ्य प्रयासानें, नेमलेल्या ठिकाणीं सानगामन ह्या नदीवर सा गामन ह्या गांवीं जाऊन पोंहचलीं. तेथें पुनः नवें घ बांधण्याचा खटाटोप टामस लिंकन ह्यास करावा लागला. त्य कामांत त्यास एब्राहामानें पुष्कळ साह्य केलें; आणि घर



भोंवतीं शेतवाडी करण्यासही तो फार उपयोगीं पडला. त्यानें आपल्या हातानें पुष्कळ रान तोडून जमीन साफ केली; तिच्या भोंवतीं चांगल्या खुंटांची कुंपण घातली; आणि तिच्या उत्पन्नावर कुटुंबाचा निर्वाह चालावा, अशी बहुतेक तजवीज लावून दिली. नंतर, त्याच्या मनांत असें आलें कीं, आपण आतां बरेच मोठे झालों आहों, ह्याकरितां, आपला निर्वाह आपण स्वतः श्रम करून करावा हें आवश्यक आहे. आणि त्याप्रमाणें तो लागलाच शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे जाऊन रोजमजुरीचें काम करूं लागला, आणि स्वतःच्या अन्नावस्त्रापुरते पैसे कमावूं लागला. हें पाहून त्याच्या बापाला किती संतोष झाला असेल बरें! आपल्या स्वतःच्या पायांनीं चालतां येणें हें जसें मनुष्यास आनंददायक आणि हितकारक आहे, तसें, आपल्या स्वतःच्या श्रमांवर आपला निर्वाह चालवितां येणें हें अत्यंत आनंददायक आणि हितकारक आहे. आंगांत उद्योग करण्याचें सामर्थ्य असतां, दुसऱ्याच्या श्रमांच्या फलांवर आपला निर्वाह चालविणें हें, हातपाय चांगले धडधाकड असतां, दाढ्यामिशा आल्या तरी दुसऱ्याच्या कडेवर बसून लहान पोराप्रमाणें फिरण्यासारखें आहे. तें तेजस्वी आणि सुज्ञ माणसांस कधींही आवडत नाहीं; कां कीं, तें अत्यंत लाजिरवाणें आहे. आळसांत वेळ घालविणाऱ्या तरुण मनुष्यांनीं आणि अविभक्त कुटुंबांतील कर्त्या पुरुषाच्या मेहनतीवर निर्वाह करणारांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा.

ह्या नव्या ठिकाणींही त्या माणसांस बरें वाटेना. इतके श्रम करून त्यांनीं घर वगैरे बांधिलें होतें, आणि शेतवाडी केली होती, तरी, त्यांच्या घरांत जो ताप शिरला, त्यानें त्यास तेथें राहणें नको नकोसें केलें. ह्मणून तीं पुनः तेथून निघालीं, आणि कोल्स ह्या प्रांतांत जाऊन राहिलीं. तेथेंही एब्राहाम मा-

गच्या प्रमाणेंच रोजमजुरीचें काम करीत असे. तो शरीरानें धिप्पाड आणि चांगला सशक्त होता; तो आपलें काम अगदीं मनापासून करी; त्याचें काम त्याच्या यजमानास फार पसंत पडे; त्याचें वागणें फार नम्रतेचें आणि इमानाचें असे; आणखी शिवाय, मजुरीविषयीं त्याची खळखळ मुळींच नसे; तेव्हां, आपले कामावर त्यास बोलावण्याविषयीं लोकांच्या उड्या पडत, ह्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. आणखी, त्याचा खर्च कायतो अन्नवस्राचा असे; त्यामुळें त्यास पैसेही थोडे पुरत असत. हें काम करायास तो दर रोज तीन तीन चार चार कोस दूर जात असे. एब्राहामास मजुरीबद्दल रोख पैसाच पाहिजे असे असें नव्हतें; तर, विजारी बंड्यांना कांहीं कापड घेण्याचें ठरवूनही तो लोकांचीं लांकडें फोडण्याचें काम करीत असे.

तेथें असतां, डेंटन ओफट ह्या नांवाच्या एका व्यापाऱ्यानें एब्राहामाचा लौकिक ऐकून त्यास भेटून असें सांगितलें कीं, तुह्मी आपल्या घरांतल्या दुसऱ्या दोघांजणांस बरोबर घेऊन स्प्रिंगफील्ड येथें जर मजकडे याल तर मी तुह्मांस चांगलें काम देईन. तें त्यानें कबूल केलें; आणि त्याप्रमाणें ते तिघे त्याजकडे गेले. तेथें त्या गृहस्थानें होडी तयार करून ठेविली नव्हती. ह्मणून अडलें. तेव्हां ती होडी तयार करण्याचें काम ह्या तिघांजणांनीं केलें, आणि त्या गृहस्थानें त्याबद्दल त्यांस वेगळी मजुरी दिली. त्या होडींत घालून कांहीं रानडुकरें दुसऱ्या एका ठिकाणीं न्यावयाचीं होतीं. तीं त्या होडींत कांहीं केल्या जाईनात. तेव्हां, एब्राहामानें त्यांतलें एक एक धरून अचंबीत उचलून होडींत नेऊन ठेविलें, आणि होडी हांकारिली. ह्मणजे येथें सांगावयाचें मिळून एवढेंच कीं, ह्या कामांत एब्राहाम ह्यास त्याचें बाहुबळ फार उपयोगीं पडलें. हें जर त्याचे ठायीं

नसतें, तर तें काम त्याला त्या वेळीं खचीत करितां आलें नसतें. आणि बाहुबळ जें आहे, तें एकदम मिळवितां येत नाहीं. ह्मणून, तरुण मनुष्यांनीं त्याजकडे लहानपणापासून लक्ष पुरविलें पाहिजे.

एब्राहाम ती होडी घेऊन, न्यूआर्लीन येथें गेला, त्यानें तो सगळा माल मालकाच्या आज्ञेप्रमाणें विकला, आणि त्याचे सगळे पैसे बरोबर हिशेब दाखवून त्यास आणून दिले. तेव्हां त्याला मोठा आनंद झाला; आणि एब्राहाम ह्यास त्यापेक्षां अधिक योग्यतेचें काम सांगण्याचा त्यानें विचार मनांत आणिला. तो असा. न्यूसालेम येथें त्याची एक मोठी वखार होती. तींत माल पुष्कळ होता, परंतु, तेथें त्याचा जो गुमास्ता होता, तो मूर्ख आणि वाईट चालीचा असल्यामुळें, त्या मालकाचें पुष्कळ नुकसान झालें होतें, एवढेंच केवळ नव्हे; तर, त्याचीं बहुतेक गिऱ्हाइकें त्याच्या त्रासानें तुटलीं होतीं. आणि ती वखार चालते किंवा बुडते, अशी त्यास भीति पडली होती. त्या वखारीवर त्या व्यापाऱ्यानें एब्राहाम लिंकनास नेमिलें. तो तेथें जाऊन काम करूं लागल्यावर, तेथल्या सगळ्या लोकांचा लोभ थोडक्याच दिवसांत त्याजवर जडला; आणि जीं गिऱ्हाइकें ती वखार सोडून दुसरीकडे गेलीं होतीं, तीं सगळीं परत आलीं. ह्यास मुख्य कारण एब्राहाम लिंकन ह्याचें सुशीलपण होय. तो कोणास कांहीं फुकट देत नव्हता; कीं, कोणाचें उगाच स्तुतिस्तोत्र करून लोकांस भुलवीत नव्हता. तर त्याचे ठायीं मनमिळाऊपणा, नम्रता, आणि सत्याचरण हे जे अमोलिक गुण होते, त्यांच्या योगानें तो सर्वांस प्रिय होत असे. तोच प्रकार येथें घडला. सुशीलतेसारखा लाभ नाहीं.

हें काम करीत असतां, तो किती इमानें इतबारें वागत असे, ह्याचीं कितीएक उदाहरणें पुस्तकांतून लिहिलेलीं आहेत. कोणे

एके वेळीं एक बाई त्या वखारींत कांहीं जिन्नस घ्यावयास आली. तिनें सुमारें चार साडेचार रुपयांचा माल घेतला, पैसे एब्राहाम लिंकन ह्यास दिले, आणि ती आपल्या घरीं निघून गेली. दिवस मावळला; रात्र पडली; आणि एब्राहाम लिंकन दुकानाची आटपाआटप करून शिल्लक सांकळी मिळवूं लागला. तेव्हां त्याला असें समजलें कीं, त्या बाईचे दोन सवादोन आणे चुकून आपणाकडे अधिक आले आहेत. ती गोष्ट त्याच्या मनाला लागली. त्याला चैन पडेनासें झालें. ह्मणून, त्यानें तेवढे पैसे खिशांत टाकून दुकान बंद केलें, आणि जरी अंधेर फार पडला होता, तरी, त्यांतूनच ठेंचा खात, दोन अडीच कोस पायीं पायीं त्या बाईच्या घरीं जाऊन त्यानें ते पैसे तिला परत दिले. तेव्हां त्याच्या जीवाला बरें वाटलें. दुसरे एके दिवशीं सायंकाळीं असें झालें कीं, अगदीं दुकान बंद करण्याच्या वेळेस मोठ्या लगबगीनें एक बाई तेथें आली, आणि अदशेर चाहा विकत घेऊन पैसे देऊन निघून गेली. दुसरे दिवशीं सकाळीं दुकान उघडून एब्राहाम लिंकन पाहूं लागला तों, ताजव्याच्या एका पारड्यांत मूठभर चाहा त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याच्या मनांत असें आलें कीं, त्या गरीब बाईचा हा चाहा, गडबडींत राहिला असावा. तें त्याला बरें वाटलें नाहीं. तो लागलाच दुकान बंद करून त्या बाईच्या येथें गेला, आणि, तो मूठभर चाहा त्यानें तिला दिला, तेव्हां त्याचा जीव खालीं पडला. वस्तूच्या मोलानें पाहिल्या असतां ह्या दोन्ही गोष्टी अगदीं लहान आहेत. परंतु, एब्राहाम लिंकन हा प्रामाणिक किती होता, हें ह्यांवरून स्पष्ट दिसून येतें.

ह्याच वेळची दुसरी एक फार चमत्कारिक गोष्ट लोक सांगतात, ती अशी. एके दिवशीं दोन तीन बाया त्याच्या दु-

कानावर कांहीं जिन्नस घ्यायाला आल्या होत्या. त्यांशीं एब्राहाम हा बोलत असतां, एक दांडगा लुच्चा तरुण मनुष्य तेथें आला, आणि अद्वातद्वा बोलूं लागला. त्याला लिंकनानें शांतपणानें सांगितलें कीं, एवढ्या बायांस आपलें कामकाज आटोपून येथून जाऊं द्या, आणि मग तुमचें काय ह्मणणें आहे तें सावकाश ऐकून घेईन. त्याप्रमाणें तो कांहीं वेळ चप राहिला; परंतु, त्या बाया गेल्याशा झाल्याबरोबर पहिल्याप्रमाणें त्यानें आपलें तोंड सोडिलें. तें एवढ्याचकरितां कीं, त्याच्या मनांत एब्राहाम लिंकनास चिथवून त्याशीं दोन हात करावयाचे होते. हा त्याचा रोंख एब्राहाम लिंकनाच्या लक्षांत आला. आणि तो सामोपचारानें ऐकत नाहीं असें पाहून, त्यानें त्याचा हात धरून त्याला रस्त्यावर ओढीत नेलें, आणि त्याला एका धक्कीसरसा खालीं जमिनीवर पाडून, असें लोळविलें कीं, एका अर्ध्या घटकेच्या आंत त्याचें तोंडबींड सगळें खरचटून गेलें, आणि तो अगदीं जेरीस येऊन गळा काढून रडत तेथें पडला. त्याजकडे पाहून, एब्राहामास त्याची फार दया आली. आणि त्याची खोड जिरली असें पाहून, त्यानें त्याला हातांत धरून बसलें केलें, थोडेंसें पाणी आणून, त्याचें तोंडबींड स्वच्छ धुवून त्याला सावध केलें, आणि त्याला चांगलें बरें वाटेपर्यंत त्याची सगळी शुश्रूषा ठेविली. ह्याचा परिणाम असा झाला कीं तो व्रात्य मनुष्य तेव्हांपासून अगदीं निवळला, आणि सुशील झाला, आणि एब्राहाम लिंकनाची आणि त्याची मोठी मैत्री जमली. एब्राहाम लिंकन ह्यानें त्या मनुष्याशीं जी झोंबी केली, ती रागानें किंवा त्याला शासन करण्याकरितां केली नाहीं; ती चालली होती तेव्हां रागाचें चिन्ह त्याच्या चर्येवर मुळींच दिसलें नाहीं. तर, त्यानें ती कुस्ती केवळ निरुपायास्तव, त्या माण-

साच्या हौसेकरितां केली, असें ह्मटलें तरी चालेल. साधु जे आहेत, ते सगळ्याच गोष्टी दुसऱ्याच्या संतोषार्थ करीत असतात. त्यांतलीच ही एक समजावयाची.

त्या न्यूसालेम गांवांत एक दांडगी टोळी होती. ती ठोल्यांची टोळी ह्मणून प्रसिद्ध असे. गांवांतले सगळे लोक तिला नमून राहत असत. कां कीं, जो कोणी त्यांशीं विरोध करी, त्यास कोठें तरी एकीकडे गांठून ते खूब मारीत असत. आणखी गांवांत कोणी नवा आला, ह्मणजे त्याला तंबी देऊन, त्याच्या आंगीं कुवत कशी काय आहे ती पाहावयाची, असा त्यांचा पाठ असे. त्यांतल्या एका चांगल्या ताठ जवानाशीं एब्राहाम लिंकनानें कुस्ती करावी असें ठरलें. त्याप्रमाणें नेमल्या वेळीं नेमल्या ठिकाणीं त्यांची कुस्ती झाली. तेव्हां तो जवान अगदीं चीत होण्याच्या बेतास आला; तें पाहून, त्याचे जे सगळे सोबती भोंवताले उभे राहून मौज पाहात होते, ते लागलेच गर्दी करून त्याच्या साह्यास धांवून आले; आणि त्यांनीं एब्राहामास पुष्कळ मारहाण करून खालीं जमिनीवर पाडिलें आणि आपल्या सोबत्यास त्या संकटांतून सोडविलें. तोंपर्यंत एब्राहामास नांव ठेवण्यास त्यांस तिळभर देखील कारण सांपडलें नव्हतें; तरी, इतका मार खाल्ल्यावर उठून उभा राहील तेव्हां तो खूब संतापेल, आणि भलभलतें बोलेल, तें कारण धरून आपण त्याला पुनः तुडवूं असा त्या मंडळीचा विचार होता. परंतु, तो अगदीं फसला. एब्राहाम लिंकन, त्या मंडळीबरोबर हंसतच आंग झाडून उभा राहिला, आणि तो, त्यांच्या मंडळींतल्या एकाद्या मनुष्याप्रमाणें, मोठ्या सलगीनें त्यांशीं बोलूं लागला. हें पाहून, त्यांस फार वाईट वाटलें. ते आपले ठिकाणीं खजील झाले; एवढेंच नव्हे, तर अशा मनुष्यांशीं आपला स्नेह असावा,

अशी फार इच्छा त्यांना झाली. आणि त्याप्रमाणें ते त्याशीं वागूं लागले. गांठी पडल्यावर तो त्यांशीं मोकळ्या मनानें बोलत चालत असे. पण, त्यांच्या आंगच्या दुर्गुणाचा गंध देखील त्यानें आपणास लागूं दिला नाहीं. उत्तम सुवासिक पुष्प घाणेरड्या मातींत पडलें, तरी, त्या मातीची घाण त्याला लागत नाहीं, असें सांगतात. त्याचें हें एक उदाहरण आहे.

ह्या दुकानाच्या कामावर असतां, एब्राहाम हा फावल्या वेळांत विद्याभ्यास करीत असे. त्याच्या मनांत इंग्रजी भाषेचें व्याकरण शिकावयाचें फार आलें. पण, त्याला व्याकरणाचें पुस्तक तेथें कोठें मिळेना. तथापि, पांचचार कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या एका गृहस्थाजवळ व्याकरणाचें पुस्तक आहे, असें त्याला कोणीं सांगितल्यावरून, तो लागलाच पायीं पायीं त्याजकडे गेला, आणि तें पुस्तक त्याजपासून आणून, त्याच्या साह्यानें व्याकरणाचा अभ्यास करूं लागला. त्यांत त्याला कितीएक गोष्टी समजत नसत. त्या तो ग्रीन ह्या नांवाचा कोणी वकील तेथें राहात असे, त्याबरोबर प्रसंगोपात्त फिरायास जाऊन, त्यापासून समजून घेत असे. अशा प्रकारें करून तें व्याकरण त्याला चांगलें समजलें. तेव्हां, तो एका मित्राला ह्मणाला, "शास्त्रीय ज्ञान ज्याला ह्मणतात, तें जर हेंच असलें, तर, दुसऱ्याही एकाद्या विषयाचें शास्त्रीय ज्ञान मी सहज संपादीन. त्यांत मला कांहीं कठिण वाटत नाहीं." आणि खरोखरच त्यांत कांहीं कठिण नाहीं. मनुष्यानें निश्चयानें उद्योग मात्र केला पाहिजे.

एब्राहाम लिंकन हा ग्रीन ह्याशीं अनेक प्रकारच्या गोष्टी बोलत असे. त्यांत, लोक उदयास कसे येतात आणि मोठ्या पदास कसे चढतात, ह्याविषयींही वारंवार पुष्कळ बोले. तो

त्याला आपल्या स्वतःच्या घराण्याविषयीं एकदां असें ह्मणाला कीं, "आमच्या घराण्यांतले सगळे पुरुष चांगले बुद्धिवान् होते. पण, त्यांतला कोणीही उदयास आला नाहीं कीं मोठ्या पदास चढला नाहीं, हें कसें झालें कोण जाणे. आतां माझें काय होतें पाहावें." दुसऱ्या एका प्रसंगीं ग्रीन ह्यास तो असें ह्मणाला कीं, "लोक ज्यांना मोठे लौकिकवान् ह्मणतात, त्यांशीं मी पुष्कळ वेळां बोललों आहें, आणि त्यांचे ठायीं काय गुण असतात ते पाहिले आहेत; परंतु, त्यांच्यामध्यें आणि इतर लोकांमध्यें फारसें अंतर मला दिसलें नाहीं." हें कांहीं खोटें नव्हे. बारीक दृष्टीनें पाहिलें ह्मणजे हा अनुभव सर्वांस येण्यासारखा आहे. थोर पुरुष आणि इतर लोक ह्यांच्यामध्यें मुख्य अंतर ह्मटलें तर एवढेंच कीं, थोर पुरुष जे असतात ते 'जनीं वंद्य' तें नुसतें समजून घेऊन स्वस्थ बसत नाहींत, तर तें करण्याचा प्रयत्न करितात, आणि इतर जन जे असतात, ते तें नुसतें समजून घेऊन वाखाणून स्वस्थ बसतात.

ह्या सुमारास तेथें लहान लहान सभा अनेक ठिकाणीं भरत असत. त्यांस अगदीं नेमानें एब्राहाम लिंकन हा जात असे, आणि त्यांत भाषणें करीत असे. त्याला जी प्राप्ति होती, ती त्याच्या निर्वाहास पुरण्याची जरी मारामार पडत असे, तरी तो त्यांतल्या त्यांत अडचण सोसून, एक वर्तमानपत्र कितीएक वर्षेंपर्यंत घेत असे; आणि तें सगळें लक्षपूर्वक वाचीत असे. त्या पत्रांत राज्यव्यवस्थाप्रकरणीं जे विषय येत असत, ते त्याला फार आवडत असत. त्याला ज्ञानाची अभिरुचि फार लागली होती. त्यामुळें, दुकानांतलें आणि इतर बाहेरचें काम मोठ्या नेटानें यथास्थित आटोपून, त्यांतल्या त्यांत, सवड साधेल तेवढ्यांतच, तो करवेल तितकें ग्रंथावलोकन करीत असे. ह्या वे-

ळेच्या सुमारास ज्या एका गृहस्थानें त्यास पाहिलें होतें, त्यानें त्याविषयीं असें वर्णन केलें आहे कीं, "लिंकन हा, आपल्या यजमानणीच्या मुलास उगी करण्याकरितां पाळण्यांत घालून आंदुळीत असतां देखील मध्येंमध्यें हातांत पुस्तक घेऊन अगदीं एकाग्रचित्तानें वाचीत असे, हें मीं पाहिलें आहे." खरोखर ज्ञानसंपादनाचा उत्तम मार्ग हाच होय. त्यास अमुकच स्थल पाहिजे किंवा अमुकच काल पाहिजे असें कांहीं नाहीं. त्याचा ध्यास असला, ह्मणजे तें, भगवच्चिंतनासारखें, पाहिजे तेथें आणि पाहिजे तेव्हां करतां येतें. वामनपंडितांनीं एके ठिकाणीं जनांस बोध केला आहेः—

## श्लोक.

अहो येतां जातां बसत उठतां कार्य करितां
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां
घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं.

असा सद्बोध, ज्ञानसंपादनाच्या संबंधानें लिंकन ह्याच्या अंतःकरणांत भरला होता. आणि त्याप्रमाणें तो निरंतर वर्तत असे, असें दिसतें.

हें सगळें ठीक चाललें होतें. परंतु, ज्या व्यापारांत लिंकनास चाकरी मिळाली होती, तो व्यापार, त्यांतल्या एका आळशी आणि अव्यवस्थित मनुष्याच्या मूर्खपणानें, एकाएकीं बसला. तो इतका कीं, थोडक्याच दिवसांत लिंकनास उद्योग नाहींसा होऊन स्वस्थ घरीं बसावें लागलें. ही स्थिति जरी त्याला प्राप्त झाली, तरी, ह्या वेळीं त्याची योग्यता पुष्कळ वाढली होती. तो स्वभाषेच्या व्याकरणांत प्रवीण झाला होता. मोठमोठ्या ग्रंथकारांचे मोठमोठे ग्रंथ वाचून त्यानें विपुल ज्ञान

संपादिलें होतें. त्या ज्ञानाच्या योगानें त्याच्या वर्तनांत सरलता, सत्यशीलता, सूक्ष्मदृष्टित्व, आणि न्यायानें वागण्याविषयीं दृढनिश्चय हे गुण पुष्कळ वृद्धि पावले होते; आणि त्यांच्या योगानें लोकांत त्याचें वजन वाढून, जरा कोठें कांहीं वाद पडला ह्मणजे त्याचा निकाल लिंकन सांगेल तो खरा, असें झालें होतें. हा मान सामान्य नव्हे. संपत्तीच्या किंवा दुसऱ्या एकाद्या वस्तूच्या जोरावर जो मान मिळविलेला असतो, तो, खरोखर पाहिलें असतां, त्या माणसाचा नसतो; तर, तो त्या वस्तूचा असतो. तशा प्रकारचें बाह्यसाधन लिंकन ह्याजपाशीं कांहींएक नव्हतें. तेव्हां, हीं जी त्याची योग्यता वाढली होती, ती, स्वतः त्याच्या आंगच्या गुणांची ह्मणजे पर्यायेंकरून स्वतः त्याची होती, हें खचीत आहे. आणि माणसाची खरी योग्यता ह्मटली ह्मणजे अशीच असली पाहिजे.

---

## भाग पांचवा.

### अभ्युदय.

प्रसंगावांचून मनुष्याच्या गुणांची परीक्षा होत नाहीं. अतिशयित अपमान सोसण्याचे प्रसंग जर धर्मराजावर गुदरले नसते, तर त्याच्या अप्रतिम सहनशीलतेची परीक्षा झाली नसती. नारायणरावाच्या वधासारखें घोर कर्म राघोबादादाच्या हातून जर पेशव्यांच्या कुळांत झालें नसतें, तर, रामशास्त्रीबावांची अतुल निस्पृहता कधीं प्रगट झाली नसती. त्याप्रमाणें, अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांमध्यें, लिंकनाच्या वेळीं, जर वेगळ्या वेगळ्या प्रकारचे आणीबाणीचे प्रसंग प्राप्त झाले नसते, तर त्याचे आंगचे कितीएक सद्गुण जशाचे तसे, बाहेर न येतां, जागचे जागीं नाहींतसे झाले असते. परंतु, दैवशाली पुरुषांस

असे योग, अगदीं अप्रयत्न प्राप्त होतात; आणि त्यांच्या घडामोडींत ते उदयास येतात. असेंच एब्राहाम लिंकन ह्याचें झालें. त्याचा मूळ प्रकार असाः—

युरोपांतल्या लोकांनीं उत्तरअमेरिकेंत जाऊन, मोठ्या प्रयासानें तेथें वसाहती केल्या, आणि राज्यें स्थापिलीं खरीं; तरी, पुढें कितीएक वर्षेंपर्यंत तेथचे मूळचे राहाणारे रानटी लोक, आपल्या जंगलांतून झुंडीझुंडींनीं येऊन, त्यांच्या मुलुखांत दांडगावा करीत असत, आणि त्यांस फार त्रास देत असत. त्यांचा बहुतेक सगळा क्रम, आपल्या ह्या देशांत पूर्वीं पेंढारी लोक असत, त्यांच्यासारखा असे. त्या लोकांमध्यें स्याक ह्मणून एका जातीचे लोक होते. त्यांचें राहण्याचें ठिकाण मिसिसिपी नदीच्या पश्चिमेकडच्या किनाऱ्यावर होतें; आणि त्यांचा मुख्य नाईक ब्ल्याकहाक ह्या नांवाचा होता. त्या लोकांनीं नेहमीं, आपल्या हद्दींत, मिसिसिपी नदीच्या पलीकडे रहावें, आलीकडे येऊं नये, असा तह ह्या एकुणिसाव्या शतकाच्या आरंभीं ठरला होता. परंतु, तो एकीकडे ठेवून, इ० स० १८३० ह्या वर्षीं, ब्ल्याकहाक हा, आपल्या तीन चारशें लोकांसहवर्तमान, मिसिसिपी नदी उतरून आलीकडे आला, आणि युनाइटेडस्टेट्स् प्रजासत्ताक राज्याच्या ताब्यांतल्या मुलुखांत दंगा करूं लागला. त्या वेळीं त्या प्रांताचा सुभेदार रेनाल्ड्स् हा होता, आणि सेनापति गेन्स हा होता. त्यांनीं, मोठ्या त्वरेनें आपलें सैन्य एकत्र करून त्याजवर पाठविलें. तेव्हां, ब्ल्याकहाक हा त्यास भ्याला, आणि अमेरिकन लोकांशीं तह करण्यास कबूल झाला. त्याचें बोलणें युनाइटेडस्टेट्स् सरकारानें मान्य केलें. तेव्हां, ब्ल्याकहाक ह्यानें असें कबूल केलें कीं, मी पूर्वींच्या तहाप्रमाणें अगदीं बरोबर वागेन; त्यांत तिळमात्रही अंतर पडूं देणार नाहीं.

तेव्हां ती मोहीम आटपल्यासारखी वाटली. परंतु, ती सगळी लवाडी होती. ब्ल्याकहाक ह्याची तयारी बरोबर नव्हती आणि त्याच्या मनांत ती चांगली करावयाची होती, ह्मणून त्यानें तें वचन दिलें होतें. ती तयारी यथास्थित झाल्याबरोबर, तो पुनः इ० स० १८३२ ह्या वर्षी, मिसिसिपी उतरून आलीकडे आला. तेव्हां त्या प्रांताचा सेनापति एटकिनसन हा होता. त्यानें त्यास कानउघाडणीचा निरोप पाठविला. त्यावर त्यानें फार उद्दामपणाचें उत्तर दिलें. तेव्हां अर्थातच, तो सेनापति आणि सुभेदार रेनाल्ड्स् हे आपल्या सैन्याच्या तयारीस लागले. ह्या तयारीमध्यें एक विशेष पर्याय होता; त्या पर्यायाचा आणि एब्राहाम लिंकनाचा संबंध होता; आणि तो पर्याय आलीकडे इंग्लिश सरकारानें ह्या देशांत चालू केला आहे. त्याची माहिती इकडच्या लोकांस फारशी नाहीं. ह्मणून त्याविषयीं येथें चार शब्द लिहिणें हें आवश्यक दिसतें.

इंग्लंड, जर्मनी इत्यादि विद्याचारसंपन्न राष्ट्रांमध्यें राज्याच्या रक्षणार्थ पुष्कळ सैन्य ठेवलेलें असून, प्रसंग पडल्यास अडचण जाणवूं नये ह्मणून अशी एक योजना केलेली असते कीं, आपल्या राजाच्या आणि राज्याच्या हितार्थ, प्रजाजनांपैकीं ज्या कोणांस आपले आंगची शिपायगिरी दाखवावयाची असते, अथवा कोणत्या तरी प्रकारानें आपल्या राष्ट्राच्या उपयोगीं पडावयाचें असतें, त्यांस सरकारांत आपलीं नांवें लिहून देण्यास आणि कवाईत वगैरे शिकण्यास मोकळीक असते. असे राजनिष्ठ लोक सरकारापाशीं पगार मागत नाहींत, एवढेंच केवळ नव्हे, तर, आपल्या खाण्यापिण्याचा, वस्त्रप्रावरणाचा, आणि शस्त्रास्त्रांचा सगळा खर्च आपल्या घरच्या ग्रासींतून करितात. आणि ज्यांस असा कांहीं घरचा पुरवठा नसतो, त्यांस, नौकरी-

च्या वेळीं अन्नवस्त्र आणि शस्त्रास्त्रें सरकार पुरवितें. असें सैन्य तयार ठेवण्याचा प्रघात आज कितीएक वर्षांपासून पडला आहे. ह्या आपल्या हिंदुस्थानांतही हा प्रकार इंग्रजसरकारानें चालू केला आहे. परंतु, अशा प्रकारें आपल्या राष्ट्राच्या उपयोगीं पडण्याची मोकळीक सरकारानें सगळ्या रयतलोकांस दिली नाहीं; तर युरोपियन लोकांस, पार्शी लोकांस आणि ह्या देशांतल्या ख्रिस्ती धर्माच्या लोकांस मात्र ती मोकळीक दिली आहे. ह्याचें कारण अगदीं उघड आहे. तें हें कीं, अन्य धर्माच्या लोकांच्या राजनिष्ठेवर सरकाराचा विश्वास नाहीं. असो. अशा प्रकारें जें सैन्य ठेवितात, त्यास इंग्रजींत "व्हालंटियर्स" असें ह्मणतात. ह्या शब्दाचा सामान्य अर्थ, आपल्या खुषीनें केवळ स्वराज्यरक्षणार्थ, बनलेले शिपाई, असा घ्यावयाचा. ह्मणून आतां, व्हालंटियर्स हा शब्द इतर मराठी शब्दांप्रमाणें प्रचारांत आणण्यास कांहीं हरकत नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें सेनापति एटकिनसन आणि सुभेदार रेनाल्ड्स् ह्यांनीं लढाईची जी तयारी चालविली, तिच्या आरंभींच, व्हालंटियर ठेवण्याविषयींचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. ह्मणजे सर्व लोकांस असें जाहीर केलें कीं, सरकारास सैन्याची फार गरज आहे, ह्याकरितां व्हालंटियर ठेवावयाचे आहेत; तर ज्यांची इच्छा व्हालंटियर होण्याची असेल, त्यांनीं नेमलेल्या ठिकाणीं अधिकाऱ्यांकडे हजर होऊन आपलीं नांवें नोंदवावीं. आणखी ह्या सुमारास एब्राहाम लिंकन ह्याला कांहीं एक उद्योग नव्हता. ह्मणून, न्यूसालेम गांवांतल्या इतर कांहीं मंडळीबरोबर त्यानें आपलें नांव व्हालंटियरांत घातलें. त्या मंडळीमध्यें, मागें सांगितलेल्या दांडग्या टोळींतले किती एक लोक होते. ते सगळे एब्राहाम लिंकनाचे मित्र झालेले होते; त्याजवर त्यांची

भक्ति बसली होती, आणि त्यांचें ह्मणणें असें पडलें कीं, आ पल्या तुकडीचा अधिकारी ह्मणजे कपतान एब्राहाम लिंकन झाला पाहिजे. पण, तो अधिकार आपणास मिळावा, हें एब्राहाम लिंकनाच्या स्वप्नींही नव्हतें; कां कीं, असें अमलदारीचे काम चालविण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं आहे असें त्याच्या कधीं मनांत येत नसे. आणखी त्यामध्यें दुसरी एक मौज अशी झाली होती कीं, त्या व्हालंटियरांमध्यें कर्कपाट्रिक ह्या नांवाचा एक गृहस्थ होता. तो चांगला वजनदार आणि संभावित होता. त्याला कपतान करावें, असा आग्रह त्यांतल्या कांहीं मंडळीचा होता. शिवाय, पूर्वी एकदा एब्राहाम लिंकन हा कर्कपाट्रिक ह्याच्या येथें चाकरीस राहिला होता; आणि कर्कपाट्रिक हा स्वभावानें जरा जलाल असल्यामुळें व त्यानें एब्राहाम लिंकनास विनाकारण त्रासविल्यामुळें त्यानें त्याची चाकरी सोडिली होती. त्या दोघांचें तें पहिलें नातें नाहींसें होऊन, आतां असा वेळ प्राप्त झाला कीं, अधिकारावर नेमण्यास त्या दोघांतून कोणाला तरी एकाला निवडावयाचें. तेव्हां हा प्रसंग कर्कपाट्रिक ह्या मानी पुरुषास मोठ्या आणीबाणीचा वाटला असावा, आणि एब्राहाम लिंकनास मागें टाकून आपण पुढें सरण्याविषयीं त्यानें आपली पराकाष्ठा केली असावी, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

पण तें त्याला साधलें नाहीं. तेव्हां अशी वहिवाट होती कीं, व्हालंटियर सैन्यामध्यें जे अमलदार नेमावयाचे, ते, त्या सैन्यांतल्या लोकांच्या बहुमताप्रमाणें नेमावयाचे. आणि तें बहुमत पाहाण्याची त्या लोकांतली रीति अगदीं सोपी होती. तीप्रमाणें, सगळे व्हालंटियर लोक एके ठिकाणीं जमविले; तेथें, एब्राहाम लिंकन आणि कर्कपाट्रिक ह्यांस बोलावून नेऊन

दोहोंकडे उभें केलें; आणि सैन्यांतल्या लोकांस असें सांगितलें कीं, ज्याचें मन ज्याच्या विषयीं अनुकूल असेल, त्यानें एकदम त्याजपाशीं जाऊन उभें राहावें. तें कानीं पडतांच, बहुतेक—ह्मणजे शेंकडा ऐशीं नव्वद—लोक, एकदम एब्राहाम लिंकनाजवळ जाऊन उभे राहिले. आणि जे कोणी—शेंकडा दाहावीस—कर्कपाट्रिकाकडे गेले होते, ते देखील, लाजून एब्राहाम लिंकनाच्या मंडळींत येऊन मिळाले. ह्मणजे, व्हालंटियरांचे सगळे लोक एब्राहाम लिंकनाकडे आले, आणि विचारा कर्कपाट्रिक, निराश होऊन खट्टू होऊन आणि वाईट तोंड करून खालीं भुईकडे पाहत एकटाच उभा राहिला. त्या प्रसंगीं त्याला किती वाईट वाटलें असेल हें त्याचें त्यालाच विचारिलें पाहिजे. असो. एब्राहाम लिंकन हा पुढें मोठ्या पदास चढल्यावर देखील असें सांगत असे कीं, ह्या निवडणुकीपासून माझ्या अंतःकरणास जो कांहीं आल्हाद झाला, त्याच्या अर्ध्याइतका सुद्धां आल्हाद पुढें घडलेल्या गोष्टींपासून मला कधीं झाला नाहीं.

ह्या प्रकारेंकरून एब्राहाम लिंकन हा कपतान झाल्यावर, त्याच्या हाताखालच्या तुकडीस आणि आसपास अशाच तयार झालेल्या दुसऱ्या तुकड्यांस बेर्डस्टौन ह्या ठिकाणीं जाण्याचा हुकूम झाला. हें ठिकाण इलिनाइस नदीच्या किनाऱ्यावर आहे. तेथें एब्राहाम लिंकन गेल्यावर, त्याची आणि जान स्टूअर्ट ह्याची गांठ पडली आणि त्यांच्या स्नेहास आरंभ झाला. जान स्टूअर्ट हा वकील होता; आणि तो, एब्राहाम लिंकनाप्रमाणें आपण होऊन लष्करी चाकरी पतकरून तेथें आला होता. त्यानें एब्राहाम लिंकनाविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "तो आपल्या हाताखालच्या लोकांस प्राणापलीकडे जपत असे; तो स्वभावतःच अत्यंत मनमि-

ळाऊ असे; आणि त्यास नानाप्रकारच्या गोष्टी फार चित्तवेधक रीतीनें सांगतां येत असत; त्यामुळें त्याला सर्व लोक अतिशयित भजत असत. शिवाय, त्याची शरीरसंपदा उत्तम होती. तो मोठा धिप्पाड पुरुष असून, जबरदस्त कुस्तीबाज होता. त्याच्या कुस्तीची मौज झाल्यावांचून एक देखील दिवस सुना जात नसे. आणखी ह्या कामांत त्याचा हात धरणारा, त्या सगळ्या सैन्यामध्यें, थामसन ह्या नांवाच्या एका मनुष्याखेरीज, दुसरा एक देखील मनुष्य नव्हता. आणि तो थामसन तरी, आपल्या सामनेवाल्यांना, चीत करी तो डावपेंचांनीं करी; त्याच्या ठायीं खरोखर शक्ति कांहीं मोठी नव्हती. ह्मणजे, त्या जमलेल्या सगळ्या लष्करांत, खरोखर शरीरबलानें एब्राहामाच्या बरोबरीचा एक देखील मनुष्य नव्हता. शिवाय, तो देखणाही बरा असे. त्यामुळें सगळ्या लोकांत त्याला मोठा मान असे. ” कुस्तीच्या कामांत डावपेंच ही तरी एक कळा आहे. ती चांगली आहे. परंतु आंगांत बळ नाहीं ह्मणून तिचा उपयोग करावयाचा, असें असतें. ह्मणजे, शरीरबलाची योग्यता तीपेक्षां फार मोठी आहे.

हें व्हालंटियर सैन्य बेर्डस्टौन येथून निघालें, आणि, सरकाराच्या हुकुमाप्रमाणें, राक ह्या नदीच्या मुखाकडे चाललें. त्याचा मुख्य अधिकारी व्हाइटसाइड हा होता. त्या सैन्याची आणि सरकारी सैन्याची गांठ प्राफेट्सटौन येथें पडावी, असें ठरलें होतें. परंतु, त्याची परवा न करितां, व्हाइटसाइड ह्यानें, तेथें आल्यावर सरकारी सैन्याची वाट न पाहातां, तें खेडें जाळून टाकिलें, आणि पुढें चाल केली. ते डिक्सनफेरी येथें येऊन पोहोंचले. त्या प्रवासांत त्या सगळ्या मंडळीचे फार हाल झाले. परंतु, एब्राहाम लिंकनास त्याचें कांहीं वाटलें नाहीं. कां कीं,

त्याला तान्ह भूक काढण्याची व पुष्कळ श्रम करण्याची संवय पहिल्यापासूनच होती.

डिक्सनफेरी येथें ह्या लष्कराचा तळ पडला असतां, त्यास सरकारच्या सैन्याची एक तुकडी अगदीं घाबरून येऊन मिळाली. कां कीं, ब्ल्याकहाक ह्याच्या सैन्यानें तिचा पराभव केला होता, आणि त्यांस पळायास लाविलें होतें. तेथें लागलीच लष्करी अमलदारांची एक सभा भरली, आणि ब्ल्याकहाक ह्याचें सैन्य अमुक एक ठिकाणीं असल्याची जी खबर आली होती, तिच्या धोरणानें त्यावर एकदम हल्ला करावयाचा असें ठरलें. आणि त्याप्रमाणें तिकडे चाल केली सुद्धां. परंतु, पुढें असा प्रसंग येणार असें आधींच समजून, ब्ल्याकहाक ह्याचे लोक तेथून पळून गेले होते. त्यामुळें त्या तयारीचा आणि श्रमांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

ह्या वेळेस सरकारी सैन्य आणि व्हालंटियर सैन्य मिळून एकंदर चोवीसशें सैन्य ब्ल्याकहाक ह्याच्या पारिपत्यास तयार झालें; आणि त्यावर स्वारी करण्याचा विचार ठरला. इतक्यांत व्हालंटियर लोकांची मुदत सरली, आणि ते पुढें येण्यास कुरकुरूं लागले. कां कीं, त्यांस आपापल्या घरीं जाण्याची इच्छा फार झाली होती. खुशी नसल्यास मुदतीबाहेर ठेवावयाचे नाहींत, असा पहिला करार असल्यामुळें, त्यांस मोकळें करणें हें सरकारास आवश्यक वाटलें. त्याप्रमाणें लागलेंच त्यांना मोकळें केलें; परंतु, ब्ल्याकहाक ह्याचें पारिपत्य करण्याचें काम तसेंच शिलक राहिलें होतें. ह्मणून, नवीन व्हालंटियर ठेवण्याचा जाहीरनामा लागलाच प्रगट केला. आणखी त्यांत असेंही सुचविलें कीं, पहिल्या व्हालंटियर लोकांपैकीं जे कोणी आपल्या खुशीनें पुन्हां व्हालंटियर होतील, त्यांसही सरकार घेईल. ए-

ब्राहाम लिंकन ह्याला दुसरा कांहीं उद्योग नव्हता; आणि, ज्या कार्याकरितां आपण व्हालंटियर झालों, त्या कार्याची सिद्धि झाल्याशिवाय जाणें हें प्रशस्त नाहीं, असें त्याला वाटलें, ह्मणून, त्यानें आपलें नांव नव्या व्हालंटियरांत लिहून दिलें. त्याप्रमाणें व्हाइटसैड हाही नव्या व्हालंटियरांत मिळाला.

नंतर, उभयपक्षांच्या लढाया ग्यालेना, बरओकग्रोव्ह इत्यादि ठिकाणीं झाल्या. त्यांत व्हालंटियर लोक फार थकले, आणि त्यांतले पुष्कळ लोक लष्कर सोडून गेले. परंतु एब्राहाम लिंकन हा आपली कामगिरी उत्तम प्रकारें बजावीत राहिला. पुढें कांहीं वेळानें, बाडआक्स येथें उभयपक्षांची मोठी लढाई होऊन, ब्ल्याकहाक ह्याचा अगदीं पराभव झाला. त्याचे साठ लोक समरांगणीं पतन पावले, आणि पुष्कळ लोक जखमी झाले. त्याच्या सैन्यांतले बाकीचे लोक मिसिसिपी नदीच्या पलीकडे पळून गेले. आणखी, स्वतः ब्ल्याकहाक हा, आपल्या मुख्य योद्ध्यांसहवर्तमान, सरकाराच्या सेनापतींच्या हातीं लागला. अशा प्रकारें ह्या मोहिमेचा शेवट झाला.

तेव्हां अर्थातच लिंकन आणि त्याच्या बरोबरची मंडळी तिकडून आपापल्या गांवीं परत आली. त्या सुमारास, त्या प्रांतांत मोठी गडबड चालली होती. ह्मणजे, राज्यकारभार चालविण्याकरितां त्या देशांत जी कांग्रेस ह्मणून सभा आहे, तिचे सभासद निवडण्याचें काम होत होतें. त्या सभेंत जागा मिळणें हें मोठें भूषणास्पद असल्यामुळें, त्या जागांवर मोठमोठ्या लोकांच्या उड्या होत्या. आणि, कोणीकडून तरी लोकांनीं आपणांस पुष्कळ मतें देऊन त्या सभेंत पाठवायास निवडावें, ह्मणून त्यांचे भगीरथ प्रयत्न चालले होते. त्या कृत्यांत पैसा, वजन, वशीला, इत्यादि सगळ्या प्रकारचे उपाय त्या लोकांनीं

योजिले होते. आणि चोहींकडे एकच धामधूम चालली होती. अशा मोठ्या खटपटींत लिंकनासारख्याचें काय चालावयाचें! कां कीं, वर सांगितलेल्या साधनांतलें एक देखील साधन त्या बापड्यास अनुकूल नव्हतें. परंतु, मनुष्याचें खरें थोरपण जें आहे त्याचा प्रभाव कांहीं वेगळा असतो. त्याच्या तेजापुढें इतर सगळ्या खटपटी फिक्या पडतात. हा प्रकार ह्या प्रसंगीं घडून आला. स्वतः लिंकनानें त्याविषयीं मुळींच उद्योग केला नाहीं; आणि ह्यांत ह्मणजे आपलें नांव कोणी घेईल, असें त्याच्या ध्यानीं मनीं देखील नव्हतें. परंतु तो फार थोरमनाचा आहे, तो स्वहितापेक्षां परहिताकडे अधिक लक्ष देणारा आहे, तो खरा सत्यशील आहे, आणि जें काम तो हातीं घेईल तें काम तो कायावाचामनेंकरून करील, अशी सर्व लहान मोठ्या लोकांची खातरी असल्यामुळें, आणि तो सगळ्यांस फार आवडत असल्यामुळें, त्याला निवडण्याविषयीं, इतर लोकांपेक्षां पुष्कळ अधिक, ह्मणजे २७७ मतें पडलीं. तेव्हां सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. वास्तविक पाहिलें असतां, उत्तम सोनें उत्तम ठरलें, ह्यांत कांहीं नवल नव्हतें.

ह्या प्रकारें करून, लिंकन ह्यास सभासद नेमण्याविषयीं जरी पुष्कळ मतें पडलीं, तरी, एकंदर सगळ्या प्रांतांतल्या लोकांच्या निवडीच्या घालमेलींत, त्याचें नांव मागें पडलें. त्याविषयीं त्याला स्वतः मुळींच कांहीं वाटलें नाहीं. परंतु, त्यास निवडण्याकरितां ज्यांनीं एवढी खटपट केली होती, त्यांस मात्र फार वाईट वाटलें. असो.

ह्या सुमारास एब्राहाम लिंकन ह्यास कांहीं कामधंदा नव्हता. ह्मणून, आतां पुढें कोणता उद्योग करावा, ह्या विचारानें त्याचें मन वेधलें. अशा विचारांत अनेक अडचणी असतात. त्यांतली

मोठी अडचण ही कीं, अमुक धंदा आपणास येण्यासारखा आहे, आणि तो केला असतां आपला निर्वाह चालेल, पण तो माझ्या योग्यतेस शोभेल काय, त्यावरून मला हलकेपण तर येणार नाहीं ना, हा विचार माणसाच्या मनांत घोळूं लागतो, आणि त्यामुळें त्याचा फार घोंटाळा होतो. आमच्या देशांमध्यें सध्यां जे तरुण लोक विद्या करून, पदव्या मिळवून पाठशाळांतून बाहेर पडतात, त्यांची अवस्था अशी होत असते. ह्मणजे, आपण कोणी मोठे आहोंत असें त्यांच्या मनांत येऊन त्यांस साधारण काम हातीं घेण्यास लाज वाटते, आणि मोठें काम तर आतां कोणास फारसें मिळत नाहीं, त्यामुळें त्यांस वर्षोंचीं वर्षें निरुद्योगी राहावें लागतें. हें त्यांच्या अविचाराचें किंवा असमंजसपणाचें फल होय. एब्राहाम लिंकन ह्याची गोष्ट अशी नव्हती. तो लष्करांत कपतानाच्या पदवीपर्यंत चढला होता, आणि राज्यकारभार पाहणाऱ्या सभेंत त्यास नेमावें इतकी त्याची योग्यता लोकांत वाढली होती, तरी, त्याच्या मनास अभिमान शिवला नव्हता. आपण कोणी मोठे आहों असें त्याच्या मनांत कधीं आलें नाहीं. आणि त्याला असें वाटत असे कीं, आपण जसे पूर्वीं होतों, तसेच आहों; त्यांत कांहीं फरक पडला नाहीं; ह्मणून आपणांस निर्वाहार्थ कोणताही धंदा हातीं घेण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आणि ह्मणून त्यानें लोहार होण्याचा निश्चय केला.

त्याप्रमाणें तो खचीत लोहार झाला असता; परंतु, ह्या सुमारास अशी एक गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें त्याचा सगळा विचार बदलला, आणि त्याच्या व्यवसायास एक वेगळाच मार्ग लागला. त्याचा प्रकार असा. न्यूसालेम गांवामध्यें ग्र्याडफोर्ड ह्मणून कोणी एक मोठा दुकानदार होता. त्याचें

आणि तेथल्या दांडग्या मंडळीचें वांकडें आलें होतें. तें इतकें कीं, त्या मंडळीच्या त्रासानें तो आपलें दुकान बंद करण्यास तयार झाला, आणि शिलक असलेला माल घेण्यास कोणी गिऱ्हाईक पाहूं लागला. तेथें ग्रीन ह्या नांवाचा एक गृहस्थ होता, तो लिंकनाचा मित्र होता, त्यानें तो सगळा माल शंभर डालरांस घेण्याचें ठरविलें, आणि, लिंकनास कांहीं कामधाम नव्हतेंच ह्मणून त्यास त्या मालाची याद आणि आकारणी करावयास सांगितलें. त्याप्रमाणें याद आणि आकारणी लिंकन ह्यानें केल्यावर त्याला असें स्पष्ट दिसून आलें कीं, त्या दुकानांत निदान साहाशें डालरांचा माल आहे. तेव्हां, बेरी ह्या नांवाचा एक मनुष्य पातीदार घेऊन, लिंकन ह्यानें तो सगळा माल, एकसट्टा, सवाशें डालरांस ग्रीन ह्याजपासून विकत घेतला. त्या व्यापारांत बेरी ह्यानें लिंकनास अजीबात फसविलें. तें इतकें कीं, नफा होण्याचें कलम एकीकडेस राहून, लिंकन ह्यास पुष्कळ तोटा भरावा लागला. आणखी बेरी ह्याचें कर्ज त्याच्या माथ्यावर बसलें तें वेगळेंच. परंतु, त्याची सत्यशीलता आणि प्रामाणिकपणा हीं ग्रीन ह्यास चांगलीं ठाऊक होतीं. ह्मणून त्यानें त्यास ह्या प्रसंगीं द्रव्यद्वारा चांगलें साह्य केलें; आणि त्याला त्या अडचणींतून काढिलें. हा आपला पैसा लिंकनाकडून परत मिळावा अशी इच्छा ग्रीन ह्यास नव्हती; आणि ह्मणून त्यानें त्याविषयीं कोठें कांहीं पांढऱ्यावर काळें करून ठेविलें नव्हतें. आणखी, तो त्या गांवाहून निघून तेनेसी ह्या गांवीं जाऊन राहिला होता. परंतु, हें ऋण आपल्या माथ्यावर राहूं द्यावयाचें नाहीं, फेडावयाचें, असा निश्चय लिंकनानें केला होता. त्याप्रमाणें, तें फेडण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त होतांच, साहा वर्षांनीं, व्याजसुद्धां, ती सगळी रकम त्यानें ग्रीन ह्यास पावती

केली, आणि संकटसमयीं साह्य केल्याबद्दल त्याचे उपकार मानिले. हें प्रामाणिकपण किती वर्णनीय आहे ह्मणून सांगावें? एब्राहाम लिंकन ह्यास उंच पदास चढण्यास त्याचे जे अनेक सद्गुण साधनीभूत झाले, त्यांत प्रामाणिकपणा हा मुख्य होय. हा गुण ह्या पुरुषाला जर इतका उपयोगीं पडला आहे, तर, तो तसा इतरांसही कां उपयोगीं पडणार नाहीं? पडेल. अवश्य पडेल. पण त्याविषयीं तितकी निष्ठा मात्र पाहिजे.

ह्या वेळच्या सुमारास त्या खेड्याच्या पोष्टमास्तराचें काम सरकारानें एब्राहाम लिंकन ह्यास दिलें. तें बुद्ध्या त्याला दिलें एवढ्याच करितां कीं, तो चांगला प्रामाणिक होता, आणि त्या संबंधानें कागदपत्र तयार करितां येण्यासारखा वाकबगार मनुष्य त्या खेड्यांत काय तो तेवढाच होता. तेंही काम त्यानें फार चांगल्या रीतीनें मोठ्या आस्थेनें, केलें. त्याला त्या कामाबद्दलचा पगार अगदींच थोडा—निर्वाहास पुरायाची मारामार—असा होता. त्यामुळें सगळा वेळ पोष्टहपिसांत घालवून त्याचें चालेना. दुसऱ्या उद्योगाकरितां त्याला बाहेर इकडे तिकडे हिंडावें लागे. परंतु, आपल्या ह्या व्यवस्थेनें लोकांची गैरसोय होऊं नये ह्मणून तो फार जपत असे. ह्मणजे, तो असें करी कीं, डांकेंतून आलेलीं सगळीं पत्रें नेहमीं आपल्या डोक्याच्या टोपींत आपणाबरोबर वाळगीत असे. तेणेंकरून, तो भेटला ह्मणजे पोष्टहपिसांत गेल्याप्रमाणें लोकांचें काम अनायासें होत असे. आणखी त्याचा सगळा व्यवहार चोख असे. त्यामुळें ती त्याची रीति लोकांस फार आवडत असे. त्या कामाच्या संबंधानें त्याच्या हातांत जो पैसा येई, तो तो, अगदीं वेगळा ठेवीत असे, आणि केवढीही अडचण आली तरी तो स्वतःच्या खासगी कामाकडे

खरचीत नसे. त्या संबंधाची एक फार चमत्कारिक गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. ती अशी कीं, त्यानें तें पोष्टमास्तरीचें काम सोडिलें, तेव्हां त्याच्या संबंधाचा कांहीं पैसा त्याच्या जवळ शिलक होता. परंतु ती शिलक जमाखर्चीत कोठें बरोबर निघेना, ह्मणून ती त्याला सरकारांत देतां येईना. ह्मणून ती रकम, तशीच पुडींत बांधून, त्यानें आपले टोपींत ठेविली होती. पुढें कितीएक वर्षें लोटल्यावर, आणि एब्राहाम लिंकन हा वकील झाल्यावर, ती चूक हिशोबांत उमटली, आणि तितके पैसे एब्राहाम लिंकन ह्याजपासून घ्यावे असें ठरलें. त्याप्रमाणें त्या खात्याचा कोणी एक कामदार, तो सगळा हिशेब घेऊन, ती रकम मागावयास एब्राहाम लिंकनाकडे गेला. तेव्हां तो आपल्या कचेरीमध्यें वकिलीचें काम पाहात बसला होता. त्याजपुढें तो हिशेब त्या कामदारानें ठेविल्याबरोबर, लिंकन यानें आपली टोपी उचलून, बरोबर तितक्या पैशांची पुडी तींतून काढून, त्याच्यापुढें ठेविली. हें पाहून त्या कामदारास आणि जवळच्या मंडळीस विलक्षण आश्चर्य वाटलें. ही रकम टोपींत असतां, हातांशीं एकही पैसा नाहीं आणि आवश्यक पदार्थ घेण्याचा मोठा नेट, असे अनेक प्रसंग लिंकनास आले होते. परंतु, तो पैसा त्यानें एक घटिका देखील आपल्या खासगी कामाकडे लाविला नाहीं! त्या पैशावर सरकारचा पाहारा नव्हता; आणि तो पैसा लिंकन खासगीकडे कांहीं वेळ खरचिता तर तें पाहायास सरकार जवळ बसलें नव्हतें. परंतु, ह्या दोहोंवरही लिंकनाच्या मनोदेवतेचा पाहारा होता. ती नित्य जागृत होती; आणि तिच्या आज्ञेप्रमाणें अगदीं बरोबर वागावयाचें, तिच्या बाहेर एक काडीभर देखील जावयाचें नाहीं, असा त्याचा निश्चय अत्यंत दृढ होता; त्याचें हें फल होय.

हें सगळें आटोपल्यावर एब्राहाम लिंकन ह्यास पुनः कांहं उद्योग नाहींसा झाला. तितक्यांत जानकाळहोन ह्या गृहस्था त्यास आपल्या हाताखालीं लहानसें जमीनमोजणीचें काम सांगि तलें. तें त्याला येत नव्हतें; त्या कामाचा सगळा पाया का तो गणितावर असतो; आणि त्या गणिताचें ज्ञानही त्याला नव्हतें. परंतु, तो पुरुष जबरदस्त उद्योगी होता. त्यानें गणिताचीं आणि मोजणीच्या कामाचीं पुस्तकें मिळविलीं, आणि एकसारखा अभ्यास करून थोडक्या वेळांत तो तें काम चांगल्या रीतीनें करूं लागला. "निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंची फळ" ह्याचा प्रत्यय पावलोपावलीं ह्या चरित्रांत दृष्टीस पडतो.

हें मोजणीचें काम करीत असतां, बेरी ह्याचें सगळें कर्ज फेडण्याची हमी लिंकनानें आधींच घेतली होती ह्मणून, त्याच्या एका सावकारानें, दरखास्त आणून, लिंकनाच्या सगळ्या सामानाची जप्ती केली. तींत, त्याचा कंपास आणि सांखळी हींही गेलीं; आणि त्यामुळें त्याचें काम कांहीं वेळ बंद पडलें होतें. परंतु, ही त्याची हकीकत जान शार्ट ह्या नांवाच्या एका थोर गृहस्थास समजल्यावरून, त्यास त्याची फार दया येऊन, त्यानें त्या वस्तु त्या सावकारापासून विकत घेऊन त्या एब्राहाम लिंकन ह्यास परत दिल्या. आपल्या सदाचरणशील भक्तांस परमेश्वर कोणत्या ना कोणत्या तरी पर्यायानें साह्य करितो, ही गोष्ट खरी आहे.

आतां हा भाग बराच लांबला ह्मणून येथें पुरा करितों. ह्यापुढें सार्वजनिक कामांत एब्राहाम लिंकनाचा प्रवेश झाला, आणि दिवसेंदिवस त्याची योग्यता वाढत गेली, तें कथनही फार चांगलें आहे. तें पुढच्या भागांत करूं.

---

# भाग साहावा.

## सार्वजनिक कामें करण्याची योग्यता.

आपलें स्वतःचें हित आणि आपल्या कुटुंबाचें हित लहान सहान जीवजंतु पशुपक्षी देखील करितात; तें माणसानें केलें तर कांहीं विशेष नाहीं. परंतु, स्वार्थी दृष्टि न ठेवितां, सर्व जनांच्या हिताचीं कामें करणें, हा गुण फार मोठा आहे. तो अंगीं येण्यास आधीं मनुष्याच्या अंतःकरणांत परोपकारबुद्धीचा चांगला विकास व्हावयास पाहिजे; आणि तीं कामें करण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे; तशी स्थिति एब्राहाम लिंकन ह्यास, अगदीं पूर्णपणें नव्हे, तरी पुष्कळ अंशीं, प्राप्त झाली होती. तो जो शाहाणा आणि कर्ता झाला होता, तो केवळ आपल्या स्वतःच्या उद्योगानें झाला होता. उद्योगावर त्याची पूर्ण निष्ठा होती. ह्मणजे, आपलें बलाबल पाहून उद्योग केला असतां, मनुष्याचे हेतु खचीत सिद्धीस जातात, असें त्याच्या मनांत भरलें होतें. त्याप्रमाणेंच, तो धर्मशील असल्यामुळें, दुसऱ्याचें बरें करण्याविषयीं त्याचे ठायीं विलक्षण उत्सुकता निरंतर जागृत असे. शिवाय, 'मनस्येकं वचस्येकं' हें त्याला कसें तें ठाऊकच नव्हतें. जें बोलायाचें तें करायाचें, आणि जें करायाचें तें सांगायाचें, अशी त्याची वृत्ति होती. तो उगाच रिकामा वेदांती नव्हता. श्रमसाध्य असेल, तें लागलेंच करावयाचें, त्याविषयीं उगाच बडबड करावयाची नाहीं, असा त्याचा पाठ असे. तो खरा धर्मनिष्ठ होता. धर्माचरणसंबंधानें त्याचें अंतर्बाह्य स्वरूप अगदीं एक होतें. आणखी, देव जें कांहीं करितो तें सगळें चांगलें आणि यथायोग्य करितो, त्यांत वाईट आणि अयोग्य कांहींएक नसतें, आणि आपणां माणसांस त्यांत जें कांहीं कधीं कधीं विसंगत दिसतें, तें आपल्या अज्ञानाचें फल असतें, असा त्याचा

पूर्ण भरंवसा होता; आणि त्याप्रमाणें तो, सगळा भार परमेश्वरावर टाकून सगळीं लहानमोठीं कामें करीत असे. ही त्याची वृत्ति सर्व लोकांस चांगली कळली होती; आणि त्याचें वागणें एकाद्या लहान मुलाप्रमाणें, सरळ, निष्कपट, आणि लोकांच्या मनांत प्रेम उत्पन्न व्हावें असें होतें. तो मोठा प्रामाणिक होता. तो, प्रामाणिकपणा हा गुण फार उत्तम आहे ह्मणून आपले ठायीं दृढ धरून तो प्रामाणिक झाला होता, असें नव्हे; तर, प्रामाणिकपणा सोडून त्याला वागतांच येत नसे. असत्य हें त्याच्या जिव्हेला कधींही शिवलें नाहीं. हालंड ह्या नांवाच्या एका अत्युत्तम ग्रंथकारानें त्याच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे. त्यांत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, "त्याला सगळीं माणसें आपलींशीं वाटत; तो सर्वांवर ममता करी; त्यामध्यें दुर्गुण नव्हता; तो प्रामाणिक, सत्यवादी, साधा, परोपकारी, धार्मिक, बुद्धिमान्, उद्योगी, आणि आपण आपल्या उद्योगाच्या बळानें आपलीं कार्यें साधूं अशी हिंमत बाळगणारा,—ह्मणजे, दुनयेंतले व्यवहार करण्यांत जे गुण आवश्यक आहेत त्या गुणांनीं संपन्न असा—होता."

करवेल तितकें परहित करावें, हा एक विशेष गुण एब्राहाम लिंकनाच्या ठायीं होता. "जें कांहीं आपणासि ठावें, तें हळू हळू शिकवावें, शाहाणें करून सोडावें, इतर जनां," असें जें अत्युत्तम बोधवचन आमच्या रामदास स्वामींनीं आपल्या दासबोधांत घातलें आहे, त्याची प्रत्यक्ष मूर्ति ह्या पुरुषाच्या हृदयांत वास करीत होती, असें दिसतें. दुकानांतलें आणि पोष्टाचें काम आटोपल्यावर, बाहेरच्या बाजूस बसून, साधारण अजाण लोकांस चांगलीं चांगलीं पुस्तकें आणि वर्तमानपत्रें वाचून दाखवावीं, आणि त्यांतल्या गोष्टींविषयीं आपणास जें कांहीं माहीत असेल तें शांतपणें सांगावें, असा त्याचा क्रम असे. त्याप्रमाणेंच को-

णाचीं पत्रें लिहून देणें, कोणाचीं पत्रें वाचून दाखविणें, इत्यादि सगळीं कामें तो मोठ्या उल्हासानें करी. एवढेंच केवळ नव्हे; तर, गरीब गुरीबांस साह्य करण्याच्या कामीं तो आपल्या योग्यतेकडे किंवा हिताकडे लक्ष न देतां श्रम करीत असे. एके दिवशीं सकाळीं थंडीचा मोठा कडाखा पडला होता; आणि आवट्रेंट ह्या नांवाचा एक फार गरीब मनुष्य, अनवाणी, थर थर कांपत, हातांत कुऱ्हाड घेऊन, रान तोडीत होता, तेणेंकरून त्याला मनस्वी दुःख होत होतें. तें एब्राहाम लिंकनाच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याला त्याची फार दया आली. आणि त्यानें त्याला विचारिलें कीं, "बाबा, ह्या कामाबद्दल तुला काय मजुरी मिळावयाची आहे?" त्यास आबट्रेंट ह्यानें उत्तर दिलें, "मला एक डालर मिळावयाचा आहे. आणि तो मिळाला ह्मणजे, माझ्या ह्या पायांस कांटे आणि खडे फार रुतत आहेत, ह्मणून मी आधीं जोडा विकत घेईन; बाकीचें पुढचें पुढें." तें ऐकून घेऊन, एब्राहाम लिंकनानें त्याच्या हातांतली कुऱ्हाड आपल्या हातीं घेऊन, त्यास ह्मटलें, "जा बाबा, तूं फार कांकडलास आहेस. तूं त्या शेजारच्या आगटीजवळ जाऊन बस, आणि अमळसा शेक, ह्मणजे तुला बरें वाटेल." त्याप्रमाणें तो तिकडे गेल्यावर त्यानें, तोडावयाचें होतें तें सगळें रान एका सपाट्यासरसें तोडून टाकिलें. तें पाहून, ट्रेंट ह्यास आणि त्या रानाच्या मालकास विलक्षण आश्चर्य वाटलें. अशा त्याच्या अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांवरून त्याची आख्या चोहींकडे झाली; आणि तो खरोखर कोणी मोठा माणूस आहे, असें सर्वांस वाटूं लागलें. साधुरीति जिला ह्मणतात, ती अशीच असते. तिचें वर्णन पंतांनीं एके ठिकाणीं केलें आहे:—

## आर्या.

साधु प्राणी पाहुनि संसारीं तापले असुख पावे
व्हावें जग मुदित ह्मणे तद्दुःखें आपले असु खपावे.

पुढें कांहीं दिवसांनीं त्या प्रांताच्या कायदे कौंसिलदारांची निवड व्हावयाचा प्रसंग आला. तेव्हां सावगामन प्रांताच्या वतीनें लोकांनीं जे नऊ सभासद बहुमतानें निवडून काढिले, त्यांत एब्राहाम लिंकन हा होता. ह्या नऊ असामींविषयीं अशी एक आख्यायिका आहे कीं, ते सगळे फार उंच—शुद्ध हे-माडपंत—होते; आणि त्यांतही, एब्राहाम लिंकन हा विशेष उंच होता. ह्या कायदेकौंसिलांत तो फार निस्पृहतेनें आणि देशहिताच्या अतिशयित आस्थेनें भाषण करीत असे, तें इतर सभासदांच्या मनावर चांगलें वठत असे. त्याच्या भाषणाच्या विषयांत, मुख्य विषय, गुलामांची सुटका करावयाची, हा होता. त्यावरून त्यास विरोधी पुष्कळ मिळाले होते. तरी, त्यानें आपलें ह्मणणें कधीं तिळभर मागें घेतलें नाहीं.

ह्या कायदेकौंसिलांत त्याला जागा मिळण्याच्या आधींच त्याला कायद्यांचा अभ्यास करण्याची इच्छा उत्पन्न झाली होती; आणि स्प्रिंगफील्ड येथें रहाणारा मेझर स्टुअर्ट हा वकील, ब्ल्याकहाकाच्या लढाईच्या वेळीं त्याच्या ओळखीचा झाला होता, त्यानें त्यास कायद्याचीं पुस्तकें देण्याचें कबूल केलें होतें. तीं आणण्याकरितां, आणि परत करण्याकरितां, तो, कधीं कधीं बाराबारा तेरातेरा कोस, डोक्यावर पुस्तकांचा बोजा घेऊन जात असे, असें सांगतात. आणखी त्याचें त्याला कांहीं वाटत नसे. तो नेहमीं आपल्या अभ्यासांत गढलेला असे. तो इतका कीं, जवळ आला कोण आणि गेला कोण ह्याचें देखील त्याला भान राहात नसे. एकादें पुस्तक घेऊन एकाद्या झाडाखालीं अ-

भ्यास करीत बसावें तें दोन दोन तीन तीन प्रहर तेथून उठूं नये, असें त्याचें कधीं कधीं होई. त्यावरून कांहीं लोक, त्याला वेड लागलें आहे कीं काय असें देखील ह्मणूं लागले होते. एब्राहाम लिंकनाची अवस्था अशी झाली होती, ह्यांत कांहीं नवल नाहीं. कां कीं, कोणत्याही विषयाच्या संबंधानें निश्चयी पुरुषांचें असेंच होत असतें. तुकाराम महाराज, इतर व्यासंग सोडून एकाग्र चित्तानें भगवद्भक्ति करूं लागले, त्यांसही लोकांनीं वेडें ठरविलें. त्याप्रमाणेंच न्यूटन, बेकन, इत्यादि तत्वज्ञानी पुरुष, एकाद्या गोष्टीची प्रतीति पाहण्याकरितां जे कांहीं चमत्कारिक उद्योग करीत, ते पाहून, लोक त्यांनाही नादी किंवा छांदिष्ट ह्मणत असत. परंतु ह्या उदाहरणांवरून एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, जो विषय आपणांस उत्तम प्रकारें संपादावयाचा आहे, त्याची अशी पाठ घेतल्यावांचून त्याचें संपादन होत नाहीं. एब्राहाम लिंकन ह्यानें कायद्याच्या अभ्यासाची पाठ घेतली; आणि इ० स० १८३७ ह्या वर्षीं त्याची वकीलीची परीक्षा उतरली. तेव्हांही, तो, पुनः निवड होऊन, कायदेकौंसिलाचा सभासद कायमच होता.

वकीलीची परीक्षा उतरल्यावर एब्राहाम लिंकन हा, कामाच्या संबंधानें, मेझर स्टुअर्ट ह्याचा पातीदार झाला, आणि, न्यूसालेम हें गांव सोडून, स्प्रिंगफील्ड येथें येऊन राहिला. तेव्हां न्यूसालेम ह्यांतील लोकांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. त्यांना असें वाटलें कीं, मनाचा इतका मोकळा, इतका पवित्र, आणि इतका परोपकारी पुरुष आपणांस कधीं पुनः मिळावयाचा नाहीं. आणि तें शब्दशः खरें होतें. कांहीं एकादें मोठें काम करावयाचें असलें, एकादी विचार मसलत घ्यावयाची असली, किंवा कोणास

कांहीं साह्य पाहिजे असलें, तर, त्यानें वेळाशक एब्राहाम लिंकनाकडे जावें, आणि आपलें कार्य साधून यावें, असा क्रम कितीएक वर्षेंपर्यंत त्या गांवांत चालला होता. अशा मनुष्याच्या वियोगानें तेथल्या लोकांस दुःख झालें, ह्यांत काय आश्चर्य आहे?

पुष्कळ लोकांचा समज असा आहे कीं, वकीलीचें काम जें आहे, तें, केवळ धारवाडी कांट्यानें सत्यास धरून, कोणालाही चालवितां यावयाचें नाहीं; आणि तें पुष्कळ अंशीं खरें आहे, असा अनुभव पुष्कळ वकील सांगतात. परंतु, प्रत्येक नियमास जसे कांहीं तरी अपवाद असतातच, तसा एकंदर वकीलमंडळीस एब्राहाम लिंकन हा एक अपवाद होऊन गेला, असें ह्मणावें लागतें. ह्मणजे, त्याच्या चरित्रावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, वकीलीचें काम करीत असतां, असत्यानें त्यानें आपलें मन कधींही विटाळूं दिलें नाहीं; एवढेंच केवळ नव्हे; तर पापास प्रवृत्त न होतां, केवळ पातीदाराच्या नात्यानें, असत्योत्पन्न द्रव्याचा जो अंश त्याला अगदीं सहज मिळण्यासारखा होता, त्याला देखील तो शिवला नाहीं. ह्याविषयींच्या त्याच्या कितीएक चमत्कारिक गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्यांतल्या कांहीं गोष्टी मासल्याकरितां येथें सांगतों.

कोणे एके वेळीं एक मनुष्य त्याच्या जवळ आला, आणि ह्मणाला, "माझी एक फिर्याद आहे, तींत आपणांस वकील करावें, अशी माझी इच्छा आहे." नंतर, त्याच्या फिर्यादीची सगळी हकीकत शांतपणें ऐकून घेऊन, एब्राहाम लिंकन, गंभीर मुद्रेनें, त्या मनुष्यास ह्मणाला, "होय. मीं प्रयत्न केला, तर तुमच्या ह्मणण्याप्रमाणें हुकूमनामा खचीत मिळवीन; शेजाऱ्यांत कलह माजवीन; आणि साहाशें डालर, त्या गरीब बिचाऱ्या विधवेपासून छिनावून घेऊन तुमच्या पदरांत टाकीन;

तेव्हां, ती बाई आणि तिचीं साहा मुलें अन्न अन्न करीत फिरूं लागतील; हें सगळें होईल खरें. पण, इकडे पहा, मला असें वाटतें कीं, तुम्ही दावा सांगतां त्या रकमेवर जशी तुमची सत्ता आहे, तशी त्या बाईची आणि तिच्या सहा मुलांची सत्ता आहे. तुह्मांला ठाऊक आहे कीं, कितीएक गोष्टी कायद्यानें वाजवी असतात, त्या, नीतीच्या दृष्टीनें पाहिल्या ह्मणजे अगदीं अशुद्ध आणि पापमूलक दिसतात. मी तुमचा वकील तर होत नाहींच; पण, मी तुह्मांला हात जोडून एवढेंच सांगतों कीं, हे सहाशें डालर त्या बाईपासून काढून मिळविण्याचा प्रयत्न तुह्मी सोडून द्या, आणि ते दुसऱ्या एखाद्या कामधंद्यांत मिळविण्याची खटपट करा.'' अशी मसलत देणारे किती वकील निघतील बरें! त्या मनुष्याच्या वतीनें फैसला झाला असता, किंवा विरुद्ध झाला असता, तरी, फिर्यादीच्या रकमेवरची फी आणि बयाणा हीं तर खचीत लिंकनाच्या पदरांत पडलीं असतीं ना?

एका खुनी खटल्यामध्यें एब्राहाम लिंकन आणि त्याचा पातीदार वकील हे दोघे आरोपिताच्या वतीचे होते. तो खटला सुमारें अर्धा झाल्यावर पुराव्यावरून एब्राहाम लिंकनास खचीत असें वाटलें कीं, आरोपिताच्या हातून तो अपराध खचीत झाला आहे. तेव्हां लागलेंच त्या खटल्यांतून त्यानें आपलें आंग काढून घेतलें. परंतु, दुसरा वकील भला रेंव्या होता. त्यानें तीन चोक तेरा करून, न्यायाधिशाच्या डोळ्यांत धूळ टाकून, तो खटला जिंकला, आणि आरोपितास निर्दोष ठरवून, मुक्त करविलें. तेव्हां त्यानें स्वसंतोषानें, त्या वकीलास नऊशें डालर बक्षीस दिले. त्यांतले अर्धे डालर, तो वकील पातीदाराच्या नात्यानें, एब्राहाम लिंकनास देऊं लागला. परंतु, तो पुरुष त्यांतल्या एका पैला देखील शिवला नाहीं.

काम करीत असतां पातीदार वकील जवळ नसला तर त्याच्या वांटणीचे निमे पैसे, एब्राहाम लिंकन हा, एका वेगळ्य पुडींत बांधून, तिजवर त्याचें नांव लिहून ठेवित असे. त्याल कोणीं एकदां असें विचारलें कीं, तुह्मीं तो पैसा आपणांजवळ ठेवून, कांहीं दिवसांनीं स्मरणपूर्वक त्याला दिला ह्मणजे झालें असें असतां, लागलीच पुडी बांधितां ह्याचें कारण काय? त्यास त्यानें उत्तर दिलें कीं, "तसें केलें तर तो पैसा कदाचित् चुकू मी वापरीन, तें बरोबर नाहीं. कां कीं, दुसऱ्याचा पैसा मी कधींही वापरणार नाहीं, असें वचन माझ्या आईस मी दिलें आहे."

एका दिवाणी खटल्यामध्यें, एब्राहाम लिंकन हा वादीच्य वतीनें वकील असतां, ज्या रकमेचा दावा त्यानें केला होता त्या रकमेंतला बराच पैसा प्रतिवादीनें परत दिल्याबद्दलची पा वती प्रतिपक्षाच्या वकीलानें दाखविली. तेव्हां, एब्राहाम लिं कन ह्यास पराकाष्ठेचें वाईट वाटलें, आणि तो कोर्टांतून निघू गेला. त्यास जड्जानें बोलावणें पाठविलें, तेव्हां त्यानें त्यास उलट सांगून पाठविलें कीं, मला तेथें येण्यास फार संकोच वाटतो काळ्या तोंडानें चार चौघांत कसें यावें? माझ्यानें येववत नाहीं क्षमा करा."

एका खुनी खटल्यावरून एब्राहाम लिंकन ह्याची आख्य स्प्रिंगफील्ड येथें फारच झाली. तो खुनी खटला असाः— आर्मस्ट्रांग ह्या नांवाच्या एका तरुण मनुष्यावर खून केल्याच आरोप आला होता; आणि त्याची चौकशी चालली होती. ह आर्मस्ट्रांग एका गृहस्थाचा मुलगा होता; त्या गृहस्थाच्या घरीं पुष्कळ वर्षांमागें, एब्राहाम लिंकन हा चाकर राहिला होता, आणि तेव्हां त्या मुलास त्यानें पुष्कळ खेळविलें होतें, आणि पाळण्यां

घालून आंदुळिलें होतें. त्या आरोपिताचा बाप पूर्वींच वारला होता; आणि आई मात्र जीवंत होती. ही सगळी गोष्ट एब्राहामाच्या लक्षांत आल्यावर त्यानें त्या बाईस पत्र लिहून कळविलें कीं, मी गरिबींत असतां तुह्मीं मजवर जे अनंत उपकार केले आहेत, त्यांबद्दल तुमचें कांहीं तरी उतराई व्हावें ह्मणून मी सांगतों कीं, कांहींएक न घेतां, ह्या खटल्यांत मी तुमच्या मुलाचा वकील होईन, आणि त्यास न्याय मिळावा, असा प्रयत्न करीन. तुह्मीं काळजी करूं नये.

ती चौकशी चालू झाली. आणि मुख्य साक्षीदारानें खातरीनें असें सांगितलें कीं, सुमारें साडेनऊ वाजण्याच्या सुमारास, आर्मस्ट्रांग ह्यानें त्या मनुष्यावर जो प्रहार केला, त्याच्या योगानें त्याचा प्राण गेला, हें मीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलें, आणखी, आपल्या ह्मणण्याच्या सत्यतेस विशेष जोर येण्याकरितां असें ह्मटलें कीं, त्या वेळीं चंद्र उगवून चांदणें चक्क पडलें होतें, त्याच्या योगानें हा सगळा प्रकार मला स्पष्ट दिसून आला. ह्या साक्षीवरून, अपराधाविषयीं न्यायाधीशाची पूर्ण खातरी झाल्यासारखी दिसली, आणि सर्वांस असें वाटलें कीं आर्मस्ट्रांग ह्यास खचीत भयंकर शिक्षा होणार. त्याचे मित्र अगदीं घाबरून गेले; आणि त्याच्या आईच्या काळजानें ठाव सोडिला. अशा स्थितीमध्यें, न घाबरतां एब्राहाम लिंकनानें तो सगळा खटला पुनः लक्षपूर्वक तपासून पाहिला. तेव्हां त्याला खचीत वाटलें कीं दुष्ट लोकांनीं कट केल्यामुळें त्या खटल्यास तसें स्वरूप आलें आहे. आणि विचारा आर्मस्ट्रांग विनाकारण जिवानिशीं जात आहे. परंतु, त्याच्या सुटकेचा मार्ग त्याला दिसेना. शेवटीं, त्याला पंचांग पाहाण्याची सहज स्फूर्ति झाली, आणि त्यावरून त्याला एक गोष्ट अशी सुचली कीं, तीवरून, तो झालेला स-

गळा पुरावा निरुपयोगी झाला. ती गोष्ट ह्मणजे हीच कीं, त्या रात्रीं चंद्रोदय मुळींच अकरा वाजल्यावर झाला होता. तो मुद्दा न्यायाधीशापुढें एब्राहाम लिंकनानें ठेविल्याबरोबर, पुरावा करणाऱ्यांचीं तोंडें खापरासारखीं झालीं. आणि आर्मस्ट्रांग ह्याच्या निरपराधित्वाविषयीं न्यायाधीशाची खातरी होऊन त्यानें त्याला लागलेंच दोषमुक्त केलें. तेव्हां त्याच्या आईला किती आनंद झाला असेल बरें !

त्या वेळीं स्वतंत्र संस्थानांमध्यें न्यायाधीश, न्याय करीत, गांवोगांव फिरत असत; आणि त्यांच्याबरोबर, आपल्या कामाकरितां, वकीलांसही फिरावें लागत असे. त्यामुळें, गाडी घोडा बाळगणें हें त्यांस आवश्यक होई. परंतु, कितीएक दिवसपर्यंत एब्राहाम लिंकनानें गाडी घोडा ठेविला नाहीं; कां कीं त्याची प्राप्ती अगदीं बेताची होती. आणखी ह्मणून तो आपलें खटें-डगलें पाठीवर बांधून न्यायाधीशाच्या स्वारीबरोबर हिंडत असे; आणि त्याविषयीं त्याला कांहींएक वाटत नसे. आपण मोठें काम करूं लागलों ह्मणजे आपणांस तसा मोठा डामडौल केलाच पाहिजे, असें ज्या लोकांस वाटत असतें, त्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा.

एब्राहाम लिंकनाच्या वकीलीच्या कामाच्या संबंधानें शिंगराचा एक खटला प्रसिद्ध आहे. तो असा होता. एक शिंगरूं होतें; तें, वादी ह्मणे माझ्या घोडीचें, आणि प्रतिवादी ह्मणे माझ्या घोडीचें. यांत वादीच्या तर्फे ३४ साक्षीदार होते; ते चांगले प्रामाणिक होते; आणि ते ह्मणत कीं, हें शिंगरूं वादीच्या घोडीचें आहे, हें आह्मी त्याच्या जन्मापासून पहात आहों. आणि प्रतिवादीच्या वतीचे साक्षीदार तीस होते; तेही चांगले होते; आणि ते ह्मणत कीं, हें शिंगरूं प्रतिवादीच्या घोडीचें आहे, हें आह्मी

त्याच्या जन्मापासून पाहात आहों. त्यांत अविश्वसनीय असे साक्षीदार मुळींच नव्हते, आणि ते सगळे आपल्या समजुतीप्रमाणें खरें बोलत होते; तेव्हां न्यायाधीशांस मोठा विचार पडला कीं आतां करावें काय? शेवटीं, त्या दोन्ही घोड्या एका ठिकाणीं आणिल्या तेथें तें शिंगरूं आणिलें, आणि तें शिंगरूं आपोआप आपल्या आईजवळ जाऊन उभें राहिलें, आणि तिला चाटूं लागलें, आणि ती त्याला चाटूं लागली, त्यावरून सगळा संशय दूर झाला. आणि, तें शिंगरूं, खरोखर प्रतिवादीचें होतें, तें त्याला मिळालें. ह्या कामांत एब्राहाम लिंकन हा प्रतिवादीतर्फे वकील होता, आणखी खटल्याच्या जुरीला जी मंडळी आणिली होती, ती सगळी निरक्षर, पाटीलबुवांची मंडळी होती; तिच्या मनांत असें भरलेलें दिसलें कीं, जिकडे साक्षीदार अधिक तिकडचा पुरावा प्रबल, आणि तो पक्ष खरा, आणि ह्या प्रख्यात प्रकरणामध्यें, घोडी आणि शिंगरूं हीं भरीला घातलीं तरी, प्रतिवादीचे साक्षीदार बत्तीस होऊं लागले, आणि वादीचे चौतीस होते, तेव्हां, पुराव्याचें महत्व त्या जुरीवाल्यांच्या मनांत भरवून देण्याकरितां, एब्राहाम लिंकन त्यांस ह्मणाला कीं, नुसत्या संख्येकडे पाहून उपयोगीं नाहीं. तर तुह्मी एवढेंच पहा कीं, एका पैशाची जर पैज मारावयाची झाली, तर, तुह्मी, पैजेनें, तें शिंगरूं वादीचें ह्मणाल कीं प्रतिवादीचें ह्मणाल, तें पहा ह्मणजे झालें; आणि ज्याच्या वर्तीनें तुह्मांला पैज मारण्याची इच्छा होईल, तो पक्ष प्रबळ, असें तुह्मी समजून काय तें उत्तर द्या. हें त्याचें बोलणें त्यांच्या मनांत भरून, ह्यांनीं त्याप्रमाणें निकाल दिला. ह्यावरून, एखादी गोष्ट मनुष्याच्या मनांत भरविण्याची युक्ति एब्राहाम ह्यास कशी साधली होती, हें दिसून येतें.

मनुष्य कोणतेंही काम करीत असो; त्याचा मूळस्वभाव त्या-

वरून दिसल्यावांचून कधींही रहावयाचा नाहीं. एब्राहाम लिंकन हा वकिलीचें काम करीत होता; तरी त्याचे ठायीं जी विलक्षण भूतदया होती, ती त्यांत वारंवार व्यक्त होत असे. तिजविषयीं जीं अनेक उदाहरणें पुस्तकांतून लिहिलीं आहेत, त्यांत एक फार चमत्कारिक आहे; तें येथें सांगितल्यावांचून आमच्यानें राहावत नाहीं. एके वेळीं दुसरे एक दोन वकीलांसहवर्तमान, एब्राहाम लिंकन हा एका गांवाहून दुसऱ्या गांवास चालला होता. तेव्हां पाऊस पुष्कळ पडलेला असल्यामुळें, जागोजाग चिखल झाला होता. रस्त्याच्या आजूबाजूस तर चिखलाचे मोठमोठे डोहो सांचले होते. त्यांतल्या एका डोहामध्यें, एक डुकर गळ्याइतका रुपला आहे, आणि बाहेर निघण्याचा त्याचा सगळा प्रयत्न व्यर्थ गेल्यामुळें, तो अगदीं रडकुंडीस आला आहे, असें, त्या सगळ्या मंडळीच्या दृष्टीस पडलें; आणि त्याजविषयीं त्यांचें कांहीं बोलणेंही झालें. परंतु, त्या संबंधी विशेष विचार न करितां, ते सगळे पुढें निघून गेले. त्यांत, इतरांस कांहीं फारसें वाटलें नाहीं, परंतु, एब्राहाम लिंकनाच्या मनाला ती गोष्ट लागून राहिली होती; आणि त्या संकटांत पडलेल्या डुकरास साह्य न करितां आपण इकडे पुढें आलों हें कांहीं चांगलें केलें नाहीं, असें त्याच्या मनास फार खात होतें. त्यामुळें त्याला चैन पडेना; शेवटीं त्याच्या मनानें त्याची फारच उचल केली तेव्हां, तो आपल्या सोबत्यांस तसेंच तेथें सोडून, परत तो डुकर चिखलांत गुंतला होता, तेथें आला, आणि चिखलानें आणि पाण्यानें आपले कपडे खराब होतील ह्याची तिळभरही परवा न करितां, त्यानें एकदम त्या डबक्यांत उडी घालून, त्या डुकरास बाहेर काढून, सोडून दिलें; तेव्हां त्याचा जीव खालीं पडला. ही गोष्ट लोकांत कळली,

तेव्हां त्यांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तरी त्याविषयीं त्याला स्वतःला कांहींच विशेष वाटत नसे. त्या गोष्टीविषयीं कोणी बोलत असतां, तें ऐकून तो ह्मणाला "त्यांत मीं कांहीं विशेष केलें नाहीं. मीं त्या डुकरावर उपकार केले नाहींत. तर, त्याला दुःखमुक्त न केल्याची जी खुरखुर माझ्या मनाला लागली होती, ती काढून टाकण्याकरितां, मीं त्याला चिखलांतून काढिलें. ह्मणजे जें काय मीं केलें, तें त्या डुकराच्या सुखाकरितां केलें नाहीं तर, मीं आपल्या स्वतांच्या सुखाकरितां." हे विचार खरोखर फार चमत्कारिक आहेत. ते साधूंच्याच अंतःकरणास शोभतात. अशा प्रकारचीच साधुवृत्ति मोरोपंतांनीं एका ठिकाणीं वर्णिली आहेः—

### आर्या.

खळ निंदी साधु रडे पुसतां यास्तवचि मी ह्मणे रडलों
नरकीं पडेल निंदक या दुःसह दुःखसागरीं पडलों.

साधारणपणें, लहानपणीं गरिबी भोगलेल्या माणसास द्रव्य मिळूं लागलें, ह्मणजे तो आपल्या पूर्वींच्या संबंधी जनांस विसरतो, आणि स्वतः मोठ्या थाटानें राहून इतरांस तुच्छ करितो; परंतु, एब्राहाम लिंकन हा त्यांतला नव्हता. वामन पंडितांनीं ह्मटलें आहे

### श्लोक.

वृक्ष फार लवती फलभारें
लोंबती जलद घेउनि नीरें
थोर गर्व न धरी विभवाचा
हा स्वभाव उपकारपरांचा

तशी वृत्ति एब्राहाम लिंकन ह्याची होती. तो जसजसा योग्यतेनें वाढत चालला, तसतसा वृत्तीनें नम्र आणि परोप-

कारी होत चालला. तो आपल्या आप्तांस आणि इष्टमित्रांस यथाशक्ति साह्य करीत असे आणि त्यांचा फार मान राखीत असे. त्याला सावत्र आई होती. तिजवर त्याचा लोभ मनस्वी असे. त्याला एका खटल्यामध्यें एकदां पांचशें डालर बक्षीस मिळाले. तेव्हां, तो तेथें आपल्या मित्रांस ह्मणाला आणखी अडीचशें डालर जर मला मिळाले, तर ते ह्यांच्या भरीस घालून, एकंदर साडेसातशें डालरांची १६० एकर जमीन विकत घेऊन ती मी आपल्या आईच्या नांवानें करून टाकीन. ह्मणजे, तिला कशाची ददात पडणार नाहीं. त्यावर त्याचा मित्र त्याला ह्मणाला, "अगदीं तिच्या नांवानें कशाला करितां? तहांह्यात तिला त्या जमिनीचें उत्पन्न मिळावें, असा बंदोबस्त करून ठेवा, ह्मणजे झालें!" त्यास एब्राहाम लिंकनानें उत्तर दिलें, "कां पण असें मीं करावें? मजवर आईचे उपकार इतके झाले आहेत कीं, त्यांच्या मानानें हें माझें करणें कांहीं नाहीं. तिचे उपकार माझ्यानें कधींही फेडवणार नाहींत. तिला मी जितकें साह्य करीन तितकें थोडेंच!" ही गोष्ट सावत्र आईची बरें? ह्या गोष्टीवरून, भरताची आठवण होते. आजपर्यंत जितके थोर पुरुष ह्या जगामध्यें होऊन गेले, ते सगळे अत्युत्तम मातृभक्त होते; आणि जे कोणी मातृभक्त असतात, त्यांचें नेहमीं कल्याण होतें, असें इतिहासांतल्या कितीएक उदाहरणांनीं दिसून येतें. आणखी, इतिहासाच्या अभ्यासापासून जीं कितीएक नीतिसूत्रें शिकावयाचीं आहेत, त्यांतलें हें एक सूत्र मुख्य आहे, हें आपण निरंतर लक्षांत ठेविलें पाहिजे.

ह्याच सुमारास ह्मणजे इ० स० १८४२ ह्या वर्षीं एब्राहाम लिंकन ह्यानें मेरी टाड ह्या नांवाच्या स्त्रीशीं लग्न केलें. तीं नवराबायको एकमेकांवर फार प्रीति करीत असत, आणि निरंतर आनंदांत राहात असत.

एब्राहाम लिंकन हा सर्व प्रकारीं सर्वांच्या उपयोगीं पडत असे, आणि सार्वजनिक कामाविषयीं त्याला पराकाष्ठेची आस्था होती, त्यावरून त्याचा लौकिक लोकांत फार झाला; आणि सर्वांस असें वाटूं लागलें कीं, ह्यास जितकी जितकी मोठी पदवी मिळत जाईल, तितकीं तितकीं देशहिताचीं कामें त्याच्या हातून अधिकाधिक होत जातील. आणखी तो कधीं कोणाचें वाईट चिंतीत नसे; त्यामुळें त्याचें वाईट व्हावें असें कधीं कोणाच्या मनांत येत नसे. आणि, करवेल तितकें दुसऱ्यांचें हित करण्याविषयीं त्याचें ब्रीद होतें, त्यामुळें, त्याचें सर्वदां हितच व्हावें, अशी सर्वांची इच्छा असे. आणखी, तसा योग पुढें आला, व त्या पुरुषाच्या हातून मोठ्या गोष्टी घडल्या. त्यांचें कथन आतां पुढच्या भागांत करूं.

---

## भाग सातवा.

## राज्याधिकारसभाप्रवेश.

जन चांगलें पारखी आहे. तें सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो. त्यास एकादी उपयोगी वस्तु आढळली, ह्मणजे, तिचा यथायोग्य उपयोग करावयास त्यास सांगावें लागत नाहीं. चांगल्या वकीलांस अशील बोलावून आणावे लागत नाहींत; गूळ मुंग्यांस आमंत्रण पाठवीत नाहीं; तीं सगळीं, स्वहित जाणून, आपोआप उड्या घेतात. त्याप्रमाणें, सानगामन प्रांताच्या वतीनें कायदेकौंसलदारांचें काम आठ वर्षें केल्यावर सर्व लोकांस असें वाटूं लागलें कीं, स्वतंत्र संस्थानांचा राज्यकारभार चालविण्याचे कायदे करणारी जी मुख्य सभा वाशिंग्टन येथें असते, तींत एब्राहाम लिंकनास नेमिलें असतां मोठें काम होईल. ह्या सभेस कानग्रेस असें ह्मणतात. तींत दोन भाग अ-

सतात. त्यांतल्या एका भागाला सेनेट ह्मणतात; आणि दुसऱ्या भागाला, हौस आफ रेप्रिझेंटेटिव्ह,–ह्मणजे प्रतिनिधिसभा ह्मणतात. सेनेटामध्यें, दरएक संस्थानांतल्या कायदेकौंसलानें निवडून पाठविलेले दोन दोन गृहस्थ असतात. त्यांची मुदत दोन वर्षांची असते. आणि हौस आफ रेप्रिझेंटेटिव्हामध्यें, संस्थानांतील लोकांनीं निवडून पाठविलेले अनेक सभासद असतात. ते, संस्थानांतल्या लोकसंख्येच्या मानानें, कमजास्त असतात. आणि हे निवडून काढण्याविषयीं मत देण्याचा अधिकार, संस्थानांतल्या २१ वर्षांहून अधिक वयाच्या सर्व पुरुषांस असतो. सेनेट सभासदांचें वय तिसांच्या वर असलें पाहिजे, आणि हौस आफ रेप्रेझेंटेटिवच्या सभासदांचें वय पंचविसांवर असलें पाहिजे, असा नियम आहे. ह्या दोन्ही भागांतल्या सभासदांस, प्रत्येकीं, प्रतिवर्षी पांच हजार डालर द्यावे, आणि शिवाय जाण्यायेण्याचा खर्च द्यावा असा कायदा आहे. ह्मणजे ही सभा, ग्रेटब्रिटनांतल्या पार्लमेंट सभेसारखी आहे; मात्र पार्लमेंट सभेंतल्या सभासदांस नेमणुका नाहींत, आणि ह्यांना नेमणुका आहेत, एवढेंच काय तें अंतर.

कानग्रेसांत आपणांस जागा मिळावी, अशी इच्छा इलिनाइस प्रांतांतल्या सगळ्या कायदे कौंसलदारांची होती; आणि त्यांत क्के ह्या गृहस्थास, त्या कामीं फार आशा होती; कां कीं, तो मोठा बुद्धिवान् आणि विद्वान् अशी आख्या पुष्कळ दिवसांपासून होती. आणखी, तो गुलामांच्या व्यापाराच्या अगदीं विरुद्ध होता; ह्मणून, तो कानग्रेसांत गेल्यानें, गुलामांच्या व्यापाराचा आणि गुलाम ठेवण्याच्या परिपाठाचा पुष्कळ बंदोबस्त होईल, अशी आशा एब्राहाम लिंकनास होती. ह्मणून, तेथें क्के यास जागा मिळण्याविषयीं, नानाप्रकारच्या विषयांवर भाषणें

करून, आणि क्ले ह्याची वाखाणणी करून, त्याजविषयीं लोकांचीं मनें वळविण्याविषयीं एब्राहाम लिंकन हा प्रयत्न करीत होता. ही त्याची खटपट इ० स० १८४४ ह्या वर्षापासून चालली होती. परंतु, तिचा उपयोग कांहींएक झाला नाहीं. ह्मणजे, कानग्रेसांत क्ले ह्याची योजना झाली नाहीं. परंतु, त्या उद्योगानें, एब्राहाम लिंकनाविषयीं मात्र लोकांची पूज्यबुद्धि विशेष वाढली; आणि, पुढें, इ० स० १८४६ च्या अखेरीस, त्याला हौस आफ रेप्रिझेंटेटिव्ह ह्यामध्यें सभासद नेमिलें. ह्मणजे चमत्कार असा पहा कीं क्लेकरितां केलेली खटपट एब्राहाम लिंकनाच्या कल्याणास कारणभूत झाली. परोपकाराचें बीज पेरिलें असतां त्याचें फल विलक्षण येतें ह्मणतात. त्याचें हें एक ठळक उदाहरण आहे.

कानग्रेसामध्यें प्रविष्ट झाल्यावर एब्राहाम लिंकनास एक जबरदस्त प्रतिपक्षी मिळाला. त्याचें नांव डग्लस असें होतें. तो चांगला शिकलेला होता. तो वक्ताही चांगला होता. परंतु, त्याचीं मतें, विशेषेंकरून गुलामांचा व्यापार आणि गुलाम राखणें ह्याविषयीं अगदीं एब्राहाम लिंकन ह्याच्या विरुद्ध होतीं. एब्राहाम लिंकनाचें ह्मणणें असें होतें कीं, गुलामांचा क्रयविक्रय करणें आणि गुलाम ठेवणें हें महत्पाप आहे; तें मनुष्यास जसें अत्यंत दुःखदायक आहे, तसें देवालाही अप्रिय आहे, ह्यास्तव तें अगदीं नाहींसें केलें पाहिजे. परंतु, त्या वेळीं कितीएक संस्थानांमध्यें—आणि त्यांत विशेषेंकरून दक्षिणेकडच्या संस्थानांमध्यें—इतके सिद्दी गुलाम मोठमोठ्या शेतकऱ्यांच्या घरीं होते कीं, त्यांचीं शेताचीं वगैरे बहुतेक सगळीं कामें त्यांच्या श्रमांवर अगदीं अल्पखर्चानें चालत असत. त्यामुळें, गुलामगिरी बंद करण्याचें नांव काढिलें कीं, त्यांचें पित्त खवळून जात असे,

आणि अशी जी मोठी मंडळी तेव्हां विद्यमान होती, तींतल्या पुढाऱ्यांतला डग्लस हा एक गृहस्थ होता. गुलामांच्या प्रकरणावरून, कानग्रेसामध्यें दुफळी होती; आणि स्वपक्षकार्य सिद्धीस नेण्यास दोन्ही पक्ष झटत असत, त्यामुळें त्यांच्यांतला वैरभाव वाढत चालला होता. तें पाहून, एब्राहाम लिंकन ह्यास पराकाष्ठेचें वाईट वाटत असे. तो प्रांतामध्यें फिरून, जागोजाग गुलामगिरीचा नाश करण्याविषयीं भाषणें करी; आणि त्यांचे पाठोपाठ डग्लस हा, गुलामांच्या व्यवहारापासून मोठा लाभ होत आहे असें दाखविण्याकरितां, त्या त्या ठिकाणीं जाऊन मोठ्या आवेशानें बोले. असा झगडा चालला. तेव्हां, कांहीं लोक ह्या पक्षाचे झाले आणि कांहीं त्या पक्षाचे झाले, अशी दुही माजून लोकांत बराच गोंधळ झाला; ह्याहीपेक्षां, कानग्रेसांत दुफळीचें प्रस्थ फार माजलें. त्या संबंधानें त्याला अतिशयित वाईट वाटत असे; आणखी, त्याविषयीं लोकांच्या मनाची उचल करण्यास तो पुष्कळ बोलत असे. त्यावरून, इ० स० १८५६ ह्या वर्षी प्रजासत्ताकपक्ष ह्मणून एक मंडळी स्थापित झाली. तींत एब्राहाम लिंकन ह्यानें एक फार उत्तम भाषण केलें. तें अमेरिकेच्या इतिहासांत मोठें प्रसिद्ध आहे. त्याचा आरंभ त्यानें असा केला आहे:—"घरांत कलह उत्पन्न झाला, ह्मणजे तें कधींही चांगलें नांदावयाचें नाहीं. ह्या राज्यामध्यें, अर्धे कारभारी गुलामगिरी नको ह्मणणारे आणि अर्धे पाहिजे ह्मणणारे असे आहेत, हें फार वेळ निभावयाचें नाहीं." आणखी त्यानें गुलामपक्षाचा अतिशयित निषेध केला. त्यावरून कांहीं मंडळी अतिशयित चिडली, आणि त्याचा द्वेष करूं लागली. तों तों, गुलामगिरी नाहींशी करण्याच्या प्रयत्नाविषयीं एब्राहाम लिंकनास अधिकाधिक उत्तेजन आलें; आणि त्याच्या अंतः-

करणांतला दृढ निश्चय पुष्कळ वाढला. तो पाहून, त्याच्या पक्षाच्या लोकांस अधिकच स्फुरण चढलें. तें इतकें कीं, एके वेळीं, त्याच्या उत्तम भाषणावरून अत्यंत आनंद पावून, त्यांनीं त्याला, खांद्यावर घेऊन, एका मोठ्या नामांकित भोजनगृहांत नेलें, आणि त्याला तेथें मोठी मेजवानी दिली. होतां होतां, शेवटीं असें झालें कीं, एब्राहाम लिंकनासारखा वक्ता आणि स्वदेशहितचिंतक सगळ्या अमेरिकेंत दुसरा एक देखील नाहीं. त्याचा प्रतिस्पर्धी डग्लस हा मोठा विद्वान् आणि वक्ता होता; आणि त्याच्या पक्षाचे लोकही कांहीं थोडे नव्हते; तरी, सत्पक्ष एब्राहाम लिंकनाकडे होता. त्याचें तेज कांहीं विलक्षण होतें. त्यापुढें ती प्रतिपक्षी मंडळी अगदीं दिपून जाई; आणि चारचौघांत ती फिकी पडे.

एब्राहाम लिंकन ह्यास संस्थानाच्या स्वातंत्र्याचा मोठा अभिमान असे. आणि त्याविषयीं बोलतांना त्याला फार आवेश येई. प्रतिपक्ष्यांशीं भाषण करीत असतां तो त्यांस एकदां ह्मणाला, "मीं सांगितलेल्या एवढ्या पवित्र तत्वांचें रक्षण करून मग माझें हवें तें करा. राजसभेमध्यें स्थान मिळविण्याच्या कामांत माझा पराभव करूनच कां राहतां, पाहिजे तर मला धरा आणि जिवें मारा. त्याविषयीं माझी तक्रार मुळींच नाहीं. इहलोकचें सुख आणि श्रेष्ठत्व मला नको आहे, असा डौल मी करीत नाहीं. परंतु, ह्या सध्यांच्या झगड्यामध्यें माझी दृष्टि केवळ त्या अधिकाराकडेसच नाहीं; तर, त्या अधिकारापेक्षां अधिक श्रेष्ठ आणि अधिक पवित्र असा कांहीं एक हेतु माझ्या अंतःकरणांत आला आहे, आणि त्याच्या धोरणानें मी वर्तत आहें. तुह्मांला माझी प्रार्थना एवढीच आहे कीं, ह्या झगड्यामध्यें यश कोणाही माणसाला मिळो. त्याची परवा तुह्मी

करूं नका. कां कीं, तो विचार अगदीं यःकश्चित् आहे. ... मला वाटतें कांहींच नाहीं. मी कांहीं नाहीं; आणि डग्लसही कांहीं नाहीं. परंतु, भूतदयेचा अविनाशी ध्वज—जो, अमेरिकेंतल्या संस्थानांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा—त्यास ढका लागे असें करूं नका, ह्मणजे झालें." अशा प्रकारच्या भाषणांनीं त्यानें लोकांस अगदीं आपलेंसें करून घेतलें. आणि, एब्राहाम लिंकनासारखा थोर मनुष्य सगळ्या स्वतंत्र संस्थानांत नाहीं, अशी त्याची आख्या झाली. ह्याचें कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. स्वहिताकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, सत्यशीलतेनें वागावयाचें, आणि करवेल तितका परोपकार करावयाचा, अशी ज्याची वृत्ति होते, त्याचा मान अगदीं देवाप्रमाणें होतो, असा अनुभव आज कितीएक युगांपासून आलेला आहे.

कानग्रेसाच्या सभासद्पणाची मुदत सरली ह्मणजे एब्राहाम लिंकनाची निवड पुनः व्हावी, आणि पुनः त्यामध्यें त्यानें कायावाचामनेंकरून आपलें काम करावें, असें होतां होतां, इ० स० १८६० हें वर्ष प्राप्त झालें. तेव्हां त्याचें वजन फारच वाढलें होतें. आणखी, गुलामांच्या प्रकरणावरून तो, उत्तरेकडच्या संस्थानांतल्या लोकांस अत्यंत पूज्य वाटूं लागला होता. आणखी, त्या सुमारास स्वतंत्र संस्थानांच्या जुन्या अध्यक्षाची मुदत संपत येऊन, त्याचे जागीं नवा अध्यक्ष निवडण्याची गडबड चालली होती. तींत डग्लस आणि एब्राहाम लिंकन ह्या दोन्ही गृहस्थांचे पुरस्कर्ते, आपापल्या मित्रास त्या महत्पदास चढविण्यास पराकाष्ठेची खटपट करून राहिले होते. त्यांच्या सभा जागोजाग होत होत्या; आणि त्यांत मोठमोठीं भाषणें चाललीं होतीं, आणखी ह्या दोघांशिवाय पांच असामींची खटपट चालली होती, ती वेगळीच. पण हें सगळें प्रकरण बहु-

मतावर अवलंबून होतें. संस्थानांनीं आपसांत बहुमत पाहून जे लोक अध्यक्षाच्या जागेकरितां उमेदवार ह्मणून उभे करावे, त्या सर्वांविषयीं, सगळ्या संस्थानांच्या लोकांचें बहुमत काय पडतें तें पाहून, त्यांत ज्याला अधिक मतें मिळतील, त्याला नेमावयाचें, अशी जी तिकडे मामूल वहिवाट आहे, तीप्रमाणें सर्व तयारी झाली, आणि आतां निकाल लागावयाचा अशी वेळ आली. तेव्हां सर्वांचे डोळे त्या निकालाकडे लागले. आणि शिकागो येथें, इ० स० १८६० च्या जून महिन्याच्या १६ व्या तारखेस, पंचवीस हजार लोकांच्या सभेमध्यें, त्या प्रकरणाचा निकाल होऊन, एब्राहाम लिंकन ह्यास सगळ्या संस्थानांचा अध्यक्ष नेमिलें. तेव्हां, उत्तरेकडील संस्थानांत जिकडेतिकडे सर्व लोकांस अत्यानंद झाला. मोठमोठ्या शहरांत तोफा सुटून सगळा देश दणाणून गेला.

ह्या निकाल एब्राहाम लिंकनास तारायंत्रद्वारें स्प्रिंगफील्ड येथें कळला. तेव्हां त्याला बरें वाटलें. परंतु, फार मोठा आनंद झाला असें नाहीं. कां कीं, त्या कामाची जबाबदारी केवढी मोठी होती, आणि तें काम किती कठिण होतें, हें तो जाणून होता. तरी, मिळालेलें काम यथाशक्ति करावयाचें, असा दृढ निश्चय त्यानें केला. त्या वेळीं लोकांत दोन फळ्या होत्या. त्यांच्या संबंधानें एब्राहाम लिंकनाचें मन कसें चिंताक्रांत होतें, तें निवड झाल्यावर आणि पदारूढ होण्याच्या आधीं, मधल्या वेळांत जी एक गोष्ट घडून आलेली लिहिली आहे, तीवरून कळून येतें. ती गोष्ट अशीः—स्प्रिंगफील्डच्या सरकारी कचेरीमध्यें एके वेळीं पुष्कळ लोक जमले होते; त्यांत एब्राहाम लिंकन हा होता. आणि तेथें ह्या नव्या अध्यक्षाच्या गोष्टी चालल्या होत्या. तेव्हां, बेरमन ह्या नांवाच्या गृहस्थानें, त्यास विचारिलें कीं, तुमचा सत्पक्ष असतां, कितीएक लोकांचीं मतें तुमच्या वि-

रुद्ध पडलीं हें कसें? त्यावर त्यानें त्यास उत्तर दिलें, "पहा, दूरची गोष्ट कशाला पाहिजे; आतां येथें तेवीस धर्मोपदेशक वेगळ्यावेगळ्या पंथाचे आहेत; आणि ह्यांतले वीस माझ्या विरुद्ध आहेत. ह्यांस काय ह्मणावें? ह्यांस ठाऊक आहे कीं, राज्यांत सगळीं माणसें स्वतंत्र असावीं, आणि संस्थानांतल्या कायद्याप्रमाणें त्यांच्या स्वतंत्रतेचें रक्षण व्हावें, असें माझें मत आहे, आणि माझे प्रतिस्पर्धी माझ्या विरुद्ध मताचे आहेत. मग ह्यांनीं असें कां करावें बरें? आणखी हें पवित्र धर्मशास्त्र हातांत घेऊन ते उपदेश करीत असतात. ह्या शास्त्राच्या मतानें ह्मटलें ह्मणजे, ह्या पृथ्वीवर गुलामगिरीस तिळभरही कोठें जागा मिळावयाची नाहीं. असें असून हे लोक माझ्या विरुद्ध मत देतात! हें कसें तें मला कळत नाहीं." असें बोलून तो थोडासा थांबला, आणि अळकुवा होऊन डोळ्यांत आसवें आणून ह्मणाला, "महाराज, मी खचीत जाणतों कीं, परमेश्वर आहे, खचीत आहे; आणि त्याला गुलामगिरी आणि अन्याय ह्यांचा मोठा तिटकारा आहे. मजवर मोठें काहूर उठत आहे, हें मला स्पष्ट दिसत आहे; आणि त्यांत ईश्वरेच्छा आहे, तीही मला ठाऊक आहे. मीं कांहीं काम करावें अशी जर त्याची इच्छा असेल, तर मी त्यास तयार आहें. आणखी त्याची इच्छा अशी आहे, असें मला वाटतें—वास्तविक पाहिलें असतां, मी ह्मणजे पदार्थ काय? कांहीं नाहीं. जें काय आहे तें सत्य आहे. माझी खातरी आहे कीं, माझा पक्ष खरा आहे; कां कीं, स्वातंत्र्य हें सत्यस्वरूप आहे. आणि परमेश्वर जो प्रभु येशूख्रिस्त त्यानें असें ह्मटलें आहे कीं, स्वातंत्र्य हें सत्यस्वरूप आहे. मी त्यांना कधींच सांगितलें आहे कीं ज्या घरांत कलह उत्पन्न झाला आहे,—फळ्या झाल्या आहेत—तें घर कधीं नांदावयाचें नाहीं. प्रभु

येशू तेंच ह्मणतो; आणि विचारबुद्धीसही तेंच खरें वाटतें. आ-
णखी, परिणामीं तेंच त्याच्या प्रतीतीस येईल. गुलामगिरी
राहो किंवा जावो, डग्लस हा त्याची परवा मुळींच करीत नाहीं.
तो न करो. परंतु त्याविषयींची काळजी देवाला आहे, भूतद-
येला आहे, आणि मला आहे. आणि मला जर परमेश्वर साह्य
करील, तर मला ह्या कामांत खचीत यश येईल. माझ्या उ-
द्योगाचा शेवट मला आज दिसत नाहीं. परंतु तो केव्हां तरी
खचीत होईल; तो लोकांच्या दृष्टीस पडेल; मग त्यांस माझें ह्म-
णणें बरोबर होतें असें वाटेल; आणखी मग त्यांना असा पश्चा-
त्ताप होईल कीं, आपणांस पवित्रशास्त्राचा अर्थ बरावर समजला
नव्हता, ह्मणून आपले हातून ही चूक झाली."

ह्यानंतर, अध्यक्षाच्या कामावर जाण्याच्या आधीं, त्यानें
आपल्या आईची भेट घेतली. ती स्प्रिंगफील्डापासून बरीच दूर
आपल्या मुलीच्या येथें राहात होती. तिचा निरोप घेऊन तो
निघाला, तेव्हां, तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या;
आणि खरोखर तिच्या मनांत असें आलें कीं, हा पुनः आपल्या
दृष्टीस पडेल कीं नाहीं, कोण जाणे; कां कीं, ह्याला शत्रु फार
झाले आहेत, ते ह्याचें कोणत्या वेळीं काय करतील कोण जाणे.
हें केवळ तिच्याच मनांत आलें असें नव्हे; तर, त्याच्या इतर
आप्तांसही असेंच भय पडलें. आणि चमत्कार पहा कीं तें
पुढें खरें झालें. पुढें होणारी गोष्ट कधीं कधीं मनुष्याच्या म-
नांत आधीं येत असते, असें जें ह्मणतात, त्याचें हें एक उदाह-
रण आहे.

फेब्रुआरी महिन्याच्या ११ व्या तारखेस तो, वाशिंगूटन येथें
जाण्याकरितां, स्प्रिंगफील्ड येथून निघाला. तेव्हां त्याला पोंच-
विण्यास तेथल्या स्टेशनावर इतके लोक आले होते कीं, त्यांच्या

गर्दीमुळें तेथें दुसऱ्या माणसांचा रिघाव कांहीं वेळपर्यंत होईना. त्या लोकांस असें वाटलें कीं, आज आपला एक मोठा हितकर्ता आपणांस सोडून चालला आहे. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहात होत्या; आणि त्यांजकडे पाहून एब्राहाम लिंकनाचा कंठ दाटून आला, डोळे पाण्यानें भरून आले, आणि त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. तरी धीर करून, तो त्यांजकडे वळून, अगदीं निघतेवेळीं त्यांस ह्मणाला, "माझ्या मित्रांनो, आतां तुह्मांला सोडून जाण्यास मला किती वाईट वाटत आहे तें, मजशिवाय दुसऱ्या कोणास कळावयाचें नाहीं. मला जी स्थिति आज प्राप्त झाली आहे, ती केवळ तुमच्या कृपेची देणगी आहे. मीं ह्या ठिकाणीं आज पंचवीस सत्तावीस वर्षें घालविलीं. माझीं मुलें येथें जन्मलीं. त्यांतलें एक गत झालें. आतां पुनः तुमची आणि माझी गांठ केव्हां पडेल परमेश्वर जाणे. आज जितकें जोखीम माझ्या शिरावर पडलें आहे, तितकें जोखीम, वाशिंग्टनाच्या वेळेपासून आजपर्यंत कोणाच्याही शिरावर बहुतकरून पडलें नसेल. वाशिंग्टन ह्याचा सगळा भार परमेश्वरावर होता; आणि त्याला जें यश आलें, तें त्याच्या साह्यानें आलें. तें साह्य जर त्याला नसतें, तर तें यश त्याला आलें नसतें. आणखी मी खचीत जाणतों कीं, त्या साह्यावांचून माझ्या कामांत मला यश यावयाचें नाहीं; आणि माझा सगळा भरंवसा परमेश्वरी कृपेवर आहे. माझ्या मित्रांपाशीं माझें मागणें हेंच आहे कीं, परमेश्वरानें माझ्या कामांत मला साह्य करावें, ह्मणून त्यांनीं त्याची निरंतर प्रार्थना करावी. तें साह्य मिळाल्यावांचून माझे हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं; आणि तें साह्य मिळालें ह्मणजे यश आल्यावांचून राहावयाचें नाहीं. मजवर कृपालोभ असावाः— सलाम."

एब्राहाम लिंकन हा स्प्रिंगफील्डाहून निघाला, तेव्हांच, त्याच्या प्रतिपक्ष्यांचीं माथीं फिरल्यासारखीं दिसलीं, आणि, मधल्या बालटिमोर वगैरे प्रांतांतून जातांना त्याचा कोणी घात करील कीं काय अशी शंका तेव्हांच उत्पन्न झाली. ह्मणून, लागलाच गुप्त पोलिसाचा बंदोबस्त ठेविला, आणि उगाच भलत्या माणसानें एकदम त्याच्या सन्निध जाऊं नये असें केलें. अशा बंदोबस्तानें, तो सुरक्षितपणें वाशिंग्टन राजधानीस पोंचला; तेथें त्याचा फारच मोठा आदरसत्कार झाला. त्या प्रसंगीं, जमलेल्या मंडळीस अनुलक्षून, त्यानें, अधिकारारूढ होतांना, अध्यक्षाच्या नात्यानें आपलें पहिलें भाषण केलें. तें त्यानें लिहून आणिलें होतें. तें मोठें होतें. त्यांत पुष्कळ गोष्टींचा उलगडा केलेला होता; आणि तें भाषण दोन्ही पक्षांच्या लोकांस उद्देशून योजलेलें होतें. त्याच्या शेवटीं शेवटीं तो मोठ्या आवेशानें ह्मणाला, "मद्देशबांधवहो, ह्या सगळ्या विषयावर आपण शांतपणें पोक्त विचार करा. विचार करण्यांत वेळ गेला तर त्यांत कधीं हानि होत नाहीं···जो वाद सध्या चालला आहे, त्यांत, अहो असंतुष्ट देशबांधवांनो, जर तुमचीं मतें योग्य आणि खरीं असलीं, तर, त्यांप्रमाणें एकदम कृति करण्याची घाई करण्यास कांहीं कारण नाहीं. विचारबुद्धि, स्वराष्ट्राभिमान, ख्रिस्ती धर्म, आणि भक्तकामकल्पद्रुम जो परमेश्वर तो, ह्यांस कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं. हीं तत्वें तुमच्या आमच्यांतला सगळा मतभेद नाहींसा करण्यास आणि आपलें ऐक्य करण्यास समर्थ आहेत.···आपसांत लढाई होण्याचीं जीं सूत्रें आहेत, तीं, अहो तुह्मी असंतुष्ट मद्देशबांधवहो, तुमच्या हातांत आहेत; माझ्या हातांत नाहींत. सरकार तुह्मांवर कधीं हल्ला करणार नाहीं. तुह्मीं स्वतः कलहास आरंभ केल्यावांचून

कलह माजावयाचा नाहीं. ह्या सरकाराचा नाश करून टाकावा अशी कांहीं तुह्मीं शपथ घेतलेली नाहीं. आणि मी तर ह्या राज्यव्यवस्थेचें रक्षण करण्याची शपथ घेणार.•••आतां हें भाषण आटपलें पाहिजे. पण मला आटपावेंसें वाटत नाहीं. महाराज, आपण एकमेकांचे शत्रु नाहीं, मित्र आहों. आपण शत्रु नसावें हेंच योग्य आहे. रागाच्या आवेशांत एकादी गोष्ट होऊन गेली असली, तर, तेवढीवरून आपण विभक्त व्हावें, आपण एकमेकांस पाण्यांत पाहावें–हें योग्य नाहीं•••" हें भाषण ऐकून सगळे लोक थक्क झाले. त्यांत त्याच्या प्रतिपक्ष्यांस देखील विलक्षण आश्चर्य वाटलें. परंतु, त्यांच्या मनांत जे ग्रह दृढ भरले होते, त्यांच्या पुढें त्यांचा उपाय चालेना. आणि त्यामुळें, ह्या अधिकाराच्या प्राप्तीनें एब्राहाम लिंकनास जो आनंद झाला होता, त्यापेक्षां, शिरावर आलेल्या जबाबदारीची जोखीम त्याला फार जाणवत होती, असें केवळ त्याच्या भाषणावरूनच नव्हे; तर, त्याच्या मुखचर्येवरून देखील स्पष्ट दिसत होतें. आणि तो प्रसंग कोणत्याही माणसाला, तसाच विकट वाटला असता. त्याचें साद्यंत कथन करण्यास फार लिहिलें पाहिजे. त्यास आतां अवकाश नाहीं.

तरी खरोखरीच तो प्रसंग मोठा आणीबाणीचा होता. तो असा. दक्षिणेकडच्या कितीएक संस्थानांमध्यें गुलाम पुष्कळ होते; त्यांच्या योगानें त्यांच्या धन्याचा फायदा पुष्कळ होत असे, अशी त्या लोकांची समजूत होती; तो गुलामगिरीचा प्रकार अगदीं मोडून टाकावा, अशी एब्राहाम लिंकनाची आणि उत्तरेकडच्या कितीएक संस्थानांची इच्छा होती. त्यामुळें दक्षिणेकडचीं संस्थानें उत्तरेकडच्या संस्थानांस आणि एब्राहाम लिंकनास पाण्यांत पाहात असत. आणखी, त्यांची सगळी खटपट व्यर्थ

जाऊन एब्राहाम लिंकन ह्यास अध्यक्षाचें स्थान मिळालें, तेव्हां तर त्यांच्या पायांची आग मस्तकास चढली; आणि त्याची खोड मोडण्याविषयीं त्यांस मोठा आवेश चढला. त्यांत साउथ कारोलिना ह्या संस्थानांतल्या लोकांनीं, चार्लस्टन येथें एक मोठी सभा भरून, सर्वानुमतें असें ठरलें कीं, "साउथ कारोलिना ह्या संस्थानांचा ऐक्याचा जो संबंध इतर संस्थानांशीं आजपर्यंत होता, तो आज तुटला आहे." ह्याचें कारण त्यांनीं असें प्रगट केलें कीं, अध्यक्षाची योजना करण्याच्या कामांत जो पक्ष यशस्वी झाला आहे, तो गुलामांच्या व्यापाराच्या विरुद्ध आहे, त्याचें आणि आमचें जमत नाहीं. हें एवढेंच करून ते स्वस्थ राहिले नाहींत. तर लागलीच त्यांनीं आपली एक मंडळी नेमिली; ती अशाकरितां कीं, आपल्या संस्थानांप्रमाणें जीं दुसरीं संस्थानें गुलामगिरीच्या व्यापारास अनुकूल असतील, तीं, एकंदर स्वतंत्र संस्थानांच्या ऐक्यांतून फोडून आपल्या कटांत घ्यावीं; आणि, राष्ट्रीय मालमत्तेची आणि कर्जाची वांटणी स्वतंत्रसंस्थानांपासून वेगळी करून घ्यावी. ह्या मंडळीचे प्रयत्न व्यर्थ गेले नाहींत. इ० स० १८६१ च्या आरंभींच, दक्षिणेकडचीं आणखी साहा संस्थानें, स्वतंत्र संस्थानांच्या ऐक्यांतून फुटून, साउथ कारोलिना ह्या संस्थानास मिळालीं. अशीं एकंदर सात संस्थानें एकचित्त झाल्यावर, त्यांनीं लागलाच बंडाचा झेंडा उभारिला. त्यांनीं आपल्या एकंदर कटाला कानफेडरेट असें नांव दिलें. आणि स्वतंत्र संस्थानांप्रमाणें, जेफरसन डेव्हिस ह्यास सर्व कानफेडरेट संस्थानांचा अध्यक्ष नेमिलें. नंतर, पुष्कळ सैन्य जमवून, उत्तरेकडच्या संस्थानांशीं लढण्याची तयारी केली; आणि, त्या संस्थानांचीं जीं ठाणीं त्यांस आसपास सांपडलीं, त्यांवर हल्ला करून, तीं लुटून फस्त करून टाकिलीं. अशा प्रकारेंकरून वैरास आरंभ झाला.

पूर्वीच्या अध्यक्षांच्या कारकीर्दीमध्यें दक्षिणेकडच्या लोकांचें मांहात्म्य फार होतें; आणि बहुतेक मोठमोठ्या सरकारी कामाच्या जाग्यांवर तिकडचे लोक होते. ते अद्यापपर्यंत तसेच होते. ते अशा आणीबाणीच्या प्रसंगीं इमानास एकीकडे ठेवून, डाव्या उजव्या हातानें, आपल्या पक्षपात्यांस साह्य करूं लागले. युद्धसंबंधीं प्रधान जो होता, तो त्यांच्यापैकीं एकजण होता. तेव्हां, युद्धसंबंधीं साहित्याचा सगळा अधिकार त्याच्या हातीं होता. त्यानें स्वतंत्र संस्थानांच्या खर्चानें पुष्कळ युद्धोपयोगी साहित्य तयार करवून, तें अशा ठिकाणीं नेऊन ठेविलें कीं, तें दक्षिणेकडच्या लोकांस अगदीं सहज घेतां यावें. त्याप्रमाणें ती मसलत साधली. शिवाय, सैन्याच्या लोकांची फुटाफूट अशी केली कीं, त्यांची जमवाजमव सहसा लवकर करतां येऊं नये. आणखी, खजिन्यांत शिलक मुळींच नव्हती. तेव्हां आतां पुढें करावें काय, असा विचार एब्राहाम लिंकनावर पडला.

ही आपसांतली लढाई होऊं नये, ह्मणून एब्राहाम लिंकनानें आपली पराकाष्ठा करून पाहिली; परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दक्षिणवाल्यांनीं लढाईचा निश्चय केला. तो ते कांहीं केल्या मागें घेईनात, आणि आपला हट्ट सोडीनात. अधिकारारूढ होऊन एब्राहाम लिंकनास पुरता एक महिना झाला नाहीं तोंच, चार्लस्टन येथें सम्टर हा किल्ला जो सरकारच्या स्वाधीन होता, त्यास दक्षिणवाल्यांनीं चौतीस तासपर्यंत वेढा घालून, आणि त्याजवर तोफांचा भडिमार करून, तो घेतला. तेव्हां त्याजवर सगळे सत्तर लोक होते. ही गोष्ट इ० स० १८६१ च्या एप्रिल महिन्याच्या १४ व्या तारखेस झाली. ही वस्तुतः फारशी मोठी नव्हती. परंतु, दक्षिणवाले आणि उत्तरवाले ह्यांच्या युद्धास आरंभ हिजपासून झाला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

नको नको ह्मणत असतां, दक्षिणवाल्यांनीं अशी आगळीक केल्याचें वर्तमान उत्तरवाल्यांच्या कानीं पडतांच, त्यांच्यामध्यें आपसांत जरी कांहीं मतभेद होते, तरी ते एकीकडे ठेवून, ते सगळे ह्या प्रसंगीं एकचित्त झाले; आणि दक्षिणवाल्यांचें बंड मोडावयाचें आणि एकंदर सगळ्या संस्थानांच्या ऐक्याचें रक्षण करावयाचें, असा त्यांनीं निश्चय केला. त्या कामाचा आवेश त्यांस मनस्वीच आला. तो इतका कीं, अध्यक्ष एब्राहाम लिंकन ह्यानें, लढाई करण्याकरितां पाऊण लाख सैन्याची मागणी त्यांजवर केल्या वेळापासून, दोन दिवसांच्या आंत त्यांनीं तितकें सैन्य त्यास तयार करून दिलें; आणि त्याप्रमाणेंच त्याच्या पुढच्या मागण्याही त्यांनीं मोठ्या त्वरेनें आणि आवेशानें पुरविल्या.

ह्या संकटाच्या वेळीं एक फार चमत्कारिक गोष्ट घडून आली, ती येथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, एब्राहाम लिंकनाचा मोठा जबरदस्त प्रतिपक्षी जो डग्लस तो, मतांतर झाल्यामुळें, एब्राहाम लिंकनास येऊन मिळाला, आणि मोठ्या आस्थेनें त्याला साह्य करूं लागला. एब्राहाम लिंकनानें पाऊण लाख नवें सैन्य मागण्याविषयींची आपली विनंती त्यास वाचून दाखविली; तेव्हां तो त्याला ह्मणाला, "पाऊण लाखानें काय होणार, दोन लाख मागा एकदम. त्या बंडखोरांच्या लुच्चेगिरीच्या मसलती तुह्मांला माहीत नाहींत, मला माहीत आहेत, ह्मणून सांगतों." ह्या वेळापासून एब्राहाम लिंकन आणि डग्लस हे अगदीं जिवलग मित्र झाले. आह्मांला तर असें वाटतें कीं, डग्लस ह्याच्या अंतःकरणांत जो एवढा मोठा पालट झाला, त्यास कारण एब्राहाम लिंकनाची साधुवृत्ति होय.

उभयपक्षांकडच्या सैन्यांची तयारी होऊन युद्धें चाललीं.

त्यांत कधीं ह्यांचा जय होई, कधीं त्यांचा जय होई. त्या सगळ्या लढायांचें वर्णन करणें हें आमचें काम नव्हे. तें काम मोठ्या इतिहासकाराचें आहे; त्याच्या भरीस आह्मी पडत नाहीं; तरी, ज्या मोठ्या लढायांच्या योगानें उभय पक्षीं मोठमोठे परिणाम झाले, त्यांचें संक्षिप्त कथन केलें पाहिजे. सम्टर किल्ला दक्षिणवाल्यांनीं घेतल्यावर, हार्पर्सफेरी येथें उत्तरवाल्यांचा जो पुष्कळ दारुगोळा ठेवलेला होता, तो घेतला; आणि गोस्पोर्ट येथें उत्तरवाल्यांच्या आरमारांचें पुष्कळ सामान होतें, त्यास उत्तरवाल्यांनींच आग लावून दिली; ती अशाकरितां कीं, तें दक्षिणवाल्यांच्या हातीं लागूं नये. ह्यानंतर बुलरन येथें उभयपक्षांची मोठी लढाई झाली. तीस आरंभ जुलै महिन्याच्या एकुणिसाव्या तारखेस झाला, आणि ती २२ व्या तारखेस आटपली. तींत उभयपक्षीं तयारी फार चांगली होती. आणि उभयपक्षांकडचे वीर परस्परांशीं मोठ्या निकरानें लढले. परंतु, शेवटीं दक्षिणवाल्यांस जय प्राप्त होऊन, उत्तरवाले इतके पराभूत झाले कीं, त्यांस पळ काढून आपले जीव बचावावे लागले. ह्या वेळीं, उत्तरवाल्यांची राजधानी वाशिंग्टन येथें तर मुळींच कांहीं बंदोबस्त नव्हता. दक्षिणवाल्यांनीं तिजवर जर एक हल्ला केला असता, तर ती त्यांस सहज सर करून घेतां आली असती. परंतु तेथें बंदोबस्त इतका कमी होता, हें त्यांस ठाऊक नव्हतें; ह्मणून ती वेळ तशी पार पडली. नाहीं तर अध्यक्ष लिंकन आणि त्याचे अनुयायी ह्यांजवर अनिवार्य संकट ओढवलें असतें. ह्या प्रसंगीं उत्तरवाल्यांचे पुष्कळ लोक मरण पावले, आणि जीवंत होते त्यांचा पराभव झाला, हें एके प्रकारीं ठीक झालें—तें मुद्दाम देवानेंच केलें—असें कितीएक ग्रंथकार ह्मणतात. आणि त्यास कारण असें सांगतात कीं, हा असा अनिष्ट प्रकार जर ह्या प्र-

संगीं घडला नसता, तर, उत्तरवाल्यांस दक्षिणवाल्यांचें खरें सामर्थ्य कळलें नसतें, आणि कदाचित् ते फार बेसावध राहिले असते, आणि शेवटीं नाश पावले असते. ही गोष्ट एका पक्षीं खरी आहे. परमेश्वर जें कांहीं करितो, तें आपल्या भक्तांच्या कल्याणाकरितां चांगलेंच करितो, वाईट कधीं करीत नाहीं, असें जें कांहीं भावार्थी लोकांचें ह्मणणें आहे, त्यास हें एक उदाहरण आहे. असो. ह्या वेळेपासून, उत्तरवाले विशेष सावध झाले, आणि आपलें काम विशेष आवेशानें करूं लागले, ह्यांत कांहीं भ्रांति नाहीं.

ह्या पराभवानंतर एब्राहाम लिंकनानें आणखी पन्नास हजार लोकांची मागणी संस्थानांवर केली. ती त्यांनीं लागलीच कबूल केली; आणि सर्वांनुमतें एकदम असा ठराव करून टाकिला कीं, दक्षिणवाल्यांस जिंकण्याकरितां एब्राहाम लिंकन जितका पैसा मागेल, आणि जितकें सैन्य मागेल, तितका पैसा आणि तितकें सैन्य त्यास द्यावें, उशीर लावूं नये. अशा प्रकारें, इ० स० १८६२ च्या अखेरीच्या सुमारास उत्तरवाल्यांकडे एकंदर साहा लक्ष चाळीस हजार सैन्य जमलें, आणि तें त्यांनीं मोठ्या विचारानें आणि युक्तीनें असें चोहींकडे वांटून ठेवून दिलें कीं, त्याच्यापुढें दक्षिणवाल्यांची कांहीं एक मात्रा चालूं नये.

तरी, उत्तरवाल्यांचें भोक्तृत्व संपलें नव्हतें. त्यांचा नामांकित सेनापति एमक्लिन, हा, आपल्या मोठ्या सैन्यासहवर्तमान, बंडवाल्यांचें राजधानीचें शहर रिचमंड हें घेण्याकरितां मोठ्या डौलानें आणि आवेशानें चालला असतां, त्यास वाटेंत दक्षिणवाल्यांच्या सैन्यानें गांठिलें, आणि त्याचा एवढा मोड केला कीं, त्याचे १५००० लोक समरांगणीं पाडून, बाकीच्यांस—दे माय धरणी ठाय करून पळायास लाविलें. हें वर्तमान ऐकून, दुसरा

एकादा मनुष्य तर अगदीं गडबडून गेला असता, आणि त्यानें कदाचित् पुढें लढाई चालविण्याचा उद्योग सोडून देखील दिला असता. परंतु, एब्राहाम लिंकन ह्याची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट झाली. ह्मणजे ह्या वर्तमानानें त्याचें धैर्य तर खचलें नाहींच; पण, त्याला अधिक वीरश्री चढली; आणि त्यानें लढाईची तयारी पहिल्याहीपेक्षां अधिक जोरानें चालविली. त्यानें एकदम आणखी तीन लक्ष सैन्य मागितलें; तें ठेवण्याचा हुकूम झाल्यावर आणखी तीन लक्ष मागितलें; तेंही त्यास मिळालें. तेव्हां त्याला पहिल्यापेक्षां अधिक आवेश आला. आणि त्या आवेशासरसा त्यानें आपला पहिला विचार बदलून एक अगदीं नवा संकल्प केला. आणि तो संकल्प, परमेश्वरकृपेनें सिद्धीस गेल्याच्या योगानें त्याचें नांव स्वतंत्रता देवतेच्या पुराणामध्यें सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखें झालें आहे.

तो संकल्प असा. ही लढाई, प्रथम जी चालू झाली, ती, गुलामगिरी अजीं बंद करण्याच्या उद्देशावरून चालू झाली नाहीं, तर, गुलामांचा व्यापार करणें आणि गुलाम राखणें हीं, कांहीं संस्थानांत, मामुल वहिवाटीप्रमाणें आणि मूळच्या ठरावाप्रमाणें जीं चालत होतीं, तीं, आपले हातपाय पसरून बाहेर येऊं लागलीं होतीं, तीं बाहेर येऊं नयेत, आहेत तेथेंच राहावीं, असें एब्राहाम लिंकनाचें ह्मणणें होतें. तें दक्षिणवाले जुमानीनात; आणि त्या दोन्ही गोष्टींचा प्रसार जवळच्या इतर संस्थानांत होऊं लागला; ह्मणून त्याच्या बंदोबस्ताकरितां ही झटापट मूळ चालू झाली. परंतु एब्राहाम लिंकनाला आतां असें वाटलें कीं, हें काम अर्धें टाकणें बरें नाहीं. तें एकदम सगळें करून टाकण्याचा वेळ आला आहे. तर तें करून टाकावें. आतां एर्वीतेर्वीं ही लढाई लवकर आटोपत नाहीं; मग गुलामगिरी अजी-

वात नाहींशी करून टाकण्याचा प्रयत्न कां करूं नये? ह्या विचारानें सहस्रावधि लोकांस लक्षावधि प्राण्यांचें नुकसान सोसावें लागणार आहे, आणि जी गोष्ट आजपर्यंत कायदेशीर ह्मणून चालत आली आहे, ती आपण मोडून लोकांचें तें नुकसान आपण केलें, असें अपेशाचें खापर आपल्या माथीं फुटणार आहे, हे विचार त्याच्या मनांत घोळत होते. यामुळें—करूं का नको, खाल्लें तर बाधेल आणि टाकलें तर शापील—असें त्याला झालें होतें. परंतु, शेवटीं, न्यायवृत्तीचा जय त्याच्या अंतःकरणांत होऊन, तिनें त्याजकडून असा निर्धार करविला कीं, कांहीं होवो, गुलामगिरी समूळ नाहींशी करून टाकावयाची. त्याप्रमाणें, मोठ्या निश्चयानें आणि धैर्यानें इ० स० १८६३ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस–पाडव्याच्या मुहूर्तावर त्यानें जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, सर्व संस्थानांतले सर्व गुलाम आजपासून मुक्त झाले आहेत, असें समजावें. त्यांजवर त्यांच्या यजमानांची कोणत्याही प्रकारची सत्ता नाहीं; आणि ते इतर लोकांप्रमाणें स्वतंत्र आहेत; त्यांच्या स्वातंत्र्यास जो कोणी बाध आणील, तो सरकाराचा गुन्हेगार समजून त्याला शासन होईल. अशा अर्थाचा जाहीरनामा सगळ्या संस्थानांतून प्रसिद्ध झाल्याबरोबर, चाळीस लक्ष गुलाम स्वतंत्र लोक झाले; आणि त्यांचे धनी निरुपाय होऊन स्वस्थ बसले नाहींत, तर, अतिशयित चवताळून, एब्राहाम लिंकनाच्या नांवानें दगड फोडूं लागले; आणखी कांहीं झालें तरी एब्राहाम लिंकनाचा आणि त्याच्या अनुयायांचा सूड घेतल्यावांचून रहावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. तेव्हां लढाई विशेष आवेशानें चालू झाली, हें उघडच आहे.

ह्या इतिहासप्रसिद्ध जाहीरनाम्यावर सही करण्याच्या वेळची

एब्राहाम लिंकनाची एक चमत्कारिक गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. ती अशी कीं, ह्या जाहीरनाम्यावर सही करावी—न करावी—काय होईल कोण जाणे—असें त्याचें मन द्विधा झालेलें होतें; तें स्थिर नव्हतें; तरी, पूर्वसंकेताप्रमाणें तो तयार झाल्यावर सहीकरितां त्याच्या पुढें आला तेव्हां, हातांत लेखणी घेऊन त्यानें चटकन सही तर केलीच. परंतु मनांतला कंप हातांत येऊन, तो त्या सहींतही दृश्यमान होत होता. त्या सहीकडे पाहून तो आपणच ह्मणाला, "सकाळपासून काम कर करून माझा हात थकून गेला आहे, ह्मणून ही सही अशी कांपरी आली आहे. माझी सही कांपरी असेना कां; माझा निश्चय दृढ आहे. मी बंडवाल्यांस मागच्या ससंबरांतच कळविलें आहे कीं, तुह्मी आपल्या प्रजाधर्मास जागून चांगल्या शांत रीतीनें राहाल, आणि आमच्या सैन्यास त्रास देणार नाहीं, तर आह्मी तुह्मांला चकारशब्द देखील बोलणार नाहीं; पण जर तुह्मी प्रजाधर्मास जागणार नाहीं, आणि अशी दांडगाई कराल, तर तुमच्या बळाचा जो मुख्य खांब त्यावर आह्मी कुऱ्हाड घालूं. तें आमचें ह्मणणें आह्मी आतां खरें करितों. आतां आमचेकडे बोल नाहीं."

हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर, दक्षिणवाल्यांकडे जे सुमारें चाळीस लाख गुलाम होते, ते स्वतंत्र झाले, तितकें त्यांचें बळ कमी झालें; आणि त्यांतले कितीएक चांगले लोक, उत्तरवाल्यांच्या सैन्यांत शिपायी होऊन राहिले. अशा प्रकारेंकरून, दक्षिणवाल्यांचा काळ एकदम फिरला. त्यांस एकामागून एक अपजय येत गेले; आणि उत्तरवाल्यांस अत्यानंद होऊन, त्यांच्या तोंडच्या जयजयकारानें दिशा दणाणून गेल्या.

तरी उभयपक्षांच्या लढायांचा धुमाकूळ चाललाच होता. इ० स० १८६३ च्या जुलै महिन्यामध्यें बंडवाल्यांनीं मेरिल्यांड

आणि पेनसिलव्हानिया ह्या प्रांतांत शिरून, जाळपोळ करून, आणि मारहाण करून असा कांहीं अनर्थ मांडिला कीं, त्याची हकीकत वाचिली असतां आंगावर रोमांच उभे राहातात. त्या प्रांतांच्या संरक्षणास संस्थानांचें सैन्य धांवलें. तेव्हां गेटिवर्ग येथें उभयपक्षांचा तुमुल युद्धप्रसंग झाला. त्यांत बंडवाल्यांचा अतिशयित नाश होऊन ते अगदीं पराभव पावले. हें वर्तमान एब्राहाम लिंकन ह्यास कळलें तेव्हां त्याला परम संतोष झाला. आणि त्यानें, आपल्या नित्याच्या परिपाठानुरूप, सगळ्या देशभर जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्याच्या शेवटीं असें ह्मटलें होतें कीं, "ज्या विश्वेश्वराची इच्छा सर्वत्र चालावयाची, त्याचें स्मरण ठेवा, आणि अत्यंत कृतज्ञतापूर्वक त्याचे आभार माना." ही लढाई केवढी मोठी झाली ह्याची कल्पना मनांत येण्यास एवढेंच सांगतों कीं, हींत, संस्थानांच्या वतीच्या सैन्यांतले मेले, जखमी झाले आणि चुकले, ह्यांची एकंदर गणती तेवीस हजार झाली; आणि शत्रूचा नाश ह्याहीपेक्षां अधिक झाला; त्याची संख्या जरी बरोबर कोठें लिहिली नाहीं, तरी त्यांच्यांतले चौदाहजार लोक पाडाव होऊन, उत्तरवाल्यांच्या हातीं लागले.

पेनसिलव्हानिया शहराजवळ एक मोठी चकमक झडून पुष्कळ वीर पतन पावले. त्यांचीं थडगीं तेथेंच बांधण्याकरितां तेथल्या स्मशानभूमीजवळच एक जमिनीचा तुकडा तेथील लोकांनीं विकत घेऊन दिला. त्या कामास तो अर्पण करण्याचा समारंभ नोवेंबर महिन्यांत झाला. त्या वेळीं एब्राहाम लिंकन वगैरे मोठमोठी मंडळी आली होती. त्या प्रसंगीं त्यानें जें भाषण केलें, त्याचें तात्पर्य असें:—

"आज सत्यायशीं वर्षांच्या मागें आपल्या पूर्वजांनीं एक नवें

राष्ट्र ह्या खंडांत आणिलें. त्या राष्ट्राचें जनन स्वातंत्र्यांत झालें होतें, आणि त्या राष्ट्राचें ब्रीद असें होतें कीं, परमेश्वरानें सर्व माणसें एकसारखीं निर्माण केलीं आहेत. ह्मणजे त्यांमध्यें लहान थोर हा भेद नाहीं—सर्वांचे हक्क सारखे आहेत. आतां आपणामध्यें मोठी लढाई चालली आहे; आणि हें ब्रीद कोठपर्यंत कसें निभतें ह्याची परीक्षा ह्यांत व्हावयाची आहे.... हें आपल्या राष्ट्राचें ब्रीद कायम—अचळ—राहावें, ह्मणून ज्यांनीं आपले जीव खर्चीं घातले आहेत, त्यांच्या देहांस विश्रांतिस्थान अर्पण करण्याकरितां आपण आज येथें जमलों आहों....आज आपण येथें काय बोलत आहों आणि काय करीत आहों, ह्याचा कोठें मागमोस राहावयाचा नाहीं. परंतु, त्या शूरपुरुषांनीं जे पराक्रम येथें केले आहेत, ते कधीं कोणी विसरणार नाहीं. त्यांच्या देहांस हा एवढासा जमिनीचा तुकडा अर्पण करणें हें कांहींच नाहीं. तर, जें काम, आपले अमोलिक जीव खर्चीं घालून, त्यांनीं अर्धवट करून ठेविलें आहे, तें पूर्ण करण्याच्या उद्योगास आपण आपलें सर्वस्व अर्पण करणें हें खरें अर्पण होय, ह्मणजे, त्या थोर पुरुषांनीं आपले जीव खर्चीं घातले आहेत, ते फुकट खर्चीं घातले नाहींत, तर ते उत्तम सार्थकीं लाविले आहेत, हें आपल्या सर्वस्वार्पणावरून जनांस कळलें पाहिजे. आमच्या ह्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यानें पुनः नवा अवतार घ्यावा; आणि ह्या पृथ्वीवर, लोकांनीं आपलें राज्य आपल्या सुखार्थ चालवावें हीं जी पवित्र आणि अत्युत्तम राज्यपद्धति आहे, ती निरंतर चालावी.” ह्यावरून, संस्थानांच्या स्वातंत्र्यरक्षणकार्यास एब्राहाम लिंकन ह्याचें अंतःकरण किती वाहलेलें होतें, हें अगदीं स्पष्ट दिसून येतें.

ह्यानंतर उत्तरवाल्यांची सरशीच होत गेली. आणि व्हि

क्सबर्ग येथें त्यांस मोठा जय मिळाला. शिवाय आणखीही कितीएक जागीं एब्राहाम लिंकनाच्या सैन्यानें जय मिळवून, बंड-वाल्यांचा पराभव केला. ह्या जयाचीं वर्तमानें त्या साधुपुरुषास कळतांच, त्याला अत्यानंद झाला, आणि हें सगळें परमेश्वरी कृपेचें फल आहे—आपला पुरस्कर्ता परमेश्वर आहे ह्मणून आपणास जय मिळत आहेत, असें त्याच्या मनांत उभें राहून, त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या; आणि अनन्यभावेंकरून त्यानें परमेश्वराची स्तुति केली. एवढेंच करून त्याच्यानें राहावलें नाहीं. त्यानें जुलै महिन्याच्या पंधराव्या तारखेस एक जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, आगष्ट महिन्याच्या साहाव्या तारखेस देशांमध्यें परमेश्वराचे उपकार मानण्याचा समारंभ व्हावा. त्यांत ह्मटलें आहे, "लोकहो, आपल्या राष्ट्राच्या हितार्थ परमेश्वरानें जे साक्षात्कार केले आहेत, त्यांबद्दल त्याचा यथायोग्य सन्मान करा. ज्या क्रोधानें हा एवढा कलह माजविला आहे आणि आजपर्यंत एकसारखा चालविला आहे, तो क्रोध शांत व्हावा, ह्मणून प्रार्थना करा. त्याप्रमाणेंच, बंडखोर माणसांच्या अंतःकरणांचा पालट व्हावा, आणि अशा संकटाच्या वेळीं सरकारच्या मंत्र्यांस यथायोग्य मसलती सुचाव्या, हें परमेश्वरापाशीं मागा. त्याप्रमाणेंच देशामध्यें, ह्या लढाईच्या पायीं ज्यांच्या मनांस दुःख झालें असेल, ज्यांस जखमा झाल्या असतील, किंवा ज्यांच्या मालमत्तेचा नाश झाला असेल, त्यांच्या समाचारास जा, त्यांचें सांत्वन करा, आणि त्यांस करवेल तेवढें साह्य करा. आणखी, कृतकर्माचा पश्चात्ताप करून, सर्व राष्ट्रानें शुद्धीवर येऊन, परमेश्वराच्या इच्छेस मान्य होऊन, शांतपणें कालक्रमणा करावी, असें व्हावें, असें परमेश्वरापाशीं मागा." परमेश्वराचे ठायीं पूर्ण निष्ठा असल्यावांचून असे शब्द लेखणींतून बाहेर पडावयाचे नाहींत.

अशा प्रकारें दक्षिणवाल्यांचा पराभव झाला, उत्तरवाल्यांचा जय झाला, स्वतंत्र संस्थानांतून गुलामगिरी अगदीं समूळ नाहींशी झाली, आणि त्या सगळ्या यशाचें श्रेय एब्राहाम लिंकनाचें आहे, असें सर्व लोकांनीं मोठ्या संतोषानें कबूल केलें. हाच ह्या महापुरुषाच्या उन्नतीचा कळस होय. आतां, एवढें महत्पद प्राप्त झाल्यावर तो, राज्यकारभारांत आणि घरच्या कामकाजांत कसा वागत असे, हें सांगावयाचें आहे.

---

## भाग आठवा.

## दरबारचें काम आणि घरचें वर्तन.

मोठा अधिकार प्राप्त झाला ह्मणजे, पूर्व विसरावें, आणि डोक्यानें चालायास लागावें, हा प्रकार वारंवार दृष्टीस पडतो. आणखी त्याचें आश्चर्यही वाटत नाहीं. कां कीं, अफू खाल्ली ह्मणजे तिचा अंमल येणें हें जसें साहाजिक आहे, तसेंच अधिकारारूढ झाल्यावर उन्मत्त होणें हें अगदीं साहाजिक आहे, असा लोकांचा समज झालेला आहे. कवि मोरोपंत ह्यांनीं देखील ह्मटलें आहे:—

### आर्या.

राज्यश्रीमदिरेच्या निवृत्ति कवणास हो दिली पानें
त्यजिली त्या भरतानें त्यजिली तैशीच त्या दिलीपानें.

परंतु, थोर पदवी आणि मोठा अधिकार ह्मणजे काय हें ज्यांनीं पूर्णपणें ओळखिलेलें असतें, ते अधिकारमदानें भुलत नाहींत; चांगले शुद्धींत राहतात; आणि आपलीं सगळीं कामें, यथाशास्त्र, करावीं तशीं करितात. अशीं जीं थोडीं उदाहरणें इतिहासांत आहेत, त्यांतलेंच एब्राहाम लिंकनाचें एक उदाहरण होय. त्या संबंधाच्या त्याच्या अनेक गोष्टी पुस्तकांतून सांगितल्या आहेत. त्यांतल्या थोड्याशा गोष्टी येथें सादर करितों.

मोठा अधिकार प्राप्त झाला, ह्मणजे माणसाला असें वाटूं लागतें कीं, मला कळत नाहीं असें कांहीं नाहीं. तें एब्राहाम लिंकनाच्या ठायीं नव्हतें. तो अध्यक्ष—ह्मणजे राजा झाला होता; तरी, आपली चूक कबूल करण्यास त्यास तिळभरही शंका वाटत नसे. दक्षिणवाल्यांशीं युद्ध चाललें होतें, तेव्हां, एका प्रसंगाविषयीं एब्राहाम लिंकन ह्यानें सेनापति ग्यांट ह्यांस एक पत्र लिहिलें त्याचें तात्पर्य असें:—"तुह्मी प्रथम व्हिक्सबर्ग ह्या शहराच्या जवळ आलां, तेव्हां तुह्मीं जें करावेंसें मला वाटलें होतें तेंच तुह्मीं केलें. याझू खिंडींत स्वारी केली असतां जय प्राप्त होईल, अशी माझी खातरी तर नव्हती, पण आशा होती, आणि ती गोष्ट माझ्यापेक्षां तुह्मांला अधिक कळत होती, हें मी जाणून होतों. तुह्मी खालीं उतरून आलां तेव्हां मला असें वाटलें कीं, तुह्मीं तसेंच नदीच्या वळणावळणांनीं खालीं जावें, आणि सेनापति ब्यांक्स ह्यांस जाऊन मिळावें. पण, तो मार्ग सोडून तुह्मी मागें वळलां तेव्हां मला वाटलें कीं, तुह्मीं मोठी चूक केली. पण-आतां सर्व गोष्टी मला चांगल्या समजल्या आहेत. त्यांवरून मी मोकळ्या मनानें तुह्मांशीं असें कबूल करितों कीं, ती माझीच चूक होती, आणि तुह्मीं केलेलेंच बरोबर होतें." हाताखालच्या मनुष्यापाशीं आपली चूक कबूल करणें हें खरोखर मनाच्या मोकळेपणाचें अत्युत्तम प्रमाण आहे.

एब्राहाम लिंकन हा बहुतकरून नेहमीं वाशिंग्टन शहरामध्यें, राजवाड्यांत राहात असे. त्या राजवाड्यास इंग्रजींत "व्हाइट हौस" ह्मणजे शुभ्र सदन असें नांव आहे. त्या वाड्यांत त्याचें कामकाज पुष्कळ चाले. त्याच्या संबंधाच्या पुष्कळ चमत्कारिक गोष्टी जागोजाग लिहिल्या आहेत. त्या गोष्टींमध्यें भूतदया हा त्याचा अप्रतिम गुण अत्यंत स्पष्टपणें दिसून

येतो. त्यांतही, शिपाई लोकांवर त्याचा जीव फार होता. त्यांस दुखविणें ह्मणजे त्याला मोठें संकट येऊन पडे. शिपाई ह्मणजे त्याला आपलीं स्वतःचीं मुलें वाटत. एका लष्करी अंमलदारानें एका उपदेशकास ह्याविषयीं एक चमत्कारिक गोष्ट सांगितली. ती अशीः— मला सेनापतित्व मिळाल्यावर, पहिल्या आठवड्यांत, पलटणींतून पळून गेल्याच्या अपराधावरून, लष्करी न्यायसभेनें, चोवीस असामींस, गोळ्या घालून ठार मारण्याच्या शिक्षा दिल्या. त्यांचीं वारंटें, सह्या करून घेण्याकरितां, मीं अध्यक्ष लिंकन ह्याजकडे पाठविलीं. त्यांजवर तो सह्या करीना; ह्मणून मी स्वतः जाऊन त्याला भेटलों. आणि मीं ह्मटलें, महाराज, ह्या लोकांस शिक्षा करून जर चांगली दहशत पाडली नाहीं, तर सगळ्या सैन्यांत बेबंदी होईल, असें भय आहे. थोड्या लोकांवर दया करणें हें पुष्कळ लोकांवर क्रूरपणा करणें आहे. तें ऐकून घेऊन त्यानें उत्तर केलें, 'अहो सेनापति, इकडे पाहा, आपल्या ह्या संस्थानांमध्यें कीं नाहीं, आज कितीएक विधवा अनाथ होऊन धाय मोकलून रडत बसल्या आहेत; त्या विधवांच्या जोडीला आणखी विधवा बसविण्यास मला आग्रह करूं नका. तें मी कधीं ऐकणार नाहीं."

पाहाऱ्यावर असतां झोंपीं गेल्याबद्दल एका शिपायाला, गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा ठरली होती. तिजबद्दलचें वारंट सहीस एब्राहाम लिंकनाकडे गेलें, तेव्हां त्या खटल्याचे सगळे कागदपत्र पाहून, त्यानें त्यास क्षमा करण्याचा ठराव त्या वारंटावर लिहिला, आणि त्या संबंधानें जवळच्या एका गृहस्थास ह्मटलें, "अशा गरीब मनुष्याचा जीव घेतल्यावर मला स्वर्गलोकीं जागा कशी मिळेल? अहो, शेतकऱ्याचा मुलगा, शेतांत लहानाचा मोठा झालेला, लवकर निजावयाची

त्याला संवय. त्याला पाहाऱ्यावर असतां डुकली आली, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ह्या अपराधाबद्दल त्याला गोळी घालून मारण्यास मी मंजुरी कधींही देणार नाहीं."

दुसरे एके वेळीं एक वृद्ध बाई, इतर लोकांबरोबर, अध्यक्ष लिंकनाच्या दर्शनार्थ राजवाड्यांत आली. तिचें बोलणें ऐकून घेण्याची पाळी आली. तेव्हां फार लवून सलाम करून, ती त्यास हात जोडून ह्मणाली, "महाराज, काय सांगावें ? आपणापाशीं माझ्यानें बोलवत नाहीं, आजपर्यंत अध्यक्षांपाशीं मी कधींही बोलल्यें नाहीं. पण आज बोलणें भाग आलें आहे. मी मेरील्यांडची राहाणारी आहें. माझा मुलगा सरकारच्या पलटणींत शिपाई आहे, तो जखमी होऊन दवाखान्यांत पडला आहे. त्याला घरीं नेऊन औषधपाणी करावें असें मनांत आणून, तो माझ्या हातीं मिळावा ह्मणून मीं पुष्कळ इलाज करून पाहिले, पण ते सगळे फुकट गेले. तो मुलगा मला मिळत नाहीं. आणखी मला कोणीं असें सांगितलें कीं तें आपल्या हातीं आहे, ह्मणून आपले पायांशीं आल्यें आहें. लढाईला आरंभ झाला तेव्हां, देवाचें नांव घेऊन, मीं आपल्या मुलाला सांगितलें कीं, जा, लढाई कर, आणि बंडवाल्यांचा पराभव कर. त्याप्रमाणें तो गेला; पण आतां आजारी होऊन पडला आहे. तो जर कांहीं दिवस आपण माझ्या स्वाधीन कराल, तर, मी त्याला औषधपाणी करून, खाऊंपिऊं घालून बरा करीन, आणि, पुनः बंड मोडण्याच्या कामास परत पाठवीन. तो मुलगा चांगला आहे; आणि तो सरकारच्या चाकरीस कधीं ना ह्मणावयाचा नाहीं; महाराज, आपण कृपा करून त्याला माझे स्वाधीन करावें." हें ऐकत असतां, लिंकन ह्याचे ओंठ, थरथर कांपत होते, आणि डोळ्यांत अश्रु आले होते. त्या बाईचें बोलणें संपतांच, तो

तिला, फार दयार्द्रमुद्रेनें ह्मणाला, "बाई, तुह्मी घाबरूं नका. देव तुमचें काम करील. तुमचा मुलगा तुह्मांला खचीत मिळेल." आणि त्यानें लागलाच एक कागद घेऊन, त्या मुलास तिच्या हवालीं करण्याविषयीं हुकूम लिहिला.

केलागसाहेब ह्मणून एक गृहस्थ सेनेटाचा सभासद होता. तो वाशिंग्टन येथें राहात असे. त्याला एके दिवशीं, रात्रीं अशी तार आली कीं, तुमच्या आग्रहावरून तुमच्या गांवच्या ज्या मनुष्यानें लष्करांत चाकरी धरिली होती, त्या मनुष्यावर कांहीं क्षुल्लक आरोप येऊन, त्यास गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा ठरली आहे, तर, ह्या वेळेस कसेंही करून त्याला सोडवा. त्या बरोबर तो घाबरून युद्धसंबंधाच्या चिटनिसाकडे गेला, आणि शिक्षा तूर्त कांहीं दिवस अमलांत येऊं नये असें करण्याविषयीं त्यास आग्रह करूं लागला. त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, "आलीकडे असे फार लोक सुटले हें कांहीं चांगलें नाहीं, आतां ही शिक्षा झालीच पाहिजे, नाहीं तर दरारा नाहींसा होईल." तें केलाग ह्यास आवडलें नाहीं. आणि तो त्यास लागलेंच खोंचून ह्मणाला, " चिटणीससाहेब, आपण एवढा डौल करूं नका. त्या मुलाला मी मरूं देत नाहीं, हें तुह्मी खचीत समजा." हें बोलणें झालें तेव्हां जरी मध्यरात्रीचा सुमार झाला होता, तरी, तो गृहस्थ लागलाच अध्यक्ष एब्राहाम लिंकन ह्याच्या वाड्यांत गेला. तेव्हां त्याला नुकतीच झोंप लागली होती. तरी, केलाग ह्यानें त्याला जागें करून, त्या मुलाची सगळी हकीकत सांगितली, ती अशा रीतीनें कीं, ती ऐकून, अध्यक्षाचें मन कळवळलें, असें स्पष्ट दिसून आलें. त्यास केलाग ह्मणाला, "महाराज, त्या तरुण माणसाचा जीव जातां कामास नये. तो माझा शेजारी आहे; त्याचा बचाव झालाच

पाहिजे." तें ऐकून लिंकन ह्मणाला, "होय; त्याला गोळी घालून मारल्यानें त्याचें कांहींएक बरें व्हावयाचें नाहीं. मग कशाला मारा?" असें बोलून, त्या तरुण मनुष्यास क्षमा केल्याचा हुकूम त्यानें लागलाच लिहून दिला.

अशाच प्रकारची भीड एकदां एका मोठ्या कामदारानें एब्राहाम लिंकनास घातली. त्या वेळीं तो, कामाकाजांनीं अगदीं थकून जाऊन, जरा विश्रांति घ्यावयाच्या विचारतां होता. तरी, तो त्याला ह्मणाला, "काय करावें? मी अशा शिक्षा कमी करितों आणि अपराध्यांस क्षमा करितों, येणेंकरून, लष्करी लोकांवर दाब राहात नाहीं, आणि टापटीप विघडते, असा बोभाट कांहीं अमलदारांनीं केला आहे. परंतु, अशा प्रकारच्या शिक्षा ठरलेल्या मनुष्यास, योग्य कारण पाहून, जीवदान द्यावें, त्यानें आनंदित व्हावें, त्याच्या कुटुंबाच्या माणसांनीं मला दुवा द्यावा, आणि सर्वांस आनंद व्हावा, असें कांहीं कृत्य करून मी निजावयास गेलों, ह्मणजे मला मोठें समाधान वाटतें, आणि फार सुख होतें. ह्मणून मी असें करितों." ह्यावरून, दुसऱ्याच्या आनंदानें एब्राहाम लिंकनास किती आनंद होत असे तें स्पष्ट दिसून येतें.

एके दिवशीं एक वृद्ध विधवा राजवाड्यांत येऊन एब्राहाम लिंकनापुढें हात जोडून उभी राहिली, आणि दीनमुद्रेनें ह्मणाली, "महाराज, माझा नवरा आणि माझे तिघे मुलगे असे चौघेजण आपल्या लष्करांत चाकरी धरून गेले होते. त्यांतला माझा नवरा लढाईंत जखम लागून मरण पावला; आणि आतां मला कोणाचा आधार राहिला नाहीं. ह्याकरितां, कृपा करून माझा वडील मुलगा मला परत द्यावा. तो माझेजवळ असावा, ह्मणजे मला ह्यातारीला मोठा आधार होईल." हें ऐकून एब्रा-

हाम लिंकनाचें अंतःकरण कळवळलें. आणि तो म्हणाला, "बाई तुमचें म्हणणें अगदीं रास्त आहे. तुमचा मुलगा तुमच्या स्वाधीन करण्याविषयीं मी तुमचेजवळच हुकूम देतों. हा घेऊन तुम्हीच लष्कराच्या छावणींत सेनापतीकडे जा म्हणजे झालें.' याप्रमाणें ती बाई तो हुकूम घेऊन तेथें जात आहे तोंच तिला असें वर्तमान कळलें कीं, तो थोरला मुलगा लढाईत जखम लागून मरण पावला. मग तिच्या दुःखास पार राहिला नाहीं. ती तशीच मोठा आक्रोश करीत पुनः एब्राहाम लिंकनाकडे आली, तेव्हां त्यास विलक्षण आश्चर्य वाटलें; आणि तिचे तोंडची हकीकत ऐकून तर त्याच्या काळजाचें अगदीं पाणी होऊन गेलें. तो डोळ्यांत पाणी आणून ह्मणाला, "काय करावें बाई, उपाय नाहीं. आतां तुह्मी मला काय करावयास सांगणार तें मी, तुह्मी सांगण्याच्या आधींच समजलों आहें. तुमचा दुसरा मुलगा तुमचे स्वाधीन करण्याविषयीं मी हुकूम देतों. ह्मणजे, बरोबर वांटणी झाली; तुमचेकडे एक आणि आमचेकडे एक." त्याप्रमाणें त्यानें हुकूम दिला. तेव्हां, ती बाई, त्याच्या मस्तकावर हात ठेऊन ह्मणाली, "बाबा लिंकना, देव तुझें कल्याण करो. बाबा, तूं हजार वर्षें वांच, आणि आमच्या संस्थानांचा अध्यक्ष नेहमीं तूंच हो." ह्या गोष्टीवरून एब्राहास लिंकनाची भूतदया तर प्रगट होतेच. पण आणखी दुसरें असें दिसतें कीं, त्या युद्धप्रसंगीं, घरांतली सगळी पुरुषमंडळी सैन्यास जाऊन मिळत असे.

एक तरुण शिपायी पाहाऱ्यावर असतां झोंपीं गेला, ह्मणून त्याला जिवें मारण्याची शिक्षा ठरली. तिचें वारंट एब्राहाम लिंकनाच्या सहीस आलें, तेव्हां त्यानें सगळे कागदपत्र मागवून, तो खटला पुनः तपासला. त्यावरून त्याला असें समजलें कीं,

तो शिपाई आदले रात्रीं आपलें काम करून मोकळा झाल्यावर, त्याचा एक सोबती दुसरा शिपाई आजारी पडल्यामुळें त्याही रात्रीं त्याला पाहाऱ्यावर जावें लागलें; आणि, आदले रात्रींचें जागरण झालेलें असल्यामुळें त्याला झोंप आली होती; तेथें त्याचा निरुपाय होता. ही हकीकत पाहून, त्यानें त्या शिपायास दोषमुक्त करून सोडून देण्याचा हुकूम रवाना केला. परंतु, तो हुकूम वेळेस पोंचेल कीं नाहीं, आणि न पोंचला तर भलतेंच कांहीं होईल कीं काय, अशा संशयावरून, तो स्वतः आपल्या गाडींत बसून, दाहा कोस गेला, आणि त्या संबंधाची सगळी व्यवस्था त्यानें बरोबर लाविली. ह्या गोष्टीचें इतर सगळ्या लोकांस मोठें नवल वाटलें; परंतु त्याला स्वतःला तिचें कांहींच वाटलें नाहीं.

एके वेळीं एक म्हातारी परटीण एब्राहाम लिंकनास भेटायास आली. तिची भेट बरीच वेळ झाली नाहीं; आणि इतक्यांत तो, बाहेर फिरावयास निघाला. त्यास वाटेंत गांठून, पदर पसरून ती ह्मणाली, "माझा मुलगा कोठें सरकारच्या पलटणींत चाकरीस राहिला आहे ह्मणतात, त्याचा शोध मला लागत नाहीं. तेवढा माझा मला परत मिळेल असें कराल तर मोठे उपकार होतील." तें ऐकून घेऊन, तेथच्या तेथें खिशांतून कागद काढून, त्याजवर, त्या मुलास शोधून काढून तिचे स्वाधीन करण्याविषयीं सेनापतीस हुकूम दिला. तेव्हां त्या आईला केवढा आनंद झाला असेल बरें!

दुःखभागी प्राण्यास सोडून देण्यास थोडें कारण देखील एब्राहाम लिंकनास पुरत असे. एके वेळीं, कोणीएक शिपाई, लढाईंत उत्तम प्रकारें लढून, तेथें जखमी होऊन कांहीं कारणावरून, पलटणींतून पळून गेला, आणि त्यास गोळी घालून ठार

मारण्याची शिक्षा ठरली. तें प्रकरण, त्या शिपायाच्या आसांनीं, क्षमेकरितां, एब्राहाम लिंकनाकडे नेलें. तें त्यानें लक्षपूर्वक पाहिलें; परंतु, प्रथमतः, त्यास क्षमा करण्यास कोठें कारण सांपडेना. तेव्हां, त्याला अकस्मात् ख्रिस्तीधर्मशास्त्रांतल्या एका वाक्याची आठवण झाली. त्याचें तात्पर्य असें आहे कीं, रक्तपात हें पापविमोचन आहे. आणखी त्यानें जवळच्या लोकांस विचारिलें कीं, "त्याला, लढाईमध्यें फार जखमा झाल्या होत्या ना?" त्यास होय असें उत्तर आल्यावर तो ह्मणाला, "ठीक आहे तर मग; शास्त्राज्ञेप्रमाणें ह्यास दोषमुक्त करण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्मणून ह्यास सोडून द्यावें, असा ठराव करितों."

एब्राहाम लिंकन हा एवढा मोठा भूतदयाशील होता खरा, तरी, तो मोठा न्यायी असे; आणि गुलामगिरीचा व गुलामांच्या व्यापाराचा त्याला अतिशयित तिटकारा असे. कोणीएक मनुष्य गुलामांचा व्यापार करण्याविषयीं प्रख्यात होता. त्याला त्या अपराधावरून, कैदेची शिक्षा होऊन शिवाय त्यानें एक हजार डालर दंड द्यावा, असें ठरलें होतें. त्याची कैदेची मुदत सरल्यावर, दंड तेवढा माफ होण्याविषयीं त्यानें एब्राहाम लिंकनास अर्ज केला; त्यांत त्यानें आपला अपराध कबूल केला होता, आणि आपली गरीबी दाखवून, दंड माफ करण्याविषयीं प्रार्थना केली होती, पण तिनें एब्राहाम लिंकनाच्या अंतःकरणास द्रव आला नाहीं. तो ह्या प्रसंगीं असें ह्मणाला ह्मणून सांगतात कीं, "करुणा भाकिली ह्मणजे कोणावरही दया करण्याविषयीं माझी प्रवृत्ति व्हावी, हा माझ्या वृत्तींत एक दोष आहे; आणखी ह्मणूनच मोठमोठ्या खुनी मनुष्यांस देखील मी त्यांच्या अपराधांची क्षमा करितों. परंतु, मोठा प्रयत्न करून आफ्रि-

केंत जावें, तेथल्या माणसांस धरून आणून जन्मभर बंदींत राहण्याकरितां, गुलाम ह्मणून विकावें. आणखी हा एवढा खटाटोप कशाकरितां, तर, पिशवी भरण्याकरितां; अशा मनुष्यास, मोठ्या खुनी माणसापेक्षां देखील मी महदपराधी समजतों; आणि त्याला क्षमा अशी मी कधीं करणार नाहीं. अशा माणसाचा शेवट कारागृहांत व्हावा, हेंच योग्य आहे."

एब्राहाम लिंकन हा, न्यायाच्या कामांत कधीं कधीं अगदीं सख्त असे. कोणा एका माणसास लष्करांतून फांटा दिला होता. त्यानें आपली लांबच लांब हकीकत एके वेळीं एब्राहाम लिंकनास वाचून दाखवून, पुनः चाकरीवर घेण्याचा ठराव करण्याविषयीं विनंती केली. त्या हकीकतीवरून त्यास एब्राहाम लिंकन ह्मणाला, "तुमची सगळी हकीकत खरी मानिली, आणि प्रतिपक्षाचा वाद ऐकिला नाहीं, तरी देखील तेवढ्यावरूनच मला असें वाटतें कीं, तुह्मांला जी शिक्षा झाली आहे ती यथायोग्य आहे; तींत कमजास्त करण्यास मला कांहीं प्रयोजन दिसत नाहीं." असें स्पष्ट पहिल्यानेंच सांगितलें असतां तो गृहस्थ वारंवार तीच हकीकत ऐकवून एब्राहाम लिंकनास त्रास देऊं लागला, आणि शेवटीं त्याला ह्मणाला कीं, "एकून माझा न्याय करावयाचा नाहीं, असा आपला संकल्पच झाला आहे तर मग!" हें ऐकून, एब्राहाम लिंकनाचें डोकें फिरलें; आणि त्यासरसें त्यानें त्या मनुष्याला, हातांत धरून, खोलीच्या बाहेर लावून दिलें, आणि ओरडून सांगितलें कीं, "पुनः आमचे येथें तुह्मीं कधीं येऊं नये. आह्मीं तुह्मांला भेटणार नाहीं."

आपल्या देशामध्यें लढाई चालली आहे, प्रजाजनांस त्रास होत आहे, आणि शेंकडों शिपाई लोक प्राणांस मुकत आहेत, हें पाहून एब्राहाम लिंकनाचा जीव तिळतीळ तुटत असे. आणि

त्याला अहोरात्र चैन पडत नसे. एके दिवशीं एक चांगली संभावित बाई, त्याच्याकडे येऊन त्याला ह्मणाली कीं, "आपण कृपा करून आमच्या प्रांतांत जर दवाखाना घालण्याचा ठराव कराल, तर, आपलें सगळें आयुष्य आनंदांत जाईल." तें ऐकून एब्राहाम लिंकन, निश्चयानें, नाहीं ह्मटल्यासारखें डोकें हालवून खिन्न मुद्रेनें ह्मणाला, "नाहीं बाई; आतां ह्यापुढें माझे दिवस आनंदांत कधींही जावयाचे नाहींत बरें!" आणि सरतेशेवटीं तेंच खरें झालें. कोणी एक गृहस्थ एब्राहामाचा जुना मित्र होता. त्याचें जाणेंयेणें त्याच्या येथें फार असे. त्यानें एब्राहाम लिंकनाच्या प्रकृतीविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "एब्राहाम लिंकन हा स्प्रिंगफील्ड येथून निघाला, तेव्हां त्याचें शरीर केवळ दगडासारखें होतें. तो जणुं काय वज्रदेही दिसे. त्याला दुखणें कसें तें ठाऊक देखील नव्हतें. त्याच्या मुखचर्येवर नेहमीं आनंद आणि उल्हास हे दिसत असत. पण आतां, काळजीनें, दुःखानें आणि त्रासानें, तें सगळें नाहींसें झालें आहे; त्याच्या आंगचें सगळें तेज गेलें आहे; त्याच्या गालांना आणि कपाळाला सुरकुत्या पडल्या आहेत." एब्राहाम लिंकनाचें अंतःकरण आणि अध्यक्ष झाल्या दिवसापासून त्याच्यावर आलेलीं संकटें आणि अडचणी ह्यांचा विचार केला ह्मणजे त्याची अवस्था तशी व्हावी, हें अगदीं साहाजिक दिसतें. काळजीसारखा भयंकर रोग दुसरा नाहीं. आणि, एब्राहाम लिंकनाच्या मागें जी काळजी लागली होती, ती, एका कुटुंबाविषयीं नव्हती, एका गांवाविषयीं नव्हती, एका प्रांताविषयीं नव्हती कीं एका संस्थानाविषयीं नव्हती; तर, ती काळजी अनेक संस्थानांविषयीं होती. आणखी, जी लढाई चालली होती, ती, एब्राहाम लिंकनाच्या आग्रहामुळें किंवा एककल्लीपणामुळें चालली आहे, असें त्याच्या

प्रतिपक्ष्यांनीं चोर्हीकडे पिकविलें होतें. त्यामुळें त्याचें चित्त फारच उदास झालें होतें.

एब्राहाम लिंकन ह्यास मुलें फार आवडत असत. कोणाचेंही मूल दृष्टीस पडो, त्याजविषयीं त्याच्या ठायीं प्रेम उत्पन्न होई. एका बाईच्या नवऱ्यास मृत्यूची शिक्षा ठरली होती. ती त्यास माफ व्हावी, ह्मणून अध्यक्षास प्रार्थना करण्यास ती त्याच्या वाड्यांत आपल्या लहान मुलास घेऊन गेली. आधीं कांहीं वेळ तिचा प्रवेश आंत होईना. परंतु, एब्राहाम लिंकन आपल्या खोलींतून बाहेर पडत होता इतक्यांत तिनें त्वरा करून, पुढें सरून, आपली हकीकत त्याला कळविली, आणि मागणें मागितलें. तेव्हां तिच्या नवऱ्यास त्यानें ती शिक्षा माफ केली. तो हुकूम तिच्या कानीं पडल्यावर तिला अत्यानंद झाला, आणि तिनें डोळे आकाशाकडे करून परमेश्वराची प्रार्थना केली. इतक्यांत तिला तेथें अध्यक्षाचा एक नौकर दानियल ह्मणून होता, त्यानें सांगितलें कीं, "बाई, आज तुमचें काम ह्या तुमच्या लहान मुलानें केलें बरें! हा तुमचा वकील!" ह्याचा आशय असा होता कीं, त्या मुलाकडे पाहून एब्राहाम लिंकनाचें मन कळवळलें; आणि त्यावरून त्यानें त्या मनुष्यास ती शिक्षा माफ केली.

मनुष्य कोणत्याही प्रतीचा असो, त्यास संतुष्ट करण्याविषयीं एब्राहाम लिंकन हा फार जपत असे. तो वाड्यांतून बाहेर पडे आणि वाड्यांत जाई तेव्हां दरवाजावरचा पाहारेकरी त्यास रीतीप्रमाणें सलामी देत असे. तितके वेळां, टोपीला हात लावून, आणि खालीं मान वांकवून, ती तो मोठ्या आदरानें घेत असे. कधीं हयगय करीत नसे.

परदुःख पाहून एब्राहाम लिंकन ह्याचें अंतःकरण फार कळवळत असे. तें इतकें कीं, त्या कळवळ्यांत त्याला त्याच्या

स्वतःच्या योग्यतेची देखील आठवण राहात नसे. एका गृह स्थानें त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, " एब्राहाम लिंकन हा धै र्यानें आणि शक्तीनें केवळ सिंह होता; परंतु, दयालुत्वाच्य संबंधानें, शुद्ध एकाद्या बायकोसारखा होता. एके दिवशीं क डक उन्हाच्या वेळीं, त्याला, एके ठिकाणीं, गवतांत एका झा डाखालीं बसलेला मीं पाहिला. तो तेथें, एका झाताऱ्या लं गड्या शिपायाचे कागदपत्र पाहात बसला होता, आणि त्याच मागचा पगार राहिला होता तो त्याला मिळावा, असा हुकूम लिहीत होता. " इतका साधेपणा एवढ्या पदवीच्या मनुष्यांत सहसा सांपडावयाचा नाहीं.

त्याप्रमाणेंच एके ठिकाणीं त्याच्या आदरातिथ्याचा मोठाच समारंभ चालला होता. त्यास हजारों मोठे लोक आले होते. त्या गर्दींत, एक जखमी झालेला शिपाई आणि त्याची विधवा मातुश्री हीं उभीं होतीं; आणि त्यांची इच्छा फार होती कीं, अध्यक्षानें आपणांजवळ बोलावें. तें त्यांच्या चर्येवरून जाणून, तो, मोठ्या लोकांच्या मंडळींतून निघून त्यांच्याजवळ गेला, आणि, त्यांच्याशीं थोडेंसें बोलून त्यानें त्यांचें समाधान केलें. ह्याविषयीं कोणीएक चांगला ग्रंथकार असें ह्मणतो कीं, "राष्ट्रामध्यें खरोखर मोठेपणा येण्यास आणि त्याची योग्यता वाढण्यास त्यांत अशीं माणसें उत्पन्न झालीं पाहिजेत." ही गोष्ट खरी आहे.

एकाद्याच्या मनांत असें येईल कीं, एब्राहाम लिंकन हा एवढा मोठा अधिकारी—किंबहुना राजा—असतां, पाहिजे तेव्हां तो गरीबगुरीबांस भेटे हें कसें. ह्याचें उत्तर एवढेंच कीं, ह्याविषयीं त्याचा स्वतःचा ग्रह तसा होता. एके प्रसंगीं ह्याविषयीं बोलत असतां, तो ह्मणाला, "मला कामें पुष्कळ अ-

सतात, आणि वेळ नसतो, तरी, गरीव साधारण प्रतीच्या मनुप्यांच्या मंडळींत माझा जो वेळ जातो, तो फार चांगल्या कामीं लागतो, त्याचा सद्व्यय होतो, असें मला वाटतें. माणसांना सरकारी कामें मिळालीं ह्मणजे, तीं तितक्यापुरतीं लोकांत जातात, आणि, कामाशीं काम ठेवतात. आणखी मागें पुढें पाहात नाहींत. हें वरें नाहीं. मी अशा साधारण लोकांच्या मंडळींत आठवड्यांतून दोनदां जातों, आणि त्यांचीं वोलणीं ऐकून घेतों, त्यांत कांहीं वावी अगदीं क्षुल्लक असतात, हें खरें आहे. परंतु, त्यांतल्यात्यांत कितीएक महत्वाच्या गोष्टी मला कळतात. आणि, ज्या प्रकारच्या लोकांतून निघून मी ह्या पदास आलों आहें, आणि ज्या प्रकारच्या लोकांत मला पुनः परत जावयाचें आहे, त्या लोकांचें मला चांगलें स्मरण राहातें. हा मोठा लाभ आहे." पूर्व स्मरून वागणें हें थोरपणाचें एक मोठें लक्षण आहे.

एब्राहाम लिंकन हा मोठा कोटीवाज मनुष्य होता. त्याच्या वोलण्यांत कोट्या फार असत, आणि तो, आपल्या मनांतला आशय, दृष्टांतांनीं दुसऱ्यांस फार चांगल्या रीतीनें समजावून देत असे. त्यामुळें त्याचें वोलणें गोड लागून, त्याचा ठसा ऐकणाऱ्याच्या मनांवर चांगला वठत असे. कोणे एके वेळीं कांहीं चांगली ठळक मंडळी, राज्यव्यवस्थेंतलीं व्यंगें अध्यक्षास कळविण्याकरितां, त्याच्या दरवारांत गेली. तिचें सगळें वोलणें त्यानें शांतपणें ऐकून घेऊन, आणि जितकें करतां येत आहे तितकें मी करीत आहें, असें त्यांस कळवायाचें मनांत आणून, तो त्यांस ह्मणाला, "गृहस्थहो, पहा, अशी कल्पना करा कीं, तुह्मी आपल्या सगळ्या द्रव्याचा ठेवा एका माणसाच्या स्वाधीन करून, त्याला एका मोठ्या सरोवराच्या पार, दोरीवरून जाण्यास

लाविलें आहे; आणि तो चालला आहे. तर, अशा वेळीं, अरे हळू, अरे हळू, अरे पडशील, उजवीकडे जोर दे, डावीकडे जरा सरक, असें वारंवार ओरडून, दोरी हालवून त्याला घाबरावें हें बरें, किंवा, तो दांतांशीं दांत लावून मोठ्या तजविजीनें, दम धरून, हळू हळू चालला आहे, तसेंच त्याला जाऊं द्यावें हें बरें? सरकाराच्या डोक्यावर ओझें फार मोठें आहे. तें ते हळू हळू घेऊन चालले आहेत. त्यांना उगाच गोंधळवूं नका. तुह्मी स्वस्थ असा. ह्मणजे सगळें कार्य यथास्थित होईल." ह्मणजे, राज्यव्यवस्था आमच्यानें चांगली ठेववेल तेवढी चांगली ठेवीत आहों; आह्मांला मध्यें उगाच त्रासवूं नका, असें त्याच्या बोलण्याचें तात्पर्य.

कोरड्या फुशारकीचा आणि असत्य भाषणाचा एब्राहाम लिंकनास फार तिरस्कार असे. कोणी एके वेळीं एक गृहस्थ त्यास भेटावयास आला, आणि एक मोठी जागा रिकामी होती ती मागूं लागला; आणखी त्याला असें सांगूं लागला कीं, तुह्मांला ही जी अध्यक्षाची गादी प्राप्त झाली आहे, तीस कारण माझे परिश्रम मुख्य आहेत. तें बोलणें एब्राहाम लिंकनास आवडलें नाहीं. तो त्याला ह्मणाला, "असें काय? तर मग, ही सुळावरची पोळी ज्यांनीं मला दिली आहे, त्यांत आपण मुख्य आहां! तर मग तुह्मांला द्यावयास मजपाशीं जागा नाहीं. आतां या; सलाम." तरी, पहा. त्या बोलण्याचा त्याला जितका राग आला होता, तितका त्यानें बाहेर दाखविला नाहीं. नेमस्त भाषण केलें.

राजवाड्यामध्यें लोकांशीं एब्राहाम लिंकन हा कोणत्या रीतीनें वागत असे, हें, ह्या गोष्टींवरून बरेंच लक्षांत येण्यासारखें आहे. लोकांनीं आपणाप्रमाणें सदाचारी व्हावें, अशी त्याला

फार इच्छा असे. आणि त्याविषयीं तो त्यांस वारंवार उपदेशही करीत असे. तो आपल्या मुलांस वारंवार उपदेश करी कीं, "बाबांनो, दारू पिऊं नका, गांजा तमाखू ओढूं नका, शपथ वाहूं नका, जुवा खेळूं नका, खोटें बोलूं नका, आणि कधीं कोणाला फसवूं नका. देवाची भक्ति करा, सर्व माणसांवर प्रेम करा, सत्याची कांस धरा, सदाचरणानें वागून सद्गुण धरा, ह्मणजे तुह्मी सुखी व्हाल." ह्यांत सांगायाचें काय राहिलें? एवढ्या उपदेशाप्रमाणें मनुष्य चालेल, तर तो सुखी होऊन देवासारखा मान पावेल, ह्यांत काडीभरही संशय नाहीं.

---

## भाग नववा.

## शेवटचीं कृत्यें आणि निजधामगमन.

असें होतां होतां इ० स० १८६४ हें वर्ष उजाडलें. तरी लढाई चाललीच होती; आणि आपला हट्ट खरा करण्याविषयीं दक्षिणवाले, दांतओंठ खाऊन प्रयत्न करीत होते. एब्राहाम लिंकनाला असें दिसून आलें कीं, ज्या लोकांची लष्करी चाकरीची मुदत भरली आहे, त्यांस मोकळें करून त्यांच्या जागा भरण्यास आणि, सैन्यास विशेष बळ येण्यास आणखी पांच लक्ष नवे लोक ठेविले पाहिजेत. त्याप्रमाणें त्यानें कानग्रेसापाशीं मागणें करून, तितके लोक मिळवून, सगळ्या सैन्यावर सेनापति ग्र्यांट ह्यास नेमिलें; आणि लढाईचें काम मोठ्या आवेशानें चालविलें. उभय पक्षांच्या पुष्कळ झटापटी झाल्या. त्यांत दक्षिणवाल्यांचेंच पाऊल मागें मागें पडत गेलें. त्यांतही, व्हर्जीनिया संस्थानामध्यें रिचमंड आणि पीटर्सबर्ग हीं शहरें परत घेतेवेळीं तर उत्तरवाल्यांनीं त्यांस अगदीं जेरीस आणिलें. तरी पुढच्या वर्षापर्यंत दक्षिणवाले तसाच दम धरून राहिले होते. परंतु,

अगदीं उपाय हरले असें झालें तेव्हां, त्यांचा मोठा सेनापति रावर्ट ली हा, व्हर्जीनियाप्रांतांत, आफेमाटाक्स कोर्टहौस येथें, गाय होऊन, दांतीं तृण धरून, अठ्ठावीस हजार सैन्यासहवर्तमान, उत्तरवाल्यांस शरण येऊन त्यांच्या हातीं लागला. ही गोष्ट इ० स० १८६५ च्या एप्रिल महिन्याच्या नवव्या तारखेस घडली. तेव्हांच, दक्षिणवाल्यांची सगळी हिंमत खचली; आणि ते उत्तरवाल्यांच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास तयार झाले. तरी, कोठें कोठें लहानमोठ्या झटापटी चालल्याच होत्या. पण त्यांपासून पुढें कांहीं झालें नाहीं. ह्मणून येथेंच ही लढाई संपली असें ह्मणावयाचें.

दक्षिणवाल्यांच्या हातून रिचमंड घेतल्यानंतर, दुसरे दिवशीं, आपल्या लष्कराची व्यवस्था पाहाण्याकरितां, एब्राहाम लिंकन हा त्या शहरांत गेला. तो कांहीं मोठ्या डामडौलानें गेला नाहीं. तर अगदीं एकाद्या साधारण माणसाप्रमाणें गेला. तेव्हां त्याच्या बरोबर त्याचा धाकटा मुलगा आणि कांहीं कामदार लोक व खलाशी लोक मात्र होते. त्या वेळेस ज्या गोष्टी तेथें त्याच्या दृष्टीस पडल्या, त्यांवरून त्याला नुसता आनंद झाला एवढेंच नव्हे; तर, ह्या लढाईचा शेवट असा चांगला झाल्याचे परिणाम किती उत्तम झाले आहेत, हेंही त्याला उत्तम प्रकारें दिसून आलें. तें असें. तो त्या शहरांत आल्याची खबर लोकांत पसरतांच, तेथें जे शिद्दी लोक दास्यमुक्त होऊन स्वतंत्र झाले होते, ते सगळे जमून, त्याच्या दर्शनास आले. त्या वेळेस त्याच्या भोंवतीं इतकी गर्दी झाली कीं, तेथें कोणास पाय ठेवण्यास जागा मिळेना. ज्याच्या त्याच्या तोंडीं लिंकन, लिंकन, लिंकन असा शब्द गाजत होता, आणि त्याचा सन्मान करण्यास सर्व लोक एकमेकांवर जसे उड्या घेत होते. एक ह्मा-

तारी शिद्धीणबाई आपल्या घराच्या दारांत उभी राहून ती मौज पाहात होती. तिच्या दृष्टीस लिंकन पडला. तेव्हां ती, नेत्रांत प्रेमाश्रु आणून ह्मणाली, "प्रभु येशू ख्रिस्ता, तूं अत्यंत धन्य आहेस! आज तूं मला लिंकनाचे पाय दाखविलेस हा मजवर मोठा प्रसाद झाला आहे." असे नानाप्रकारचे उद्गार सगळ्यांच्या तोंडांतून निघत होते; आणि त्याला सलाम करण्यांत सगळा समाज अगदीं मग्न होऊन गेला होता; तेव्हां, लिंकन हा, आपली टोपी हातांत घेऊन, आणि क्षणोक्षणीं मान खालीं करून, अत्यंत नम्रतेनें आणि मोठ्या प्रीतीनें, ते सलाम मोठ्या एकाद्या अमोलिक देणगीप्रमाणें घेत होता. त्यांत एक गोष्ट फार लक्षांत ठेवण्यासारखी होती. ती ही कीं, हा गोरा, हा तांवड्या वर्णाचा अमेरिकन आणि हा काळा शिद्धी, हा भेद एब्राहाम लिंकनाच्या मनांत तिळमात्रही नव्हता, हें त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतें. ही गोष्ट सांगत असतां, एक उत्तम ग्रंथकार असें ह्मणतो कीं, "अशा आचरणानें त्यानें तेथल्या जातिभेदाच्या बंडाला चांगलाच धक्का दिला." हें केवळ त्यानें रिचमंड येथें त्या दिवशींच केलें असें नाहीं. इ. स. १८६४ च्या पाडव्याच्या दिवशीं, नित्याच्या परिपाठाप्रमाणें सगळी लहानथोर मंडळी एब्राहाम लिंकनाच्या दर्शनास आली, तेव्हांचें वर्णन एका चांगल्या ग्रंथकारानें असें केलें आहे कीं, "गोरे लोकांस सलाम करतां करतां दोन तासांत अध्यक्ष अगदीं थकून गेला होता; तरी, काळी शिद्धी मंडळी दृष्टीस पडल्याबरोबर, त्यांचा तितका मान करण्याविषयीं जणुं काय त्याला नवी उमेद आली; आणि त्यांचें आदरातिथ्य त्यानें अगदीं गोरे लोकांच्या बरोबरीनें केलें. तेव्हां, त्या शिद्धी लोकांस जो आल्हाद झाला होता, त्याचें वर्णन कोणालाही करितां यावयाचें नाहीं. एब्राहाम लिं-

कनाचें निष्कपट प्रेम आणि नम्रता पाहून, नेत्रांतून आनंदाश्रु गळावे, आणि आपण कृतकृत्य झालों असें वाटून प्रत्यक्ष समाधान त्यांच्या मुखचर्येवर, हास्यावरून स्पष्ट व्हावें, असा क्रम चालला होता." ही गोष्ट ह्या चरित्रांत अत्यंत वर्णनीय होय. शिद्दी लोकांस, अगदीं हलके समजून, नीच प्राण्याप्रमाणें वागवावयाचें, त्यांच्या लोटांगणांकडे देखील लक्ष द्यावयाचें नाहीं, असा परिपाठ कितीएक तपेंपर्यंत, एकसारखा चालत आला होता, तो, एब्राहाम लिंकनानें एकदम मोडून टाकिला, आणि सगळीं माणसें हीं एका देवाचीं मुलें—भावंडें—आहेत, त्यांच्यामध्यें भेद नाहीं, असें त्यानें आपल्या आचरणानें केवळ दाखविलें नाहीं, तर लोकांत स्थापित केलें. ही गोष्ट खरोखर त्याच्या मोठेपणास अत्यंत भूषणप्रद होय. आलीकडे, पाश्चिमात्य विद्येच्या संस्कारानें ह्मणा किंवा दुसऱ्या कोणत्या कारणानें ह्मणा—जातिभेद नाहीं—सर्व माणसें एकाच हाडामासाचीं केलेलीं आहेत—असें बोलणारे कितीएक लोक निघाले आहेत. परंतु, तसे वागणारे फार थोडे, किंबहुना शेंकडा एक दोन देखील नाहींत. ह्मणून त्यांच्या बोलण्यास यश नाहीं. "बोले तैसा चाले" असें झालें पाहिजे. आणि तेंच खऱ्या थोरपणाचें लक्षण आहे.

ही लढाईची हकीकत सांगण्याच्या ओघामुळें, हिच्या आधींची एक गोष्ट सांगावयाची राहिली. ती गोष्ट ही कीं, एब्राहाम लिंकन ह्याची अध्यक्षतेची मुदत भरली होती, ह्मणून पुनरपि नवा अध्यक्ष निवडण्याविषयीं लोकमत घेण्याचें काम रीतीप्रमाणें चालून, बहुमतानें, एब्राहाम लिंकन ह्यासच पुनः अध्यक्ष नेमिलें. तें पाहून, दक्षिणवाल्यांच्या पायांची आग मस्तकास चढली, आणि, आपणांस आतां खचीत अपयश येतें,

असें त्यांच्या जीवास वाटलें. तरी, त्या बहुमानानें एब्राहाम लिंकन फुगला नाहीं. पुनः अध्यक्ष नेमिल्याची बातमी कळल्यावर तो एका सभेंत ह्मणाला, "लोकांनीं कृपा करून मला पुनः अध्यक्ष नेमिलें, हा मजवर त्यांचा मोठा उपकार आहे, आणि ह्याबद्दल मी त्यांचे फार फार आभार मानितों. परंतु, मी आपणांस एक सांगतों कीं, ही जागा अमक्यास मिळाली नाहीं आणि मला मिळाली, अशा प्रकारचा हेवा किंवा गर्व माझ्या अंतःकरणांत मुळींच नाहीं. ही जागा मला मिळूं नये ह्मणून जे लोक प्रयत्न करीत होते, त्यांचा हेतु ह्मणजे अमूकच होता असें मी ह्मणत नाहीं. दुसऱ्याच्या अपमानानें माझ्या मनाला कधीं संतोष होत नाहीं. परंतु, मनुष्याचे स्वाभाविक हक्क आणि भूतदया ह्यांसाठीं, राज्यामध्यें स्वातंत्र्य स्थापित करण्याचा लोकांचा जो निश्चय ह्या कृत्यावरून स्पष्ट दिसून आला, त्याबद्दल मी परमेश्वराचे फार फार उपकार मानितों." ह्यावरून ही निवड यथायोग्य झाली, हें उघड आहे.

दक्षिणवाल्यांचा पराभव झाला, दास्य अगदीं नष्ट झालें, आणि एब्राहाम लिंकन ह्यास पुनः अध्यक्षपण मिळालें, ह्या गोष्टी सगळ्या उत्तरसंस्थानांस आणि विचारशील मनुष्यांस अत्यंत आनंदप्रद झाल्या; आणि त्यांवरून जागोजाग मोठे उत्सव झाले, व एब्राहाम लिंकनावर आशीर्वादांची, आणि नजराण्यांची जणुं काय वृष्टि झाली. बालटिमोर येथील शिद्धी मंडळीनें त्याला खिस्ती पवित्रशास्त्राचें एक सुंदर पुस्तक नजर केलें. त्याच्या एका बाजूवर असें चित्र काढून दाखविलें होतें कीं, एब्राहाम लिंकन हा, कांहीं गुलामांच्या बेड्या स्वहस्तें तोडून टाकीत आहे, आणि त्याच्या पायांशीं "दास्यविमोचन" हा शब्द सुंदर रीतीनें सोन्याच्या अक्षरांनीं लिहिलेला एक का-

गद् पडला आहे. आणि दुसऱ्या बाजूवर एक लेख होता. त्याचें तात्पर्य असें होतें, "हें पुस्तक, अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांचे अध्यक्ष आणि स्वतंत्रतादेवतेचे निस्सीम भक्त ह्यांस सन्मानपूर्वक आणि कृतज्ञतापूर्वक अर्पण केलें आहे." हें पुस्तक त्यांस देण्याकरितां जी निवडक मंडळी गेली होती, तिचें फार आदरातिथ्य करून, एब्राहाम लिंकन त्यांस मोठ्या गंभीर मुद्रेनें ह्मणाला, "परमेश्वरानें मनुष्यास ज्या कांहीं उत्तम देणग्या दिल्या आहेत, त्यांत ख्रिस्ती धर्मशास्त्र हें उत्तम होय. जगाच्या तारणाऱ्यानें ज्या चांगल्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या सगळ्या ह्या पुस्तकावरून आह्मांस कळतात. हें पुस्तक जर आह्मांला मिळालें नसतें, तर अमकें चांगलें आणि अमकें वाईट हें आह्मांला समजलें नसतें. मनुष्याच्या सुखास ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या सर्व ह्यांत सांगितल्या आहेत. असें हें उत्कृष्ट पुस्तक तुह्मीं कृपा करून मला बक्षीस दिलें, ह्याबद्दल मी तुमचे फार फार आभार मानितों." ह्यावरून, ख्रिस्ती धर्मावर त्याची श्रद्धा किती होती, हें स्पष्ट दिसून येतें.

एब्राहाम लिंकनाला पुनः अध्यक्ष नेमिलें होतें. त्याप्रमाणें पुनः सिंहासनारूढ होण्याचा समारंभ इ० स० १८६५ च्या मार्च महिन्याच्या चवथ्या तारखेस झाला. तेव्हां लढाई थोडथोडी चालली होती; तरी, ती लवकरच आटोपणार असा रंग दिसत होता. आणखी, आतां सगळी व्यवस्था चांगली लागून, सर्व लोकांस सुख होईल, अशी मोठी आशा लागली होती. आणि त्याप्रमाणें चोंहीकडे उत्सव चालले होते. त्यांत स्वतः एब्राहाम लिंकन ह्यानें जें भाषण केलें, तें फारच उत्तम होतें. त्याच्या शेवटीं त्यानें असें ह्मटलें कीं, "आपणांस कोणाचें वाईट चिंतावयाचें नाहीं; सर्वांचें करवेल तेवढें बरें करा-

वयाचें; जें योग्य आहे तें करण्याविषयीं दृढ निश्चय करावयाचा; हें अखंड मनांत धरून आपण आपलें काम करूं. ह्मणजे, आपल्या राष्ट्रास ज्या जखमा झाल्या आहेत, त्या बांधून वऱ्या करूं; जे कोणी लढायांत पतन पावले आहेत, त्यांच्या बायकामुलांचा सांभाळ करूं; आणि, आपल्या राष्ट्रामध्यें व इतर राष्ट्रांमध्यें जेणेंकरून न्याय आणि शांति हीं वृद्धिंगत होतील, तें सर्व कांहीं करण्यास झटूं." ह्या एवढ्या शब्दांवरून पाहा कीं, हा अधिकार पुनः मिळाल्यानें त्याला स्वतःचें मोठेपण फारसें वाटलें नाहीं, आणि उगाच भलतेंच कांहीं करण्याचा आव त्यानें घातला नाहीं; तर, मनुष्यास सुखावह आणि परमेश्वरास मान्य असें जें असेल, तेंच करावयाचें, असा त्याचा निश्चय दृढ झाला. अशा निश्चयाचा मनुष्य सिंहासनावर असला ह्मणजे प्रजेस सुख व्हावें, ह्यांत काय नवल आहे ?

होय. हें सगळें खरें. परंतु ह्या जगामध्यें सगळ्या गोष्टी नेहमीं सुरळीत चालत नाहींत. दुष्टजनांचे प्रयत्न जरी घातक असतात, आणि त्यांस जरी ईश्वराचा आशीर्वाद नसतो, तरी, त्यांच्या योगानें, सज्जनांच्या सुखास व्यत्यय येतो. तेथें उपाय चालत नाहीं. एब्राहाम लिंकन जरी इतका चांगला पुरुष होता, आणि तो जें काय करी तें जरी देवास भिऊन करी, तरी, त्यानें दास्यविमोचन केल्यामुळें, सहस्रावधि लोकांचा व्यापार बुडून, त्यांचें लाखों रुपयांचें नुकसान झालें होतें; त्यामुळें, त्या लोकांत त्याला पुष्कळ शत्रु उत्पन्न झाले होते. ते इतके कीं, कितीएक प्रसंगीं कितीएकांनीं त्यास ठार मारण्याचा बेत केला होता. आणखी, त्याविषयींच्या धमकीचीं पत्रेंही त्याला वारंवार येत असत. परंतु तो त्यांस जुमानीत नसे; आणि, जें काय तो करीत असे, तें देवावर भरंवसा ठेवून करीत असे. तरी

शेवटीं दुष्टांनीं आपला डाव साधिला; आणि, देशांत जो एवढा अत्यानंद झाला होता, त्यांत अत्यंत भयंकर दुःख कालविलें. तें कसें तें सांगावयाचें आतां आमच्या वांट्यास आलें आहे.

अगदीं प्रथम एब्राहाम लिंकनाची नेमणूक अध्यक्षाचे जागेवर होऊन, तो, सिंहासनारूढ होण्यास वाशिंगटन येथें येत असतां, त्याला वाटेंतच जिवाचें भय होतें, हें पूर्वीं सांगितलें आहे. हें भय, दास्यविमोचनानें अतिशयित वाढलें. तरी तें वाहेर दिसत नव्हतें. देशामध्यें जयोत्सव चालला असतां, आणि जिकडेतिकडे एब्राहाम लिंकनाचे गुणानुवाद गात असतां, त्या द्वेषी लोकांनीं मोठा कट करून, त्याचा प्राण घ्यावयाचा निश्चय केला. तो कोणाला समजला नाहीं. जयोत्सवाच्या संबंधानें अनेक नाटकें वाशिंगटन शहरांत चाललीं होतीं; आणि त्यांस हजारों लोक जात होते. आणि, उत्तम उत्तम प्रयोगांस एब्राहाम लिंकनास बोलावणें असे. त्यांस जावयाला त्याला वेळ फारसा नसे; तरी, मंडळीच्या आग्रहास्तव, आणि नाटकमंडळीच्या संतोषास्तव तो त्यांतूनच वेळ काढून जात असे. तसा, तारीख १४ माहे एप्रिल सन १८६५ रोजीं रात्रीं तो अमुक एका नाटकास जाणार असें प्रसिद्ध झालें. त्याप्रमाणें, तो आपल्या कुटुंबाच्या माणसांसहवर्तमान त्या नाटकगृहांत जाऊन बसला. खेळ रंगांत आला, आणि त्या खेळानें सगळ्या प्रेक्षकांचीं मनें वेधून टाकिलीं. इतक्यांत, एकाएकीं, कांहीं हालचाल नसतां, एब्राहाम लिंकन वसला होता त्याच्या जवळ एक बराच मोठा बंदुकीचा आवाज झाला. त्यानें सगळी मंडळी दचकली खरी, पण, तो बार खेळांतलाच, लुटुपुटीचा असेल, असें पुष्कळांच्या मनांत आलें, आणि ह्मणून त्याविषयीं प्रथम कोणीं फारसा शोध केला नाहीं. परंतु, पांच चार पळांमध्यें, तेथें असें

समजलें कीं, कोणीं दुष्टानें तो वार एब्राहाम लिंकनावर काढिला, आणि त्याची गोळी त्याच्या डोक्याच्या मागच्या कवटींतून पार जाऊन तो मरणोन्मुख झाला. मग तेथील शोक किती ह्मणून सांगावा? सर्वांच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. आणि, मोठा घात झाला, मोठा घात झाला, असा एकच शब्द सर्वांच्या तोंडांतून निघाला. घावरीं माणसें वेड्यासारखीं इकडे-तिकडे पाहात राहिलीं; विचारी पुरुष, आतां पुढें काय करावें, ह्या विचारांत मग्न झाले; आणि पोलिसाचे कामदार, खुनी मनुष्याच्या शोधार्थ, मोठ्या घाईनें इकडेतिकडे धांवूं लागले. असा एकच कोल्हाळ तेथें होऊन गेला. त्या गडबडींत तो खुनी मनुष्य तेथून निसटून गेला.

ही वार्ता शहरांत कळत होती नव्हती इतक्यांत एब्राहाम लिंकनाचा मुख्य चिटणीस सिवर्ड ह्याचा खून झाल्याचें वर्त्तमान उठलें. त्यावरून सर्वांचें अनुमान असें झालें कीं, हें सगळें कृत्य राज्यकारस्थानाचें आहे. ह्मणजे, उत्तरवाले आणि दक्षिणवाले ह्यांचें जें वैर चाललें होतें, त्याचा हा परिणाम होता. आणखी तत्पूर्वीं देखील थोडेंसें त्याचें प्रमाण नाटकगृहांतल्या कांहीं मंडळीच्या मनांत आलें होतें; कां कीं, तो खुनी मनुष्य तो वार उडवून तेथून निघाल्यावर मोठ्या त्वेषानें ह्मणाला होता कीं, "दक्षिणवाले कसा सूड घेतात तो हा पाहा!" विचारा सिवर्ड किंचित् आजारी असून, आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडला होता. तेथें एका मारेकऱ्यानें तितक्या रात्रीं प्रवेश करून, त्याला तीन जखमा करून अर्धमेला केलें? ती रात्र सगळ्या वाशिंगटन शहरास केवळ काळरात्रच झाली. झोंप अशी कोणालाही आली नाहीं. आणि आतां पुढें आणखी काय अनर्थ होणार आहे, ह्या काळजीनें सगळ्यांचीं अंतःकरणें भरून

गेलीं. कोणास कांहीं सुचेना. लिंकनाच्या कुटुंबावर तर दुःखाचा पर्वतच कोसळला. त्याची बायको त्या धक्क्यानें बेहोष होऊन कितीएक पळेंपर्यंत निचेष्ट पडली होती. ती थोड्या वेळानें सावध झाली. नंतर, मंडळीनें, एब्राहाम लिंकनास तेथून उचलून, जवळच्या एका मित्राच्या घरीं नेलें. तेथें मोठमोठे धन्वंतरी येऊन, त्यांनीं चिकित्सा करून असें ठरविलें कीं, तो आघात प्राणघातक आहे, त्यापासून एब्राहाम लिंकन वांचण्याची आशा नाहीं. तरी, त्यांनीं अनेक उपाय करून पाहिले ते सगळे व्यर्थ गेले; आणि तो थोर पुरुष, दुसऱ्या दिवशीं पाहांटेस सात वाजल्यावर वीस बावीस मिनिटांनीं मरण पावला.

झालें. येथें एब्राहाम लिंकन ह्याचें चरित्र समाप्त झालें. सदाचारी आणि थोर अशा परमेश्वरभक्तांस अशा प्रकारें मरण यावें, ही गोष्ट किती शोचनीय आहे बरें? एब्राहाम लिंकनाच्या मृत्यूवरून साक्रेटिसाच्या मृत्यूची आठवण होते. अशा थोर पुरुषांचा शेवट असा करण्यामध्यें परमेश्वराचा हेतु काय असेल तो असो. परंतु, कांहींतरी हेतु असला पाहिजे हें खचीत आहे.

ह्या चरित्रापासून आपणां हिंदुस्थानवासी जनांस घेण्यासारखीं पुष्कळ तात्पर्यें आहेत. त्यांत प्रधान तात्पर्य हें एक, मनुष्यास खरें मोठेपण प्राप्त होण्यास आणि त्याच्या हातून महत्कार्यें घडण्यास एका गुणाची अत्यंत आवश्यकता आहे. तो गुण हा कीं, बोलण्याप्रमाणें चालणें. एब्राहाम लिंकन हा कांहीं मोठा विलक्षण ज्ञानी पुरुष नव्हता. त्याच्या ठायीं एकादी विलक्षण विद्या होती असेंही नाहीं. तो अगदीं साधारण लांकुडतोड्या अज्ञान मनुष्य होता; आणि, ज्या गोष्टी साधारण लोकांस माहीत असतात, त्याच त्याला माहीत होत्या. परंतु, त्यामध्यें आणि इतर लोकांमध्यें अंतर एवढेंच होतें कीं, इतर

लोक, चांगलें काय तें नुसतें समजून घेऊन किंवा बोलून मात्र स्वस्थ राहातात, आणि एब्राहाम लिंकन यास जें चांगलेंसें वाटे, तें तो, कोणाची परवा न करितां, आणि आपल्या दुर्वासनांचें कांहीं चालूं न देतां, मनापासून करी; आणि, तो जो एवढ्या योग्यतेस चढला, त्यास मुख्य साधन हेंच होतें. सांप्रत काळीं आह्मांस आमचीं कर्तव्यें बरींच कळूं लागलीं आहेत. आणखी, तीं करण्याची केवढी जवाबदारी आपल्या माथ्यावर आहे, तेंही आह्मी समजत आहों; परंतु, तीं कर्तव्यकर्में आह्मी करीत नाहीं. ह्याचें कारण एवढेंच कीं, आमची तितकी निष्ठा नाहीं. परमेश्वरप्राप्ती होण्यास देखील "निष्ठावंत भाव" पाहिजे असें तुकाराममहाराजांनीं ह्मटलें आहे. तर, त्याप्रमाणें, इतर कार्यासही निष्ठावंत भाव आवश्यक आहे. कोणती एकादी गोष्ट एब्राहाम लिंकनास चांगली वाटून ती त्याला करतां येण्यासारखी असली, कीं ती, त्यानें अवश्य करावी; कधींही सोडूं नये; हेंच थोरपणाचें मुख्य लक्षण आहे. हें एब्राहाम लिंकनाच्या ठायीं चांगलें वसत होतें. एका नामांकित ग्रंथकारानें त्याच्या स्वभावाविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "सोईस पडतें ह्मणून करावयाचें, सध्या लाभ होत आहे ह्मणून करावयाचें, लोक चांगलें ह्मणतात ह्मणून करावयाचें, अधिकार प्राप्त होतो ह्मणून करावयाचें, हें एब्राहामाच्या मनाला कधीं शिवलें देखील नाहीं; तर हें चांगलें आहे, असें मनदेवता सांगते ह्मणून हें करावयाचें, अशी त्याची वृत्ति होती. आपल्या देशाचे कायदे मनापासून पाळण्याच्या कामीं तो इतरांपेक्षां फार अगत्यवादी होता. तो कायदा हा देवासारखा पूज्य मानीत असे." हा गुण फार मोठा आहे. एवढा एक जर मनुष्यामध्यें असला, तर लोकांत त्याचें देव्हारें होईल, आणि त्याला सगळ्या कामांत

यश येईल. हें एब्राहाम लिंकनाच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येतें. एकंदरीनें विचार करून पाहिलें असतां, एब्राहाम लिंकन ह्याचे ठायीं जे अप्रतिम गुण होते, त्यांचें संक्षिप्त कथन एका वामनी श्लोकांत येतें:—

श्लोक.

हिंसा त्याग अलोभता परधनीं सत्यत्व संभाषणीं
तृष्णाच्छेद परांगनाविमुखता भूतानुकंपा मनीं
दान प्रश्रय भाव सद्गुरुकुळीं सन्मार्ग सर्वांस हा
संसाराब्धि तरावया स्मृतिशतीं कीं बोलिजेला पहा.

खरोखरच हे गुण अंगीं असल्यावर प्रपंचसमुद्रांतून तरून जाण्यास अडचण पडावयाची नाहीं.

असो. ह्या इतक्या गोष्टी—संक्षेपतः ह्मणा किंवा पाल्हाळपूर्वक ह्मणा—ऐकवून सांगावयाचें मिळून एवढेंच कीं ज्या कोणाच्या मनांत आपल्या राष्ट्राचें हित साधावयाचें आहे, त्यांनीं एब्राहाम लिंकनाच्या कित्त्यानें वागावें, ह्मणजे, नव्याण्णव अंशांनीं, त्यांचे हेतु सिद्धीस जातील. आमचें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या मागें पडलें आहे, त्यास निकृष्टावस्था आली आहे, ही स्थिति जाण्यास आमच्यामध्यें एब्राहाम लिंकन उत्पन्न झाले पाहिजेत. ह्मणजे,

श्लोक.

वानोत निंदोत सुनीतिवंत
चलो असो या कमला गृहांत
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं
सन्मार्ग टाकोनि भले न जाती.

असे भले निर्माण झाले पाहिजेत. ह्मणजे त्यांच्या बरोबर, संपत्ति, विद्या, कलाकौशल्य, राज्याधिकार, सद्धर्मश्रद्धा हीं सगळीं आपोआप येतील; आणि तीं आलीं ह्मणजे तीच आमच्या राष्ट्राची उन्नति होय.